# माणूस

शनिवार । २० डिसेंबर १९७५ । एक रुपया

## एक मंद तेवणारी पणती पुढे आली
## आणि थरथरत म्हणाली.... भगवन्....



मग सर्व बाजूंनी कालचक्र फिरले असता....

एक मंद तेवणारी पणती पुढे आली
आणि थरथरत म्हणाली.... भगवन्....

शब्दांपलीकडचा तो विलक्षण अनुभव....
पंधरा हजार श्रोत्यांचा तो भव्य समूह....
दुर्गाबाईंनी हे घडवून आणले होते....

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : अठ्ठाविसावा

२० डिसेंबर १९७५

मूल्य : एक रुपया



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# सप्रेम नमस्कार

'माणूस' दिवाळी अंकामधलं संपादकीय वाचल्यावर अगदी लगेच उठावं आणि तुम्हाला भेटावं असं मनात आलं होतं. एक-दोन वेळा येऊन गेलो आणि जमलं नाही.

काही मिनिटांपूर्वीच 'थँक यू मिस्टर ग्लाड' वाचून संपवली आणि तसंच वाटतंय. मी चक्रावून गेलोय, झपाटून गेल्यासारखं मला झालंय. मी कम्युनिस्ट नाही, नक्षलवादी नाही. साम्यवाद, मार्क्सवाद, नक्षलवाद यांच्याबद्दल मला फारसं प्रेम नाही. नक्षलवाद्यांचा निःपात झाला तेव्हा तरुण रक्ताच्या हानीचंच दुःख मला अधिक जाणवलं होतं आणि जेव्हा माझे किती तरी तरुण मित्र अति-डाव्या तत्त्वज्ञानाकडे ओढले जाताना मला दिसतात तेव्हा एक विषादाची, काळजीची कळ मनात उठल्याखेरीज राहात नाही. ही कथा वाचतानाही प्रथम मी थोडा सावध होतो. मला त्यात प्रचाराचा भाग स्पष्टच दिसत होता. माझ्यातल्या सावध टीकाकाराच्या नजरेतून त्यामधली Sentimental craftsmanship निसटणं शक्य नव्हतं. त्यामधली वळणं, कलाटण्या यांतून एका साचेबंदपणाचा भासही होतच होता पण...

...पण तरीही या कथेनं मला भारून टाकलंय !

मला असं वाटलं की मी कुणा एका नक्षलवाद्याची कथा वाचत नाही. मी एका चिरंतन, युगायुगांतून लिहिल्या जाणाऱ्या अनादिअनंत महाकाव्याचा एक सर्गच–विसाव्या शतकातलं प्रकरण– वाचतो आहे. 'फिडेल चे आणि क्रांती' किंवा 'आणि ड्रॅगन जागा झाला' वाचलं आणि हाच अनुभव आला होता. भगतसिंग, सुखदेव, आझाद, धिंग्रा, सावरकर हेच सगळे फिडेल, चे, माओ यांच्यामध्ये मला दिसत होते. तो लाँग मार्च माओचा आणि मिनी लाँग मार्च चे चा; पण त्याही आधी गेलेला मिनी मिनी लाँग मार्च बाजीप्रभूचा हे सगळेच एका विश्वव्यापी महाकाव्याचे सर्गच आहेत, अध्याय आहेत, असं मला वाटलं. वीरभूषण पटनाईक आणि छत्रपती संभाजी यांच्यात काही फरक करावा असं वाटत नाही–एक केव्हा मनातून जातो आणि दुसरा कधी त्याची जागा घेतो ते कळत नाही. जगात कुठं तरी त्याग ही बाजारू क्रयवस्तू झालेली नाही, स्वतंत्र विचार हे लांछन मानलं जात नाही, ध्येयमरण हा मध्यमवर्गीय सावधपणातून कुचेष्टेचा विषय मानला जात नाही, कवी–डॉक्टर– विचारवंत आपल्या हस्तीदंती कबरीच्या आतच राहण्यात धन्यता मानीत नाहीत, अजून कुठं तरी स्वप्नं पाहिली जातात, विजा उराशी कवटाळून हसत त्या स्वप्नांचा ध्यास घेतला जातो आणि हौतात्म्य, बलिदान, वीरमरण या क्षुल्लक बूर्ज्वा किंवा मध्ययुगीन शाहिरी कल्पना मानल्या जात नाहीत याची जाणीव केवढी थरारून, सळसळून टाकणारी आहे ! नवनिर्माण करणाऱ्या वेदनांचं हे जयगान किती भव्य, उदात्त आहे !

थँक यू मिस्टर नक्षलवादी... !

थँक यू मिस्टर बर्वे– ! !

–विनय हर्डीकर, पुणे

साहित्य आणि राजकारण
वेगवेगळी राहू शकत नाहीत
हे जाणवून देणारे

# कऱ्हाडचे साहित्यसंमेलन

# दोन वृत्तांत

पुनरुक्तीचा दोष पत्करूनही
दोन वृत्तांत येथे दिले आहेत.
हेतू हा
की वृत्तपत्रांतून न आलेल्या काही गोष्टी
यामुळे वाचकांसमोर याव्यात.
विचारांना अधिक चालना मिळावी.

---

## प्रार्थना !

---

सहा डिसेंबर एकोणिसशे पंचाहत्तर. कऱ्हाडच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारातला भव्य मंडप. आगरकरसभागृह. समोर ऐसपैस व्यासपीठ. त्यावर भारतीय बैठक. मंडपात माणसांची ठिच्च गर्दी. जो तो उत्सुकतेनं जागा धरून बसलेला. अधीर, सोत्कंठ वातावरण.

दुर्गाबाई प्रवेशल्या. त्यांच्याभोवती आदबशीर प्रभावळ. दुर्गाबाईंच्या चेहऱ्यावर गांभीर्य.

मुख्य दरवाजानं यशवंतराव प्रवेश करतात. भोवताली खास आदबशीर प्रभावळ. यशवंतरावांच्या चेहऱ्यावर नेहमीचंच हास्य आणि चालीत नेहमीचाच डौल आहे. रणजित देसाई त्यांना व्यासपीठावरून सामोरे आलेत. 'माजी संमेलनाचा स्वागताध्यक्ष या नात्यानं मी आपलं स्वागत करतो !' अधिक दिलखुलास हसत यशवंतरावांनी

रणजितच्या खांद्यावर थोपटलं अन् त्यांच्यासोबतच ते व्यासपीठाकडे गेले.

सभागृह आता अगदी शिगोशीग भरलेलं.

ईशस्तवन, पठ्ठे बापूरावचा गण वगैरे कार्यक्रम आटोपला. एक छानशी वातावरणनिर्मिती साधली गेली. कार्याध्यक्ष शंकरराव करंबेळकर यांच्या छोटयाशा, परंतु मार्मिक भाषणानंतर स्वागताध्यक्ष यशवंतराव चव्हाण भाषणासाठी उभे राहिले. त्यांच्या भाषणाला सुरुवात होणार, तोच श्रोत्यांतून एक महिला आवेशाने उभी राहिली आणि विरोधी घोषणा तारस्वराने देत व्यासपीठाच्या दिशेने जाऊ लागली. पुढल्या श्रोत्यांत किंचितशी खळबळ झाली. यशवंतराव स्थिरपणे पाहत राहिले. महिला पोलिसांनी घोषणा देणाऱ्या स्त्रीस तातडीने मंडपाबाहेर नेले. यशवंतरावांचे भाषण सुरू झाले.

सोहळ्याचे यजमानपण करणाऱ्या कऱ्हाडकरांचा प्रतिनिधी म्हणून सर्व मराठी साहित्यिक व साहित्यरसिकांचे त्यांनी मनःपूर्वक स्वागत केले. कऱ्हाडच्या संस्कृतिवैशिष्टयांचा आढावा घेतला. कऱ्हाडच्या साहित्यिक आणि सामाजिक परंपरांची माहिती सांगितली. रसिक साहित्यप्रेमी या नात्याने काही महत्त्वाच्या विषयांना यशवंतरावांनी स्पर्श केला. वैचारिक प्रवर्तन व प्रबोधनाच्या दृष्टीने मराठी साहित्यात काय झाले याची समीक्षा करण्यासारखी आहे, असे ते म्हणाले. काय घडावयास हवे याचाही विचार त्यांनी केला. '१९४७ मध्ये भारतीय समाजाचे स्वातंत्र्यपर्व सुरू झाले. आता रचनापर्व सुरू झाले आहे.' असे सांगून ते म्हणाले की, 'समाजाच्या मानसामध्ये जे असते तेच साहित्यात अवतरते. भारतीय समाजाच्या या रचनापर्वात नव्या विचारांची व सर्वांगीण ज्ञानाची बीजे टाकत राहणे हेही साहित्यिकाचे महत्त्वाचे कार्य आहे. नव्या सामाजिक प्रबोधनाचे चिंतन करणारे साहित्य हेच उद्याच्या मराठी साहित्याचे स्वरूप असणार अशी आपली धारणा यशवंतरावांनी बोलून दाखवली. समाजक्रांतीविषयी अनुकूल मनोभूमी तयार करावयाची असेल तर प्रस्थापित समाजातील विसंगती, अंतर्विरोध आणि त्यामुळे निर्माण होणारी कोंडी यांच्या कलात्मक आविष्कारातून समाजावर संस्कार करता येतात, याची स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली. यापुढे प्रादेशिक लोकसभा याच ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत आणि त्यांच्यातच चिंतनशील साहित्य निर्माण झाले पाहिजे ही आजची महत्त्वाची गरज' म्हणून त्यांनी सांगितली. सामाजिक, राजकीय व साहित्यिक मूल्यांची एकमेकांपासून फारकत करता येत नाही असे सांगून आजही भारतांतर्गत समस्यांचा विचार करीत असताना हा संदर्भ तुम्हा-आम्हाला विसरता येणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. मुक्त विचाराचा सिद्धांत हा एक आकर्षक विचार आहे आणि मूलतः समर्थनीयही आहे हे मान्य करून यशवंतराव म्हणाले की, आजच्या 'सामाजिक, आर्थिक क्षेत्रात उभे असलेले इतर राष्ट्रीय प्रश्न यांचा संदर्भ विसरून हा सिद्धांत यशस्वी होऊ शकेल काय, याचेही चिंतन होण्याची गरज आहे. आज जे समाजातील तणाव आहेत त्यांचे स्वरूप समाजापुढे आणले पाहिजे' असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादिले. प्रत्येक वेळा न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात जाता येत नाही किंवा कायद्यावर बोट ठेवता येत नाही याची आठवण देऊन ते म्हणाले की, सामाजिक हक्क हे समाजमनाच्या उदारतेवर अवलंबून असतात.

दलित समाजातून आलेल्या नव्या मराठी साहित्यिकांनी जे साहित्य निर्माण केले आहे ती मराठीतील एक मोलाची भर आहे असे मत यशवंतरावांनी व्यक्त केले. हे साहित्य हा आरसा असून त्याचा सामाजिक उपयोग होण्यासारखा आहे, असे ते म्हणाले. जगातील अनेक मुक्त राष्ट्रांच्या विचारधनाचा, ललितवाङ्मयाचा परिचय, त्यांचे संघर्ष आपल्या भाषेत आणणे आवश्यक आहे असा विचार त्यांनी मांडला. भारतीय भाषांतील नव्या प्रवाहांची ओळख करून घेण्यावरही त्यांनी भर दिला. भारतीय साहित्य ही संकल्पना स्पष्ट करून यशवंतराव म्हणाले, 'भारतीयता, विश्वात्मकता व मराठीपणा हे तिन्ही गुण एकाच साहित्यात एकाच वेळी नांदले तर ते साहित्य समृद्ध होईल.'

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करून भागणार नाही तर त्याचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तकयोजनाद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे, असा एक मोलाचा व्यवहार्य विचार यशवंतरावांनी मांडला. संशोधनासंबंधी विद्यापीठांनी अधिक समाजाभिमुख कसे व्हावयास हवे याचेही दिग्दर्शन त्यांनी केले.

शेवटी, 'या शारदेच्या उपवनात येताना भारत सरकारच्या मंत्रीपदाची बिरुदावली मी बाहेर ठेवून आलो आहे' असे सांगून यशवंतरावांनी समारोपादाखल म्हटले की, 'आमच्या देशात सुप्त सामर्थ्ये फार मोठी आहेत; पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.'

यशवंतरावांच्या भाषणात विश्लेषकता होती, नवी दृष्टी होती आणि जिव्हाळ्याचा ओलावाही होता; परंतु भाषण वाचताना यशवंतराव नेहमीसारखे खुलले मात्र नाहीत. त्यांच्या वाचनात सुभगता होती; पण सफाई नव्हती. तीन वेळा वाचताना ते अडखळले. भाषण करण्यापेक्षा 'वाचणे' त्यांना अवघडल्यासारखे वाटत असेल, असेही असेल कदाचित.

यानंतर अत्यंत ठाशीव सुरात, परिणामाचे नाटय साधत तर्कतीर्थ लक्ष्मणराव जोशी यांनी उद्घाटनाचे भाषण वाचले. तर्कतीर्थांचे भाषण 'माणूस'च्या गेल्या अंकात समग्र आलेच आहे. त्यातील शेवटचा परिच्छेद लक्षणीय आहे. साहित्यिकांच्या हृदयाकाशात भरलेल्या क्षोभाची दखल घेऊन, लेखनस्वातंत्र्यावरील निर्बंधामुळे साहित्यनिर्मितीला अत्यावश्यक असलेल्या मोकळ्या वातावरणाला झालेला धोका त्यांनी निःसंदिग्धपणे सांगून टाकला. 'कित्येक वेळा उपायच दुरुपाय ठरतात; आपत्काल तात्कालिक न ठरता कायमचा मुळे रोवून बसतो. लोकशाहीचा धोका दूर करण्याकरिता जे उपाय योजले जातात, तेच उपाय कित्येकदा लोकशाहीलाच दूर ठेवू शकतात.' इत्यादी इशारेवजा वाक्ये जेव्हा शास्त्रीबुवा आपल्या ठाशीव आवाजात वाचत होते, तेव्हा श्रोते भारावून टाळ्या देत होते.

पद्मविभूषण भाऊसाहेब खांडेकर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे संमेलनास हजर राहणार नव्हते; परंतु तरीदेखील अस्वस्थ प्रकृतीवर मात करून ते संमेलनाकडे धावलेच! भाऊसाहेबांची अंधःजर्जर मूर्ती व्यासपीठावर येत असता सर्वजण आदराने उठून उभे राहिले. यशवंतराव भाऊसाहेबांना आनंदाने सामोरे गेले.

वृत्तपत्रांतील संमेलनपूर्व पत्रापत्रीमुळे, त्यातल्या वादंगांमुळे, पु. ल. देशपांडे संमेलनाला येणार की नाही, आले तरी भाषण करणार की

नाही, भाषण केले तरी त्यात औचित्याचा (फोल ?) विवेक सुटणार तर नाही ना इत्यादी शंकांच्या वावटळी सर्वांच्याच मनात भिरभिरत होत्या. त्यामुळे पु. लं. नी सभागृहात एंट्री घेतानाच टाळ्यांचा कडकडाट झाला होता. पु. ल., दुर्गाबाई आणि यशवंतराव या तिघांचा एकत्र कोन साधून फोटोग्राफर्सचे धडपडीचे हल्ले चालू होते. अधिकारप्रदान करण्यासाठी पु. ल. उभे राहिले आणि अत्यंत समयोचित व मार्मिक भाषणाने त्यांनी दहा हजार श्रोत्यांची मने जिंकून घेतली. दुर्गाबाईंचा व्यासंग, त्यांची विद्वत्ता आणि साहित्यक्षेत्रातील अधिकार यांच्या मुक्त गौरव करून दुर्गाबाईंचा 'प्रसाद' मिळण्यातली कृतार्थताही त्यांनी दिलखुलासपणे व्यक्त केली. तर्कतीर्थांच्या भाषणातील सद्य:स्थितीचा संदर्भ पु. लं. च्या भाषणातही अनुस्यूत होताच. सुवर्णमहोत्सवी अधिवेशनात केवळ सनईवाल्यासारखे करमणुकीचे काम आपण केले असे सांगून गडकरी–भाषेत पु. ल. म्हणाले की नव्याने पायमल्ली होऊ लागली म्हणजे मेल्या कातड्याची वहाण सुद्धा कुरकुरू लागते, तशी माझ्यासारख्या मुर्दाड मनाच्या माणसालाही वेदना बोलून दाखवावीशी वाटते. दुर्गाबाईंच्याकडून या परिस्थितीत निश्चित आणि मोलाचे मार्गदर्शन आम्हाला हवेच आहे.

दुर्गाबाई अध्यक्षीय भाषणासाठी उभ्या राहिल्या. सभामंडपात एकदम सोत्कंठ शांतता पसरली. छापील भाषण वाचण्यापूर्वी यशवंतरावांच्या भाषणाचा मागोवा घेऊन दुर्गाबाई म्हणाल्या की, त्यांनी आणि तर्कतीर्थांनी आजच्या परिस्थितीचे विश्लेषण करून साहित्याच्या जबाबदारीचे जे भान प्रकट केले ते अचूक आहे; पण त्यांच्यासारखी माणसे जेव्हा अशा गोष्टी बोलू लागतात तेव्हा त्यांची घोषवाक्ये तयार होतात आणि एकदा घोषवाक्ये बनली की लोक फक्त टाळ्या वाजवतात, त्यांच्या अर्थाकडे दुर्लक्ष करतात. आज अती विलक्षण काळामधून आपण जात आहोत. या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी ज्याला जो सुचेल त्या मार्गाने त्याने गेले पाहिजे.

आपल्या भाषणाच्या प्रारंभी इतिहासाचार्य राजवाड्यांचे स्मरण करून दुर्गाबाई म्हणाल्या की, 'राजवाडे आणि चिं. वि. जोशी ज्या पदावर चढले नाहीत, त्या पायरीवर पाऊल ठेवताना मला संकोच वाटतो आहे.' कुठल्याही काळी विचारवंतांच्या उपयोगी पडावेत असे राजवाड्यांचे पुढील बोल दुर्गाबाईंनी उद्धृत केले : 'सरकारच्या मानभावी कळकळीवर भिस्त न ठेवता व महाराष्ट्रातील उच्च मंडळीच्या पूर्ववयातील अनास्थेकडे दुर्लक्ष न करता, आपल्याला आपले कर्तव्य यथाशक्ती बजावले पाहिजे. त्याची हलगर्जीपणाने आपण हेळसांड केली तर पुढील पिढीचे अभिश्राप आपल्याला घ्यावे लागतील आणि आपल्या कर्तव्यशून्यतेबद्दल व मनाच्या दुबळेपणाबद्दल इहलोकी आपला विशेष बोज न राहता परलोकी आपल्याला झाडा द्यावा लागेल. दुनिया आबादीआबाद असतानाही मनुष्याला आपल्या कर्तव्याला जपावे लागते. मग सर्व बाजूंनी कालचक्र फिरले असता, राष्ट्रातले एकोनएक लोक देशोधडीला लागले असता, उलट्या काळजाच्या शत्रूने सर्वतोपरी नागवले असता, मतलबी लोकांच्या गोड बोलण्याला उच्च मंडळी भुलून गेली असता निष्काम बुद्धीने व एकतानतेने कर्तव्य बजाविण्याची आवश्यकता विशेषच असते हे निर्विवाद आहे. अशा वेळी लहानसहान संकटांना भिऊन जाऊन किंवा जुजबी व अल्पकालीन फायद्याकडे नजर देऊन, जो मनुष्य कर्तव्याला विसरेल त्याने आत्मघात केला एवढेच नव्हे तर देशघात केला असेही होईल! ह्यावर कोणी असा प्रश्न विचारील की, हे असे खडतर कर्तव्य तरी कोणते ? तर ते स्वत्वरक्षण होय, असे आम्ही उत्तर करतो.'

दुर्गाबाई पुढे म्हणाल्या की, पारतंत्र्याच्या त्या काळात लेखकाला जेवढी प्रतिष्ठा होती, तेवढी नंतर राहिलेली नाही. सुरक्षिततेचा आभास निर्माण झाला. सरकारदरबारी मानाची स्थाने मिळतात; पण वैचारिक क्षेत्रात, जनमानसात लेखकांना अधिकारित्व राहिलेले नाही. कारण या परिस्थितीत स्वत्वाची कसोटी लेखकाला स्वत:लाच आवश्यक वाटत नाही. अनेक थोर लेखकांनी व विचारवंतांनी रेडिओ, टी. व्ही. व इतर जनतामाध्यमांचा वापर करताना त्यासाठी काही मूल्ये, कसोट्या नि मानदंड यांचा त्याग करणे अपरिहार्य आहे अशी समजूत करून घेऊन, स्वत:ची मूळ पातळी मात्र गमावलेली आढळते.

दुर्गाबाई पुढे म्हणाल्या की, लेखकाचे समाजाच्या जडणीघडणीत काय स्थान आहे हे त्याचे समाजमनाशी जे तादृप्य घडते त्यावर अवलंबून असते. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी लेखक हा वैचारिक अधिष्ठाता समजला जात असे. आता हे मानबिंदू ढळल्याचे दिसते. अशा स्थितीत साहित्य ही श्रेष्ठ कला रहात नाही. लोकांचा पाठिंबा नसलेल्या मूठभर विद्वानांना विचारतो कोण, हे खरे नाही. या मूठभरांचाच वचक सत्ताधाऱ्यांना वाटतो. सेन्सॉरशिपची नियंत्रणे कडक बनतात ती ज्यांना लोकप्रियता नाही त्यांनाच वचक बसावा म्हणूनच ना ?

अभ्यासू लेखन आणि ललित–लेखन या साहित्याच्या दोन भागांचे स्वरूप, निर्मिती आणि आविष्कार यांची मूलगामी चिकित्सा दुर्गाबाईंनी केली. कवितेप्रमाणेच ललितलेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते, असे त्या म्हणाल्या. साहित्याची मूळ प्रेरणा ज्ञापकता असते. लेखक–वाचकातल्या संवादामुळेच वाल्मीकीचा शोक आपलाही शोक होतो, भविष्यात पाहण्याची दृष्टी सृजनशील लेखकाला आवश्यक असते असे अनेक मूलगामी सिद्धांत दुर्गाबाईंनी विवरून सांगितले. पुराकथा ऊर्फ मिथ आणि विज्ञानाने पुरवलेल्या कल्पकथा यांच्या वाङमयातील स्थानाविषयीही त्यांनी सुरेख विवेचन केले.

दुर्गाबाई पुढे म्हणाल्या, 'अमुक एक गोष्ट तू लिही, असेच विचार मांड, असंच परिस्थितीचं चित्रण कर, असं लेखकाला सांगणं बरोबर नाही. पीनलकोडप्रमाणे साहित्याला नियमबद्ध करणं नुसतं हास्यास्पदच नाही, तर धोकादायकदेखील आहे.'

कलाकृतीच्या आशयाची संकल्पना स्पष्ट करून 'प्रत्येक कलाकृती म्हणजे आशय आणि आकार यांचा लग्नबंध' असा सिद्धांत दुर्गाबाईंनी सांगितला. अन्नदाशंकर राय यांच्या शब्दांत त्या म्हणाल्या, 'कठीण परिस्थितीत कलावंत किंवा साहित्यिक हा गर्भार बाईसारखा असतो. बाहेर काय वाटेल ते होवो, त्याने आपला गर्भ जपावा.' कलात्मक आविष्कार जाणिवेच्या अनेक पातळ्यांना स्पर्शून जात असतो, याचे खुलासेवार सोदाहरण विवेचन दुर्गाबाईंनी केले. त्या अनुषंगाने अश्लीलतेविषयीही काही मोलाचे विचार त्यांनी मांडले. शिष्ट भाषा व बोलीभाषांचे अभिसरण साहित्यिक वातावरणाला पोषक आहे, असेही त्यांनी सांगितले. विज्ञान, धर्म आणि साहित्य यांचे परस्परपूरक संबंध त्यांनी विशद केले. अनेक नव्या

साहित्यकृतींची वेचक उदाहरणे घेऊन मराठीतील कथा, कादंबरी, चरित्र, विज्ञानकथा यातील विविध प्रवृत्तिप्रवाहांची सविस्तर व मार्मिक चर्चा त्यांनी केली.

राजकीय कादंबरीवर भाष्य करताना दुर्गाबाई म्हणाल्या, 'राजकारणाच्या चर्चेची समस्त दालनेच बंद झाल्यावर व्यक्तिचित्रण कुठले ? डोळ्यांसमोर घडणाऱ्या घटनांना आम्ही साहित्यबद्ध करू शकत नाही. साहित्याची ही अपरिमित हानी आहे... जगातील घडामोडींचे वर्णन सत्ताधीशांच्या केवळ गुणगौरवाखेरीज आपल्याला करता येत नाही. ही साहित्याची अपरिमित हानी आहे. बंधने आली की विचारांचा ओघच खंडित होतो... साहित्य हे आता राजकारणापासून तोडता यायचे नाही !'

अतिशय परखड सुरात दुर्गाबाई बोलत होत्या आणि भव्य सभामंडपातील दहा हजारांचा जनसमुदाय मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता. दुर्गाबाईंच्या वक्तृत्वात सफाईचा दिमाख नव्हता. उसने नाटयदर्शन नव्हते. किंबहुना आकर्षक वक्तृत्वाचा एकही गुण त्यांच्या वाचनात नव्हता; परंतु त्यांचे स्फटिकासारखे पारदर्शक विचार आणि खळाळत निश्चित दिशेने वाहत राहणाऱ्या नदीप्रमाणे सरळपणाने ते मांडण्याची जोपिली धिटाई यांची मोहिनी विलक्षण होती. त्यांची तळमळ जाणवणारी होती.

संमेलनाचा पहिला दिवस संपला. पुंजक्यापुंजक्यांनी लोक हिंडू लागले. जेवणासाठी व्यवस्थित रांग न करता साहित्यिक धक्काबुक्की व दंगा करू लागले.

वारणानगरच्या बालकलाकारांच्या वाद्यवृंदाचा सुंदर कार्यक्रम रात्री होता. सर्वांचीच मने त्या सुरांनी हेलावून गेली.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाचा प्रारंभ 'ज्ञानदेवें रचिला पाया' या परिसंवादाने झाला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे परिसंवादाचे अध्यक्ष होते. श्री. वि. स. पागे, श्री. बाळासाहेब भारदे आणि श्री. धुंडामहाराज देगलूरकर हे वक्ते होते. पागे प्रारंभी बोलले. ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाची त्यांनी चिकित्सा केली. पागे यांचे वक्तृत्व नेटके आणि व्यासंग सखोल होता. सनातन भारतीय तत्त्वज्ञानाचा नूतन आविष्कार ज्ञानदेवांनी कसा घडवला ते त्यांनी फार सुंदर विवरण करून सांगितले. 'या क्षणभंगुर जगातील एखादा भंगुर अनुभव रंगवणाऱ्या लेखकाला आपण वास्तववादी म्हणतो नि ज्या ज्ञानेश्वरांनी रिॲलिटीचा साक्षात अनुभव घेतला होता त्यांच्या काव्यास अवास्तव मानतो, हा चमत्कारच आहे.' यासारख्या विलक्षण सिद्धांतांनी त्यांचे भाषण नाटयपूर्ण झाले. भारदेबुवांनी ज्ञानदेवांच्या कर्तृत्वाचे विश्लेषण केले. मधूनमधून बरेच विषयांतर करीत, शब्दचमत्कृतीचे वक्तृत्वाचे खेळ करीत त्यांनी आपले भाषण रंजक बनविले. साक्षात्कार अनुभवलेल्या ज्ञानेश्वरांनी समाजहितार्थ झटल्याविना असणारी निष्क्रिय समाधी कशी निंद्य मानली आहे ते त्यांनी समजावून सांगितले. शेवटी धुंडामहाराजांनी ज्ञानदेवांचा नीतिविचार आणि सांप्रदायिक माहात्म्य वर्णन केले. त्यांचे प्रवचन हरदासी थाटाचे झाले. विषयापेक्षा विषयांतर जास्त असा त्यांच्या वक्तृत्वाचा प्रकार होता. शेवटी तर्कतीर्थांनी तिघाही वक्त्यांच्या भाषणांचा फार समर्पक आणि औचित्यपूर्ण समारोप केला. जरा लांबलेलाच हा कार्यक्रम कंटाळवाणा मात्र कुठेही झाला नाही. ज्ञानदेवांचा एक छानसा पुतळा बाजूला टेबलावर ठेवून इंमोशनल इफेक्ट साधला होता.

परिसंवाद संपल्या संपल्या एका अत्यंत हृद्य कार्यक्रमास प्रारंभ झाला. ज्ञानपीठपारितोषकाचा सर्वोच्च बहुमान मिळवणाऱ्या भाऊसाहेब खांडेकरांचा आणि हिंदी लेखक श्री. अनंतराव शेवडे यांचा सत्कार. तसेच प्रा. रा. श्री. जोग, कवी अनिल, श्री. ग. दि. माडगूळकर, कवी यशवंत, श्री. पु. ल. देशपांडे या संमेलनाच्या पूर्वाध्यक्षांचा सत्कार. प्रत्येकाचा सत्कार करताना दुर्गाबाईंनी मोजक्या, परंतु अत्यंत समर्पक आणि हृद्य शब्दांत त्यांचे त्यांचे वर्णन केले. तरुण वयातील अनिलांच्या आणि यशवंतांच्या कवितांची अजरामर मोहिनी, रा. श्री. जोगांच्या व्यक्तिमत्त्वातील आदर्श कनवाळू शिक्षक, ग. दि. मां. चे जातिवंत शीघ्रकवित्व इत्यादींचे त्यांनी रसभरित वर्णन केले.

सत्कारानंतर श्री. अनंतराव शेवडे यांनी हिंदीतून सत्कारास उत्तर दिले. हा माझा सत्कार प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे, जगभर पसरलेल्या हिंदी भाषिक साहित्यिकांचा हा सत्कार आहे वगैरे विचार भावपूर्ण शब्दांत त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर माजी अध्यक्षांच्या वतीने (रा. श्री. जोगांच्या गुर्वाज्ञेने) पु. ल. बोलले. पु. लं. चे भाषण काळजाचा ठाव घेणारे झाले. व्यासपीठावरील प्रत्येक सत्कारमूर्ती आपल्याला स्वतःला गुरुस्थानी कशी आहे ते अतिशय भावोत्कट शब्दांत त्यांनी वर्णन केले आणि ते करताना त्या त्या साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व ठसठशीत रेषांत जिवंतपणे रेखाटले. ग. दि. मां. च्या शीघ्र कवित्वाचा जो ऐकीव किस्सा दुर्गाबाईंनी उल्लेखला होता, त्या वेळी आपण कसे समक्ष उपस्थित होतो आणि हिंदी लोकगीताचे मुळापेक्षा सरस भाषांतर अण्णांनी कसे केले ते

---

◻ स्वागताध्यक्षांनी सर्वांचे स्वागत करावयाचे. संमेलनाच्या अध्यक्षांचेही. येथे मात्र गंमत झाली. दुर्गाबाईंनी मंडपात आधी प्रवेश केला. त्यांच्याबरोबर श्रीनिवास कुलकर्णी वगैरे साहित्यिक मंडळी होती. त्यानंतर काही मिनिटांनी यशवंतराव प्रविष्ट झाले. त्यांच्याबरोबर मंडळींचे एक कोंडाळे होते. यशवंतराव उपस्थित होताच व्यासपीठावरील सर्वजण स्वागतासाठी उठून उभे राहिले. दुर्गाबाई मात्र अर्थातच बसून होत्या. नाथाच्या घरची उलटीच खूण !

◻ भाऊसाहेब खांडेकरांचे भाषण सर्वांना हेलावून सोडणारे होते. शरीराने गलितगात्र झालेला हा तपोवृद्ध साहित्यमहर्षी जेव्हा उद्गारला, 'कदाचित सर्वांशी गप्पा मारण्याची माझी ही शेवटचीच संधी असेल' तेव्हा सर्वांच्याच काळजाचे पाणी झाले. साहित्य आणि सामाजिक जीवन यांच्याविषयी मौलिक विचार सांगून भाषणाच्या अखेरीस आपले वैचारिक गुरू जयप्रकाश नारायण यांना त्यांनी मनोमन आदरांजली अर्पण केली.

---

त्यांनी खुलासेवार वर्णन करून सांगितले. त्या दोन्ही कविता पु. लं.नी सुरेल चालीने गाऊन दाखवल्या आणि पाहता पाहता सभागृहाचे रसिक मैफलीत रूपांतर करून टाकले. पु. लं. चे गायन चालू असतानाच यशवंतराव व्यासपीठावर येऊन बसले. दुर्गाबाईंनी पु. लं. चा सत्कार करताना सद्यःपरिस्थितीतील अपेक्षा बोलून दाखवल्या होत्या. तो धागा उचलून पु. लं. नी एक सुंदर जातककथा ऐकवली. भावी जन्म डुकराचा येणार हे अंतर्ज्ञान झालेल्या भिक्षूने आपल्या शिष्यांना सांगून ठेवले होते की आश्रमातील डुकरीण व्याली की लगेच तिच्या पिलांना मारून टाका आणि त्या जन्मातून माझी सुटका करा. प्रत्यक्षात शिष्य मारायला आल्यावर चिखलपाण्यात लोळणारे ते डुकराचे पोर म्हणाले, 'नका नका, मारू नका. हाही जन्म काही तसा वाईट नाही!' सध्याच्या जाचक माणुसकीशून्य स्थितीत आपण त्या डुकरासारखे वागणार की माणूस म्हणून जगणार असा सवाल पु. लं. नी केल्याबरोबर सभागृहाचे वातावरण पाहता पाहता बदलून गेले. सारेजण एकदम तटस्थ-गंभीर झाले. अंतर्मुख बनले. पु. लं. नी रवींद्रनाथांची एक रूपककथा सांगायला सुरुवात केली. मावळत्या सूर्याला एकदा प्रश्न पडला की आपल्यानंतर जगाचा सांभाळ करणार कोण? त्याने जगाला तसा प्रश्न केल्यावर मोठमोठे दिवे, बत्त्या एकदम स्तब्ध झाल्या. जगाला तेजोदान करण्याचे नारायणाचे काम कोण शिरावर घेणार? पण एक मंद तेवणारी पणती थरथरत पुढे आली आणि म्हणाली, 'भगवान्! आपण निश्चित मनाने जा! जगाच्या अंधाराला ढवळण्याचे आपले कार्य माझ्याकडून होईल तितके मी निश्चित पार पाडत राहीन!'...ही कथा सांगून पु. लं.नी ग्वाही दिली की मी एक छोटा सामान्य साहित्यिक आहे; पण त्या पणतीचे व्रत घेण्यास मी मनोमन तयार आहे. माझ्या मर्यादा मला ठाऊक आहेत; पण कर्तव्यही मी विसरू शकत नाही.

अतिशय गंभीर वातावरणात दुर्गाबाई समारोप करायला उठल्या. त्या बोलू लागल्या, 'पु. ल. देशपांडे यांनी सांगितलेल्या कथेचा धागा उचलूनच मी बोलणार आहे. त्यांच्यासारख्या लक्षावधी पणत्या पुढे सरसावल्या तर देशात तेजाची दिवाळी साजरी व्हायला वेळ लागणार नाही. त्या कथेतल्यासारखा तेजोशाली सूर्य आज भारतात एकच आहे आणि तो खरोखरीच अस्ताला चालला आहे. तो म्हणजे जयप्रकाश नारायण. महात्मा गांधींच्यानंतर त्यांच्याइतके परिपूर्ण नव्हे, पण जास्तीत जास्त मोठे नेतृत्व जयप्रकाश नारायणांचे निर्माण झाले. असे आपले जयप्रकाश आज मृत्युशय्येवर खिळले आहेत. त्यांच्या प्रकृतीची आम्हाला फार फार काळजी वाटते. मी यशवंतरावांना भाऊ मानते. माझी त्यांना कळकळीची विनंती आहे की आमच्या या भावना, निदान या त्यांच्या भगिनीच्या भावना त्यांनी दिल्लीपर्यंत पोचवाव्यात. जयप्रकाशांच्यासाठी मी या सभागृहाला तळमळीने भीक मागते आणि तशी भीक मागायला मला जराही लाज वाटत नाही—की जयप्रकाशांना दीर्घ आयुरारोग्य लाभावे म्हणून आपण सारे दोन मिनिटे उभे राहून चित्त एकाग्र करून प्रार्थना करू या!' दुर्गाबाईंच्या या शब्दांचा जादूसारखा परिणाम झाला. एक चैतन्याची लहर सर्वांच्या हृदयांतून, सर्वांगातून लहरत गेली. पंधरा हजार श्रोत्यांचा तो भव्य समूह तत्क्षणी उठून उभा राहिला. कोणीही अवाक्षर उच्चारले नाही; पण त्या शांततेचाच एक धीरगंभीर ध्वनी निनादत राहिला होता.

...यशवंतरावही क्षणाचा विलंब न करता उठून उभे राहिले होते. सभागृहातील विराट मानवहृदयाच्या एकाग्रतेशी समरस झाले होते.

तो विलक्षण अनुभव शब्दांच्या पलीकडचा होता.

दुर्गाबाईंनी हे घडवून आणले होते यशवंतरावांच्या साक्षीने. यशवंतरावांनी हा मोठेपणा दाखविला होता. हजारो जणांच्या साक्षीने.

अतिशय भारावलेल्या मनाने सगळे सभागृहाबाहेर पडले.

संमेलनाचा हा उत्कट बिंदू. संमेलन येथेच संपले असते तर फार बरे झाले असते. एक विशिष्ट संस्कार घेऊन मंडळी घरोघर परतली असती.

पण दुपारी कविसंमेलन झालेच.

'आजचे ललितसाहित्य वयाने प्रौढ झालेले असले तरी परिपक्व झालेले नाही' या विषयावर परिसंवाद झाला. त्यात कुरुंदकर व डॉ. सरोजिनी वैद्य सोडून सगळे रटाळ बोलले.

तिसऱ्या दिवशी सकाळी संतसाहित्यावर गटचर्चा झाली. बाकीच्या गटचर्चा आयत्या वेळी रद्द झाल्या.

यशवंतरावांनी एक समर्थनाचे भाषण केले. मंत्रिपदाची बाहेर ठेवलेली बिरुदे त्या भाषणात त्यांनी पुन्हा आत आणली.

संध्याकाळी खुले अधिवेशन झाले.

वगैरे वगैरे वगैरे वगैरे वगैरे...

¤

# दुर्गा भागवत यांच्या शक्तिसौष्ठवाने मंतरलेले संमेलन

रामदास भटकळ

गेली पन्नास वर्षे आम्ही बालगंधर्व आणि केशवराव भोसले यांच्या 'संयुक्त मानापमान'च्या प्रयोगाबद्दल ऐकत आलो आहोत. मराठी रंगभूमीच्या इतिहासातील तो एक सुवर्णक्षण. अशाच एक साहित्यजीवनातील सुवर्णक्षणाचे दर्शन कऱ्हाड साहित्यसंमेलनात घडले.

इचलकरंजी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे आणि कऱ्हाड साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षा दुर्गा भागवत यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि वृत्तीत मूलभूत फरक आहे. थोडक्यात सांगायचे तर दुर्गाबाई या एकांड्या आहेत. त्यांनी आपले ज्ञान, आपला व्यासंग हा मुख्यतः ग्रंथांतून वाढविला आहे. ज्ञानसाधनेतच त्यांनी आपले आयुष्य खर्च केल्याने त्यांना ज्ञानाविषयी योग्य ती नम्रता आणि योग्य तो अहंभाव आहे. पु. ल. देशपांडे यांनी आपला व्यासंग हा अनेक व्यक्तींच्या आणि कलांच्या संपर्कातून वाढविला आहे. आपली

रसिकता, आपली कलासक्ती ही विद्वज्जड होऊ नये याची ते सारखी काळजी घेत असतात. त्यांची शक्ती ही गर्दीतून म्हणण्यापेक्षा रसिक-वृंदातून निर्माण झालेली आहे. ह्या त्या दोहोतील वृत्तिभेदामुळे त्यांची Confrontations होणे हे अनिवार्य आहे. ह्या वर्षी ह्या दोन संमेलनांच्या निमित्ताने ही दोघेही प्रकाशझोतात असल्याने ह्या सामन्याला विशेष रूप प्राप्त झाले. बघ्यांनीही टाळ्या वाजवून आणि टोप्या उडवून त्यात रंग भरला आणि कऱ्हाडला हा अध्यक्षीय अधिकार–प्रदानाचा सोहळा कसा काय होतो ते पाहण्याची अनेकांना उत्सुकता लागून राहिली.

सुदैवाने देशपांडयांनी अधिकारग्रहणाची सूचना करण्यापूर्वीच उद्‌घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी एकंदर कार्यक्रमाला एक महत्त्वाचे वळण दिले. लेखनस्वातंत्र्यावर सद्यःस्थितीत बंधने आली आहेत, त्यामुळे महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या मनात जो क्षोभ निर्माण झाला आहे त्याचा निःसंदिग्ध शब्दांत त्यांनी उल्लेख केला आणि राष्ट्रपतींकडे विश्वासाने पाठविलेल्या एका विनयपूर्ण पत्रकाचा पुनरुच्चार केला. ‘साहित्यनिर्मितीला अत्यावश्यक असलेल्या मोकळ्या वातावरणाला सध्याच्या संशयास्पद परिस्थितीत धोका निर्माण झाला आहे व तो म्हणजे लेखनस्वातंत्र्यावरील निर्बंध हा होय. हा निर्बंध आपद्धर्म म्हणून आला आहे. सर्वसामान्य परिस्थिती उत्पन्न झाली, अडचणी कमी झाल्या, वातावरण निवळले म्हणजे लेखनस्वातंत्र्य पूर्ववत राहील अशी आशा पोटाशी बाळगूनच राष्ट्रपतींना हे नम्र निवेदन दिले आहे. कित्येक वेळा उपायच दुरुपाय ठरतात, आपत्काल तात्कालिक न ठरता कायमचा मुळे रोवून बसतो. लोकशाहीचा धोका दूर करण्याकरिता जे उपाय योजिले जातात, तेच उपाय कित्येकदा लोकशाहीलाच दूर ठेवू शकतात, हे काही लोकशाही ध्येयाची निष्ठा असलेल्या सत्ताधाऱ्यांना सांगावयास नको. कारण त्यांना ते स्पष्टच दिसत असते. आपले सध्याचे सत्ताधारी लोकशाहीचे अनन्यभक्त आहेत, अशी श्रद्धा आपण बाळगूनच, हे मन उदास करणारे गढूळ हवामान बाजूला जाईल व लेखनस्वातंत्र्याच्या निर्मळ वातावरणात आपण पुन्हा सारस्वत–संसाराचा व्यवहार चालवू शकू अशी आशा बाळगतो. ’ शास्त्रीबुवांचे हे खणखणीत शब्द अजून कानात घुमताहेत.

ह्या नांदीनंतर पहिल्या अंकापासूनच नाटक रंगू लागले. पुलंनी कोणत्याही रीतीने आपल्या आणि दुर्गाबाईंच्या मतभेदांना बगल न देता, दुर्गाबाईंनी आपल्यावर केलेले प्रहार अकारण असले तरी ते ज्या अधिकाराने केले आहेत त्याबद्दल आदर दाखविला आणि अत्यंत नम्रपणे दुर्गाबाईंकडे अधिकारसूत्रे दिली.

ते म्हणाले की पन्नासावे संमेलन हे उत्साही संमेलन होते नि ते त्या थाटात पार पडले; पण आता परिस्थिती बदलली आहे. ॲण्ड नाऊ टू बिझिनेस ! आणि ह्या कामासाठी दुर्गाबाईच योग्य अशा नेता आहेत.

परंतु दुर्गाबाईंशी मिळते घेतले हा या भाषणाचा मुख्य भाग नव्हे तर सहसा ‘नाटक्या’च्या किंवा ‘एंटर टेनर’च्या भूमिकेत वावरणाऱ्या पुलंनी खरोखर अंतर्मुख झाल्याची साक्ष दिली आणि तर्कतीर्थांनी केलेल्या आलापीनंतर ख्यालबांधणीला सुरुवात केली. जेव्हा कोणतीही राजसत्ता, धर्मसत्ता व अर्थसत्ता विचार दडपवण्याचा प्रयत्न करते, तेव्हा अनर्थ ओढवतो अशी त्यांनी इतिहासाची साक्ष काढली.

ह्या पार्श्वभूमीवर दुर्गाबाईंच्या अध्यक्षीय भाषणाला विशेष अर्थ प्राप्त झाला. दुर्गाबाईंचे भाषण हे आधीच तयार केलेले, छापलेले भाषण. त्यात साहित्य, भाषा, समाजकारण इत्यादि अनेक प्रश्नांचा सूत्ररूपाने विचार सांगितलेला. उपचार म्हणून हे भाषण जरी वाचले गेले तरी खरे तर स्वस्थ चित्ताने वाचून त्यातील मुद्द्यांबद्दल चिंतन करावे असे भाषण. परंतु ते लक्षात राहिले ते मुख्यतः तीन कारणांनीः सुरुवातीलाच दुर्गाबाईंनी जे स्वागताध्यक्षांना उत्स्फूर्त उत्तर दिले त्याचा मथितार्थ समजून घेण्यासारखा आहे. यशवंतरावांनी आपल्या भाषणात साहित्याच्या समाजाभिमुखतेसंबंधी जो विचार मांडला त्याविषयी दुर्गाबाईंचा मतभेद नव्हता. परंतु ब्रीदवाक्ये किंवा घोषवाक्ये यांच्या मागे लागण्याची सामान्य जनाची जी प्रवृत्ती त्याविषयी दुर्गाबाई धोक्याचा कंदील दाखवीत होत्या. त्यांच्या भाषणाचा दुसरा विशेष म्हणजे त्यांचा पूर्वसूरींचे ऋण मान्य करण्याविषयीचा अट्टाहास. राजवाडे आणि चिं. वि. जोशी ज्या पदावर बसू शकले नाहीत त्या पदाच्या पायऱ्या चढताना आपला होत असलेला संकोच त्यांनी व्यक्त केलाच; शिवाय काहीसा विद्वज्जड भाषणाचा धोका पत्करूनही त्यांनी आपल्या प्रत्येक विचाराचा मूळ स्रोत दर्शविला. त्यांच्या अध्यक्षीय भाषणातील सर्वांत महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांनी सांगितलेले लेखकांच्या निर्मितिस्वातंत्र्याचे महत्त्व. यात त्यांनी सद्यःस्थितीचा उल्लेख केलाच; परंतु त्याला राजकारणाचे स्वरूप येऊ न देता, लेखकाला त्याच्या स्वतःच्या जबाबदारीची देखील जाणीव करून दिली. राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक बंधनांबरोबरच त्यांनी लेखक अज्ञानामुळे किंवा भ्याडपणामुळे स्वतःवर घालून घेत असलेल्या बंधनांचाही निषेध केला. ‘ जो निर्माणकार, त्याला निर्मितीसाठी एकटंच जाणं प्राप्त होतं. त्याची व्यथा, वेदना, शोक सारं काही त्यालाच सोसावं लागतं. जीवनातल्या संकटांबरोबर झुंजताना तडजोड त्यानं केली तर कदाचित भौतिक स्वास्थ्य त्याला मिळेल, कदाचित मानसिक निर्धास्तपणा मिळेल; पण निर्मिती कोंडून त्याला सुख निश्चित मिळणार नाही आणि मोठ्या श्रेयाला तो मुकेल. पुढच्या पिढ्यांच्या भवितव्याचीच हानी तो करील ! ’

इथे पहिला अंक संपला.

रविवारी सकाळी पूर्वाध्यक्षांच्या सत्कारप्रसंगी ह्या नाट्याला पुन्हा रंग चढला. आज हयात असलेल्या अशा पूर्वाध्यक्षांपैकी फक्त सात हजर होते. त्यांचा शाल आणि श्रीफल देऊन सत्कार करावयाचा होता. दुर्गाबाईंनी प्रत्येक अध्यक्षाविषयी थोडक्यात मार्मिक आणि औचित्यपूर्ण परिचय करून दिला. त्यात दुर्गाबाईंची गुणग्राहकता तर दिसून आलीच, शिवाय ज्या गुणांबद्दल त्यांची विशेष ख्याती नाही असे विनोदबुद्धी आणि फड जिंकण्याची हातोटी हेही गुण त्यांच्यांत दिसून आले. सर्वांत शेवटी पु. ल. देशपांडे यांचा सत्कार करताना दुर्गाबाईंनी सर्व मतभेदांचा निचरा करून नेमके विचारस्वातंत्र्याविषयीच्या मतैक्यावर बोट ठेवले. पुलंवर प्रहार केल्यानं जर ते अंतर्मुख झाले तर हार दिल्याने किती तरी अधिक काम होईल असे सांगून त्यांनी आपण पुलंना कोटिबाजपणाला साथ देऊ शकतो हे दाखविले. लगेच गंभीर होऊन त्यांनी आवाहन केले की लेखकाच्या मनात सद्यःपरिस्थितीविषयी जी व्यथा आहे त्याचा तर्कतीर्थ आणि पुलंनी उल्लेख केला. ह्या परिस्थितीत ज्याला जे जे जमेल ते ते त्याने करावे; पण एकदा उचललेले पाऊल मागे घेऊ नये.

**पृष्ठ ३२ वर**

# फ्रॉम रशिया विथ लव्ह

किरील लाकोटा, जेमतेम पन्नास वर्षांचा असला तरी व्हॅटिकनमध्ये पोप निवडला गेला. आधीचा पोप वारल्यानंतर पोपच्या पदासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून ख्रिश्चन कॅथॉलिक धर्माचे कार्डिनल्सला आले होते. ते एकूण पंच्याऐंशी होते. सगळ्यात म्हातारा ब्याण्णव वर्षांचा होता तर सगळ्यात तरुण पन्नासचा होता न् तो किरील लकोटा. जन्मानं स्लाव. रशियातला.

तो निवडून यायच्या मागे म्हातारा कार्डिनल रिनाल्डी होता. चार म्हातारे पोप दफन केल्यानंतर तो त्याच्या ह्यातीत पुनः कुणा पोपला मरताना पाहू शकत नव्हता. सगळ्या कार्डिनल्समध्ये तो वरिष्ठ आणि अधिकार चालवू शकेल असा होता. पोपच्या पदासाठी आलेल्या प्रत्येकाकडून निवडणुकीपूर्वी त्यानं गुप्तपणे शपथ घेववली– पोपपद प्राप्त झाल्यानंतर कोणत्याच धर्मविहीन देशाचं तो हित पाहणार नाही.

रिनाल्डीला किरिल लाकोटाची सगळी कहाणी माहिती झाली होती. त्याच्या देशात वयानं कमी असूनही तो कॅथॉलिक चर्चचा नेता म्हणून निवडला गेला होता; पण रशियाचे जर्मनीशी युद्ध संपल्यावरोबर त्याला इतर सहा पाद्र्यांसोबत कैद करण्यात आलं आणि पूर्वेकडे सैबेरियात पाठवण्यात आलं. सतरा वर्षं त्याला यमयातना देण्यात आल्या. केवळ प्रभूच्या प्रार्थनेनं त्याला बळ दिलं. रिनाल्डीला त्याला पाहताच वाटलं होतं पोपच्या जागेसाठी किरील लाकोटाच लायक आहे. त्यानं तोच निवडून यावा म्हणून प्रयत्नांची शर्थ केली. त्यानं त्याच्या मित्रांकडून, कार्डिनल लियॉनकडून सूतोवाच करवलं. सगळ्या कार्डिनल्सला उद्देशून लियान म्हणाला, 'आज आमच्यामध्ये एक असा माणूस आहे ज्याची ह्या पदासाठी ईश्वरानं आधीच नियुक्ती केली आहे. प्रभूनं त्याला कारावास आणि दास्यातून मुक्त करून इथं पाठवलं आहे. मी पोपच्या पदासाठी किरील लाकोटाचं नाव घोषित करतो...'

रिनाल्डीनं अनुमोदन दिलं. त्यानंतर एकेक करून साऱ्यांनी अनुमोदन दिलं आणि किरील लाकोटा पोप म्हणून निवडून आला.

आणि एके दिवशी त्याच्या हातात एक पत्र पडलं. पत्रात सूर्यफुलांची काही बीजं आणि माती होती. कामेनेव्ह नावाच्या रशियन अधिकाऱ्यानं ते पत्र लिहिलं होतं–' मला माहीत नाही ही बीजं रोमच्या मातीत मुळं धरतील की नाही ? परंतु तू थोडी रशियातील माती बीजासोबत तिथल्या मातीत टाकशील तर शक्य आहे, कदाचित पुढच्या उन्हाळ्यापर्यंत सूर्यफुलं तरारून उठतील. तुला आठवत असेल– मी एकदा तुला विचारलं होतं, सैबेरियात तुला कोणत्या गोष्टीची उणीव जाणवते ? तेव्हा तू म्हणाला होतास– युक्रेनच्या सूर्यफुलांची ! आणि तेव्हा मला तुझा द्वेष वाटला. मत्सर वाटला. कारण मलाही तीच उणीव जाणवत होती. त्या बर्फाळ प्रदेशात तू आणि मी– आपण दोघंही निर्वासितच होतो ना ? तू अजूनही निर्वासितच आहेस. मी माझ्या देशात अधिकाराच्या जागेवर आहे. मातृभूमीची सेवा करतो आहे...' पत्र वाचतावाचता किरील लाकोटा थांबला.

त्याच्या डोळ्यांपुढे कॉमेनेव्ह दिसू लागला. तो सैबेरियात यातनाशिबिरात गेला तेव्हा तो शिबिराचा अधिकारी होता. क्रूर प्रशासक म्हणून त्याची ख्याती होती. त्याच्या सोबत कैद केल्या गेलेल्या सहा पाद्र्यांनी इहलोकची यात्रा केव्हाच संपवली होती; पण किरील लाकोटाची जीवनेच्छा भयंकर होती. कॉमेनेव्ह त्याचा छळ करीत होता. यातना देत होता. प्रश्नांची सरबत्ती करीत होता अन् त्या साऱ्या परिस्थितीतही किरील मंदस्मित करायचा. त्याला आतून तशी शक्ती प्राप्त होत होती. त्याच्या ओठावर येशूची प्रार्थना असायची. आधी कॉमेनेव्ह त्याची, धर्माची खिल्ली उडवायचा. त्याची मार्क्सवादी तत्त्वं त्याच्यावर थोपायचा; पण त्याची जीवनेच्छा पाहून तोही चकित झाला. त्यानं त्याच्याशी त्याचा व्यवहार बदलला. सतरा वर्षांत किरील लाकोटा किंचितही बदलला नव्हता. शेवटी कॉमेनेव्ह त्याला म्हणाला– तुला स्वतंत्र होता यावं म्हणून मला एका दुसऱ्या कैद्याला मारून टाकावं लागलं आहे. मला तुझं स्वातंत्र्य हवं आहे. तू जाऊ शकतोस. स्वतंत्र आहेस. मेलेल्या




माणसाचं नाव तुला धारण करावं लागेल. एक दिवस ह्या साऱ्यांची किंमत मागायला मी तुझ्याजवळ येईन आणि तू ती देशील. मग किंमत काहीही का असेना !

त्याच्यापुढे त्याच कॉमेनेव्हचं पत्र होतं. ज्यानं कधी सैबेरियाहून पळून जायला त्याला मदत केली होती. पत्रात पुढं लिहिलं होतं—

' पोप झाल्याबद्दल अभिनंदन ! मी तुला जाऊ दिलं त्याचं कारण मी तुझं वैचारिक स्थित्यंतर करू शकलो नाही हे नाही. कदाचित अजूनही आम्हाला एकदा दुसऱ्याला मदत करता येईल. आम्ही आमच्या देशाला नव्या विचारांनी फार पुढे घेऊन गेलो आहोत. तरीही तलवारीच्या घेऱ्यात आहोत. अमेरिका आम्हाला भिते. चीन आम्हाला पसंत करीत नाही. तुझ्यासाठी मी धर्मद्वेष्टा, येशूद्वेष्टा आहे. माझी जी धारणा, जो विश्वास आहे तो तुला पसंत नाही. मला माहीत आहे आज तुझ्याही हातात प्रखर शस्त्र आहे अन् मला आशा आहे आपल्या मातृभूमीच्या विरुद्ध तू त्याचा उपयोग करणार नाहीस. जेव्हा ही सूर्यफुलं फुलतील तेव्हा आपल्या मातृभूमीचं, रशियाचं स्मरण कर. मला तर तू खचितच विसरणार नाहीस !'

आणखी काही दिवस गेलेत. कॉमेनेव्हचं पुनः पत्र आलं.

' होऊ शकतं. वर्षभरात युद्धाला सुरुवातही होऊन जाईल. इतिहासचक्र मला भेडसावीत आहे. प्रवाहाची दिशा मला बदलता येत नाही. मी शांतिप्रिय आहे. माझी मनीषा तू अमेरिकेच्या राष्ट्रपतीपर्यंत पोचवावीस आणि त्यांची प्रतिक्रिया कळवावी; परंतु ही बाब अत्यंत गुप्त राहायला हवी. '

किरीलनं त्याच्या धर्माधिष्ठित अधिकारात नैतिकदृष्टचा जे करता येण्यासारखं होतं ते केलं. कॉमेनेव्हची पत्रं अमेरिकेच्या राष्ट्रपतीपर्यंत पोचलीत.

चर्चची एक परंपरा आहे. कर्तव्य आणि जबाबदाऱ्या ह्यांच्यात राजकारणाला वाव नाही; पण विश्वशांतीसाठी धडपड करणे अगत्याचे आहे. चर्चची आज जबाबदारी काय, उत्तरदायित्व काय हे पुनः नव्या संदर्भात नव्याने सांगायला पाहिजे. त्यानं सगळ्या कार्डिनल्सना बोलावलं. भाषण दिलं. आज जेव्हा जग युद्धाच्या वणव्यात पेटू पाहात आहे तेव्हा चर्चची भूमिका काय असावी हे प्रतिपादन केलं, ' चर्च काय आहे ? त्याचं अधिकारक्षेत्र काय आहे ? रोममधल्या एका जमिनीच्या तुकड्यावर उभी असलेली एक वैभवसंपन्न वास्तु ? आज आम्हाला इतिहासाचा प्रवाह बदलायचा आहे. आम्हाला मानवाच्या हृदयसाम्राज्यावर राज्य करायचं आहे. ज्यामुळं जी व्यवस्थेची तो स्थापना करणार आहे. ही व्यवस्था सत्य, न्याय आणि नीती ह्यांवर आधारित राहील. विसाव्या शतकाचं आव्हान आम्हाला स्वीकारायचं आहे. तुम्हाला हे मान्य आहे ना ? '

एकेक करून साऱ्यांनी अनुमोदन दिलं. त्याच्या नवीन विचारांना रूढीवादी कार्डिनल्स एवढ्या लवकर दाद देतील अशी अपेक्षा नव्हती. त्यानं विरोधाचीच अपेक्षा केली होती.

त्यानंतर मात्र सारे बाहेर निघून गेले.

किरील लाकोटा तिथं एकटाच राहिला. निर्णयाच्या प्रत्येक क्षणी तो एकटाच राहिला होता. साऱ्या गर्दीतही एकटाच होता.

भिंतीवर मायकेल एंजेलोचं चित्र होतं. ' जजमेंट '

साऱ्यांनी दिलेल्या समर्थनाचा अर्थ त्याला त्या चित्राकडे पाहता पाहता गवसू लागला.

निर्णयाचा क्षण आला आहे. त्याला पुढं जायचं आहे अन् त्याच्या ओठांवर प्रार्थना आलीय्.

हे प्रभो शक्ती दे...वाइटापासून रक्षण कर !

—झिरो-झिरो-सेव्हन

[ मॉरिस वेस्टच्या कादंबरीच्या आधारे ]


**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
पोष्ट : कतरीसराय ( गया )


# वृत्तपत्रे

## लिपमनचा आदर्श

वा. दा. रानडे

वृत्तपत्रांची जुनी कात्रणे चाळत असता विख्यात अमेरिकन पत्रपंडित वॉल्टर लिपमन यांनी दहा वर्षांपूर्वी केलेले एक भाषण त्यात आढळले. लंडनच्या इंटरनॅशनल प्रेस इन्स्टिटयूटमध्ये त्यांनी हे भाषण केले होते. वृत्तपत्रस्वातंत्र्यासंबंधी काही मूलगामी विचार त्यात मांडले आहेत. त्यातील महत्त्वाचे मुद्दे आणि त्या अनुरोधाने माझे काही विचार मांडीत आहे.

लिपमन या भाषणात म्हणतात, ' विचारप्रकटनाचा हक्क एवढेच काही वृत्तपत्रस्वातंत्र्याचे मूलभूत तत्त्व नव्हे. ज्याला कोणी वाचक नाहीत असे वृत्तपत्र छापल्याने कोणाही पत्रकाराचे समाधान होणार नाही. ' वृत्तपत्र म्हणजे संपादक आणि वाचक यांच्यातील संवाद असतो हेच लिपमन यांना सूचित करावयाचे आहे. एका वृत्तपत्रास प्रतिस्पर्धी असलेली दुसरी वृत्तपत्रे वाचकांना जेथे वाचायला मिळतात त्यांच्या अग्रलेखातील टीका, बातम्या यांची तुलना छाननी करता येते, तेथेच वृत्तपत्रस्वातंत्र्य अस्तित्वात असते. वृत्तपत्रांवरची मक्तेदारी वृत्तपत्रस्वातंत्र्याशी विसंगत आहे. रेडिओ, टेलिव्हिजन, मासिके, पुस्तके, जाहीर सभा यांसारख्या जनतासंपर्कसाधनांची जेथे मक्तेदारी असते तेथे स्वातंत्र्य गमावलेले असते. वाचकाला केवळ विविध वृत्तपत्रे वाचावयाला मिळणे पुरेसे नाही. या वृत्तपत्रांत खऱ्या अर्थाने विविधता असली पाहिजे. विचारप्रकटनाचे स्वातंत्र्य त्यात दिसले पाहिजे. एकाच ठशाच्या बातम्या व अग्रलेख वृत्तपत्रात असले तर वाचकाला वाटेल एक वृत्तपत्र वाचले तरी पुरे. सगळीकडे तेच आहे ' याचा अर्थ वृत्तपत्रांना विविध

मते मांडण्याची मोकळीक हवी आणि बातम्यांतील विविधतेसाठी बातम्या देणाऱ्या संस्थाही विविध हव्यात. सरकारी नियंत्रणाखालील एकाच सस्थेकडेही मक्तेदारी नसावी.'

टीकेचे आणि विश्वसनीय बातम्यांचे महत्त्व विशद करताना लिपमन म्हणतात, 'टीकेशिवाय आणि विश्वसनीय बातम्यांशिवाय सरकार कारभार करू शकणार नाही. देशातील लोकांचे विचार काय आहेत, ते काय करीत आहेत, त्यांना काय हवे आहे याची माहिती मिळविण्यासाठी त्याशिवाय दुसरा मार्ग सरकारपुढे नाही. चांगले कायदे करण्यासाठी, चांगला कारभार करण्यासाठी जे ज्ञान सरकारला हवे ते पुरविण्यास सरकारजवळची अत्यंत कार्यक्षम गुप्तहेरयंत्रणासुद्धा अपुरी पडेल.'

लोकांचा जाणून घेण्याचा हक्क आणि सरकारचा एखादी माहिती गुप्त राखण्याचा हक्क यांच्यातील संघर्षाबाबत लिपमन म्हणतात, 'हा संघर्ष एक प्रकारे निरंतरचा आहे असे मला वाटते. कारण ज्याच्या आधारे तो सोडविता येईल असे निश्चित तत्त्व सांगता येणार नाही. सरकार कोणती घोषणा करणार आहे, कोणते धोरण अवलंबणार आहे, कोणाची नेमणूक करणार आहे. परदेशांशी कोणत्या प्रकारचे संबंध ठेवणार आहे, यासंबंधीची माहिती बातमीदाराने आधीच उघड करावी की नाही यासंबंधी सरकारी अधिकारी आणि बातमीदार यांच्यात माझ्या देशात नेहमीच संघर्ष असतो. तसेच ज्या घटना घडल्या त्या का घडल्या, त्यांना कोण जबाबदार यासंबंधीची माहिती प्रसिद्ध करण्याबाबतही त्यांच्यात संघर्ष असतो. जागरूक, चौकस बातमीदार बातमीसाठी अधिकाऱ्यांच्या नेहमी मागावर असतात.'

वृत्तपत्रस्वातंत्र्याची कल्पना अठराव्या शतकातील सोप्या कल्पनेपेक्षा आता बरीच पुढे गेली आहे असे सांगून लिपमन म्हणतात, 'मानवजातीच्या सर्व कार्यक्षेत्रातील हालचालींची बातमी देणे, या हालचाली विशद करणे, त्यांचा अर्थ लावणे आणि त्यांवर टीका करणे या सर्व गोष्टी आजच्या वृत्तपत्रांनी केल्या पाहिजेत अशी आपली अपेक्षा असते. प्रत्येक वृत्तपत्राचा प्रत्येक वाचक या सर्व हालचाली जाणून घेण्याचा प्रयत्न करतो किंवा त्याला त्या समजतात असे नव्हे; पण काही वाचकांनी विशिष्ट विषयावर खास वाचन केलेले असते. त्यांना त्या क्षेत्रातील नव्या महत्त्वाच्या घडामोडींची माहिती देण्याचे कर्तव्य वृत्तपत्रांना करावे लागते. खगोलविज्ञान, सूक्ष्म जीवशास्त्र यांसारख्या शास्त्रातील नव्या शोधांची माहितीही वृत्तपत्रांना द्यावी लागते सुशिक्षित माणसाला एखाद्या विषयाचे तरी संपूर्ण ज्ञान आणि प्रत्येक विषयाचे थोडे ज्ञान असले पाहिजे हे मी कॉलेजमध्ये असताना शिक्षणाचे उद्दिष्ट होते. आज वृत्तपत्रांना या अपेक्षा पूर्ण कराव्या लागत आहेत. याचा एक परिणाम म्हणजे कोणत्याही क्षेत्रातल्या तज्ज्ञाकडून जी बौद्धिक शिस्त आणि ज्ञानाची अपेक्षा केली जाते ती वृत्तपत्रांकडून केली जात आहे.' आपल्याकडचीच नव्हे तर अमेरिकेतील सुद्धा फारच थोडी वृत्तपत्रे या कसोटीला उतरतील. रंजक, रोचक, खळबळजनक बातम्या देण्यावरच बहुतेक वृत्तपत्रांचा भर असतो. अशाच बातम्या वाचण्याची सवय झाल्याने वाचकही अशाच बातम्यांची वृत्तपत्रांकडून अपेक्षा करू लागला आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळात वृत्तपत्रांनी ध्येयवादाचा उदात्त आदर्श पुढे ठेवला; पण आज या उद्दिष्टनुसार चालविली जाणारी स्वतंत्र बाण्याची वृत्तपत्रे फार थोडी आढळतात.

'पत्रकारावर अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या असतात. आपल्या वृत्तपत्राचा खप सतत वाढत राहील अशा पद्धतीने ते चालविणे, आपल्या राजकीय पक्षाचा प्रसार करणे, आपल्या सरकारच्या धोरणांचा पुरस्कार करणे अशा अनेकविध जबाबदाऱ्या त्याला पार पाडावयाच्या असतात; पण सत्याचा शोध हे आपले सर्वांत श्रेष्ठ कर्तव्य आणि जबाबदारी आहे हे त्याच्या मनाला एकदा पटले की बाकी सर्व जबाबदाऱ्या मग तो दुय्यम लेखतो.' असे लिपमन यांनी या भाषणात सांगितले. सत्याचा शोध हा मोठा आदर्श लिपमन यांनी पत्रकारांपुढे ठेवला आहे. या ध्येयाने भारलेला पत्रकार मग कोणत्याही दडपणामुळे नमत नाही. ही ध्येयवादी जिद्दच मग वॉटरगेट-प्रकरण धसास लावते आणि अमेरिकेच्या अध्यक्षास राजीनामा देणे भाग पडते.

सनसनाटी पत्रव्यवसाय आणि जबाबदार पत्रव्यवसाय यासंबंधी लिपमन या भाषणात म्हणतात, 'पहिला उघड दिसणारा संघर्ष म्हणजे बहुसंख्य वाचकांना ज्यात रस वाटतो ते छापावयाचे (म्हणजेच सनसनाटी पत्रव्यवसाय) की आर्थिक हानी झाली तरी चालेल; पण समाजाचे लांब पल्ल्याचे हित ज्यात आहे असे साहित्य प्रसिद्ध करावयाचे हा दुसऱ्या प्रकारचा पत्रव्यवसाय म्हणजे जबाबदार पत्रव्यवसाय.'

'सत्याच्या शोधाचे आपले व्रत चालू ठेवावयाचे आणि सत्ताधीशांशी, अधिकारपदी असणारांशी चांगले संबंध ठेवायचे हा संघर्षही आजच्या पत्रकारांना करावा लागत आहे. अधिकारपदी असणारी ही मंडळी म्हणजे बातमी मिळविण्याचे महत्त्वाचे साधन असते. अनेक प्रकारच्या सवलती व मानसन्मानांची खैरात करणेही त्यांच्या हाती असते. सत्तेचा गड चढताना दाखविली जाणारी उघड व सुप्त आमिषे हे आधुनिक पत्रकाराच्या जगातील भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे रूप आहे. अनेक प्रकारचे मोह, प्रलोभने त्याच्या वाटेत असतात. त्यातली काही साधी तर काही लक्षात न येणारी असतात आणि आपण या प्रलोभनांना बळी पडल्याचे काही वेळा लक्षातही येत नाही. सतत जागरूक राहणे हाच त्यातून बचावाचा मार्ग आहे.' असा इशारा लिपमन यांनी या भाषणात पत्रकारांना दिला आहे.

आपल्या भाषणाच्या अखेरीस लिपमन म्हणतात, 'सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शास्त्रज्ञ किंवा विज्ञानाप्रमाणे सत्याला पहिले स्थान देण्याची पत्रकाराची तयारी आहे का? सत्याला तो दुय्यम स्थान देणार असेल तर तो यशोदेवतेचा पुजारी आहे असे म्हणावे लागेल. सत्याला त्याने पहिले स्थान दिले तर आयुष्यातील सर्वांत चांगल्या गोष्टी अनुभवणाऱ्या लोकांच्या संगतीत तो जाऊन बसेल.'

आज दहा वर्षांनंतरही हे विचार मौलिक वाटतात.

(लिपमन यांचे या लेखात उल्लेखिलेले विचार 'इंडियन एक्सप्रेस'च्या ३१ मे व २ जून १९६५च्या अंकात प्रसिद्ध झालेले आहेत.)

□ □

# मुखवटा

सुमती देवस्थळे

कुठलासा सोशल क्लब...कसल्याशा निधी-साठी खास कार्यक्रम आयोजित केलेला ...फॅन्सी ड्रेस...सामुदायिक नृत्य...जल्लोष!

रात्रीचे बारा वाजून गेलेले.. मध्यरात्र ...काही मंडळींनी सामुदायिक नृत्यात भाग घेतला नव्हता, मुखवटे चढवले नव्हते... असे एकंदर पाच बुद्धिमान लोक जवळच्या वाचनालयात एका गोल टेबलाभोवती बसले होते. त्यांची नाके अन् दाढ्या वर्तमानपत्रात बुडाल्या होत्या. वाचन चालले होते...मध्येच डुलक्या येत होत्या अन् अगदी मास्को-पीटर्सबर्गच्या वर्तमानपत्री भाषेत सांगायचे तर ती उदारमतवादी प्रतिष्ठित माणसे 'चिंतन' करीत होती.

नृत्यगृहातून संगीताचे सूर भरभरून वहात होते. वेटरमंडळींची खाद्यपदार्थ इकडे तिकडे नेण्याची लगबग–ते दाराकडे थडकत होते ...बशांचा आवाज...बाहेर अशी मोठी गडबड उडाली होती; पण वाचनालयात मात्र कमालीची शांतता पसरली होती.

इतक्यात, खालच्या पट्टीत गुदमरलेल्या आवाजात कोणी तरी बोलले...धुराड्यातून यावा तसा घुमून घोगरा आवाज आला, 'मला वाटतं, इकडे बरी सोयीची जागा दिसतेय. इकडे या...असे या बाजूने या...हं, या...'

अन् मग एकदम वाचनालयाचे दार उघडले गेले. एक चांगला दणदणीत माणूस आत आला. रुंद खांदे...अंगावर कोचमनचा पोषाख,...टोपीत मोरपीस अन् तोंडावर मुखवटा. त्याच्यामागून दोन बायका आल्या. त्यांनीही मुखवटे घातलेले होते. त्या बायांच्या मागून वेटर...त्याच्या हातात मद्याचा ट्रे... तीन बाटल्या अन् बरेचसे पेले.

'अस्सं ! आता ठीकय्...तिकडल्यापेक्षा इथं कसं निवांत वाटतंय्! अरे, तो ट्रे ठेव टेबलावर. अन् तुम्ही बसा ना दोघीजणी. बसा...अन् अहो ऽ महाशय...व्हा बाजूला ...जागा मोकळी करा...तुमची उगीच अडचण होतेय् आम्हाला.'

इतके बोलून तो जरा पुढे झुकला अन् टेबलावरची मासिके वगैरे त्याने सरळ बाजूला सारून टाकली.

'ठेव तो ट्रे इथे...तुम्ही बाजूला व्हा होऽ ...अहो वाचणारे विद्वान...तुम्हालाच म्हणतोय मी...ही काही वर्तमानपत्रे वाचा-यची अन् राजकारण कुटत बसायची वेळ नाही ...ठेवा ते बाजूला...चला...जा!'

'आपण जरा शांत चित्तानं बोलावं अशी अशी माझी विनंती आहे'...तिथला एक विद्वान आपल्या चाळिशीतून त्या मुखवटे-वाल्याकडे पहात म्हणाला..., हे वाचनालय आहे...हा काही दारूचा गुत्ता नाही ! अपेयपान करण्याची ही जागा नव्हे!'

'असं कोण म्हणतो ? अँ ?...हे टेबल इथे स्थिर रहाणार नाही, का वरचे सीलिंग आमच्या अंगावर कोसळणार आहे ? गंमतच आहे ! पण...मला आता बोलायला वेळ नाही. तुमचं सगळं वाचून वगैरे झालेलं आहे, अन् झालंय् तेवढं खूप झालं ! नाही तरी तुम्ही भयंकर हुषार आहातच. अन् वाचून तुमची दृष्टी बिघडायची ! मुख्य म्हणजे मला ते काही चालायचं नाही...स्पष्टच सांगतो!'

वेटरने टेबलावर ट्रे ठेवला. हातावर फडका टाकून तो दाराशी खडा...दोघी बायांनी प्यायला सुरुवात केली. मोरपीसवाल्यानेही स्वतःच्या पेल्यात मद्य ओतून घेण्यास सुरुवात केली....तो म्हणाला, 'असं पेय घ्यायचं सोडून ही शहाणी माणसं वाचत कशी काय बसतात बुवा ? धन्य आहे ! मला वाटतं, बरं का...अहोऽ...सन्माननीय महाशय... तुम्हाला वर्तमानपत्राची इतकी गोडी वाट-ण्याचं कारण एवढंच, की पिण्यासाठी तुमच्या-पाशी पैसा नाहीय् काय ? बरोबर आहे की नाही ? हॉ हॉ हॉ...बघा बघा...त्या वाचणाऱ्यांकडे बघा एकदा नुसतं !...काय होऽ...काय लिहिलंय त्या वर्तमानपत्रात ? तुम्ही...अहो चष्मीष्ट...काय हो...सांगा ना, आम्हालाही काही माहिती सांगा ! हॉ हॉ हॉ ...बस करा हो...पुरे झाला फालतूपणा... चला घ्या...तुम्हीही घ्या...' इतकं बोलून तो मोरपीसवाला उठला अन् त्याने चष्मि-स्टाच्या हातातले वर्तमानपत्र टरकावून टाकल. चष्मिस्ट संतापाने लालेलाल झाला...त्याचा चेहरा पडला...इतरांची प्रतिक्रिया अज-मावण्यासाठी त्याने आपल्या बरोबरीच्या बुद्धिमंतांकडे पाहिले. तेही संतापलेले दिसले. मग तो ओरडला, 'महाशय...तुम्ही स्वतःला विसरता आहात! या वाचनालयाचा गुत्ता बनवता आहात...किती गोंधळ माजवताय् ...दुसऱ्याच्या हातातलं वर्तमानपत्र फाडायला तुम्हाला काही वाटत नाही का ? मला हे असलं वागणं बिलकुल खपायचं नाही. तुम्हाला माहीत नाही...पण सांगतो, महाशय, मी बँकेचा मॅनेजर आहे, समजलात ! बँकमॅनेजर झेस्टेकॉव्ह !'

'असानात का झेस्टेकॉव्ह ?...मला त्याची कवडीइतकीसुद्धा किंमत नाही अन् वर्तमान-पत्राविषयी मला काय वाटतं ते पहायचंय ? पहाच आता!'...इतके बोलून त्याने वर्तमान-पत्र धरले अन् टरटरा फाडून त्याच्या चिंध्या करून टाकल्या.

'याचा अर्थ काय ?' झेस्टेकॉव्ह घुसमटून ओरडला. रागाने तो जवळजवळ स्तंभित झाला होता...तोंडातून शब्द फुटत नव्हता ...'किती भयंकर...चमत्कारिक...खरोखर अगदी चीड येतेय...

'आता मात्र हे संतापले आहेत बरं का !' तो माणूस खदखदा हसत म्हणाला. 'अरे बाप रेऽ...किती घाबरलो हो मी तुम्हाला! ...बघा बघा, माझे गुडघे बघा कसे थरथर कापताहेत नुसते !...हे बघा, अहो सन्मान-नीय महाशय,...विनोदाचा भाग सोडून द्या! मला तुमच्याशी बोलण्याची अजिबात इच्छा नाही. हे बघा, मला या दोघींच्याबरोबर एकांत पाहिजे आहे...जरा चैन करायची आहे. तेव्हा कृपा करून आता त्रास देऊ नका. इथून तावडतोब निघून जा कसे! ते तिकडे दार आहे बघा...अहो श्रीयुत बेलेबुकिन... तुम्ही का म्हणून अस्तन्या सावरताय ? मी तुम्हाला जायला सांगतोय ना ? जा...क्विक् मार्च...चालते व्हा!'

'काय म्हणालात ?' बेलेबुकिन ओरडले. ते एका अनाथ मुलांच्या कोर्टाचे खजिनदार होते. संतापाने खांदे उडवीत जोरजोराने बोलत होते, 'म्हणजे मला हे समजत नाही,

की एक उन्मत्त माणूस धाडकन खोलीत येतो अन् अचानक वाटेल ते बरळतो याचा अर्थ काय ?'

'मला उन्मत्त माणूस म्हणालात काय ?' मोरपीसवाला ओरडला. तोही रागाने थरथरत होता. टेबलावर जोरजोराने मुठी आपटत होता–त्यापायी पेले खाली कोसळले. 'तुम्ही कुणाला बोलता आहात याची काही कल्पना आहे का तुम्हाला ? मी मुखवटा घातलाय म्हणजे मला काय वाटेल ते बोललं तरी चालेल असं वाटलं की काय तुम्हाला ? अन् तुम्हीसुद्धा तिरसिंगराव नाही का ? मी सांगतोय जा–म्हणजे तुम्ही तावडतोब चालते झालेच पाहिजे ! जा-सगळेजण चालायला लागा! तुमच्यापैकी एकही बदमाश इथे उरता कामा नये ! चला, बाहेर जा–आपल्या खुराडयाकडे चालायला लागा...'

'कुठे जायचं, ते आम्ही पाहून घेऊ !' झेस्टेकॉव्ह म्हणाला...संतापामुळे जणू त्याच्या चष्म्यालासुद्धा घाम फुटला होता. 'आता तुम्हाला दाखवतोच काय ते ! जा रे आजच्या समारंभातल्या एखाद्या संयोजकाला बोलावून आणा... !'

मिनिटभरात समारंभाचा एक कार्यकर्ता हजर झाला. लालसर केस–वाहीशी बांधलेल्या निळ्या रिबिनीशी चाळा... नाचण्याच्या श्रमाने थकलेला–धपापणारा... तो आला अन् म्हणाला, 'हे पहा, कृपा करून ही खोली सोडा. ही जागा काही पिण्यासाठी नाही. तुम्हाला हवे तर रिफ्रेशमेंटरूममध्ये जा–प्लीज...!'

'अरेच्च्या.. अन् तुम्ही कुठून मध्येच उपटलात हो ? मी काही तुम्हाला नव्हतं बोलावलं ! बोलावलं होतं ?'

'फुकट मग्रुरी चालायची नाही.–कृपा करून तुम्ही जा बघू कसे !'

'असं बघा, अहो सद्‌गृहस्थ, मी तुम्हाला बरोबर एक मिनिट वेळ देतो. तुम्ही पडलात इथले अधिकारी...तेव्हा तुम्हाला सांगतो– या सगळ्यांना इथून तावडतोब निघून जायला सांगा पाहू ! या माझ्याबरोबर आलेल्या बायांना असली अनोळखी माणसं अवतीभोवती असलेली आवडत नाहीत–त्यांना लाज वाटते. मला माझ्या पैशाचा मोबदला हवाय. त्यांना नैसर्गिक स्थितीत पहाण्याची...

'हा काही बदमाशांचा अड्डा नाही अन् एवढं काही या अडाण्याच्या डोक्यात शिरत नाहीय.' झेस्टेकॉव्ह ओरडला. 'येव्हस्ट्रेट स्पिरिडोनिच्‌ला बोलवा बघू !'

लगेच सर्व क्लबभर धावाधाव–सगळीकडे आवाज उठला, 'कुठे आहे येव्हस्ट्रेट स्पिरिडोनिच् ?' त्याला तावडतोब बोलावलंय्... '

तावडतोब पोलिसी गणवेषातला येव्हस्ट्रेट स्पिरिडोनिच् हजर झाला. आपले भयंकर डोळे गरागरा फिरवीत, मिशांची टोके उडवीत, कर्कश स्वरात तो ओरडला, 'कृपा करून खोलीबाहेर व्हा !...'


'अरे वा !' खूप घाबरवलंत बाबा तुम्ही मला !' मजेत हसत तो मुखवटेवाला म्हणाला, 'हो खरंच घाबरवलंत हं ! देवाला स्मरून सांगतोय...वा वा ! काय दिसताय तुम्ही...अगदी विनोदी दिसता बरं का ! अरे बापरे...हसून हसून अगदी मरायची वेळ आली बाबा ! तुमच्या या वोक्यासारख्या मिशा, ते गटगटीत डोळे... हा हा हा... !'

'उगीच बकवास नकोय !' रागाने थरथरत हवालदार येव्हस्ट्रेट स्पिरिडोनिच् टीपेच्या स्वरात ओरडला–'तुम्ही आधी बाहेर व्हा, नाही तर तुम्हाला गचांडी मारून चक्क घालवून द्यावं लागेल !'

आरडाओरडयामुळे सगळे वाचनालय दणाणून गेले. येव्हस्ट्रेट स्पिरिडोनिच् रागानं नुसता लालबुंद झाला होता. जोरजोराने पाय आपटून ओरडत होता. बाकीची सगळी बुद्धिमान मंडळी वाद घालीत होती... टीपेच्या स्वरात ओरडत होती; पण मुखवटा घातलेल्या माणसाचा आवाज ढोलासारखा घुमून येत होता अन् त्यात इतरांचे आवाज बुडून जात होते. या वाढत्या गोंधळापायी नृत्य थांबून गेले अन् प्रत्येकाने बॉलरूममधून वाचनालयाकडे धाव घेतली.

आपले काम अत्यंत परिणामकारक अन् निर्दोष व्हावे म्हणून हवालदाराने क्लबच्या आवारातल्या सर्व पोलिसांना बोलावून घेतले अन् मग तो रिपोर्ट लिहायला बसला.

'हं, लिहा सगळं...' पेनखाली आपलं बोट खुपशीत तो मुखवटेवाला म्हणाला. 'आता माझं बिचाऱ्याचं कसं होणार ? बाप रे...मी बिच्चारा...एखाद्या अनाथ



गरिबाचं असं तळपट करायला आपण का बरं सिद्ध झालात ? हा...हा...हा...चालू द्या तुमचं ! झाला का रिपोर्ट तयार ? झाला ? सगळ्यांनी केल्या सह्या ? आता बघा...एक...दोन...तीन... '

तो उठला–सरळ उभा राहिला अन् त्याने आपला मुखवटा टरकावला...चेहऱ्या-वर बेहोषी होती...तरीही आपल्या कृत्याचा इतरांवर काय परिणाम होतो ते पहाण्या-साठी त्याने सभोवार नजर टाकली. मोठ-मोठ्यानं मजलेदार हास्य करीत त्याने धाडकन खुर्चीत अंग लोटून दिले !

तात्काळ प्रत्येकाच्या डोक्यात प्रकाश पडला. हा आडदांड दिसणारा माणूस म्हणजे पॅटिगोरोव्ह या सन्माननीय, श्रीमंत नाग-रिकाचा वंशज ! पॅटिगोरोव्ह हे एक लक्षा-धीश कारखानदार होते. ते आडदांडपणा-विषयी प्रसिद्ध होते, तसेच लोकहिताबद्दल दक्ष म्हणूनही त्यांची कीर्ती होती. गावची वर्तमानपत्रे त्यांच्या शिक्षणविषयक आस्थेचा सतत उल्लेख करीत असत–त्यांची स्तुति-स्तोत्रे अखंड सुरू असायची.

जरा वेळ थांबून पॅटिगोरोव्ह म्हणाला, ' मग ? तुम्ही जाताय ना ?'

बिलकुल आवाज न करता, एक अक्षरही न बोलता, त्या सर्व बुद्धिमान मंडळींनी काढता पाय घेतला. लगेच पॅटिगोरोव्हने दार लावून घेतले.

वाचनालयात मद्य आणून देणाऱ्या वेटरचा खांदा हलवून दबलेल्या आवाजात येव्हस्टॅट स्पिरिडोनिच् म्हणाला, ' काय रे, हे पॅटिगोरोव्ह आहेत, माहीत होतं ना तुला ? मग तू आम्हाला तसं सांगितलं का नाहीस ?'

' तसं सांगायचं नाही, असं त्यांनी आधीच सांगून ठेवलं होतं !'

' अस्सं काय ? बदमाशा, थांब! तुझं थोबाड फोडून काढतो ! ' सांगायचं नाही ' यात काय अर्थ दडलेला आहे हे पक्कं ठाऊक होतं तुला ! - चल चालता हो !'...इतर विद्वज्जनांकडे पाहून पुढे तो म्हणाला, ' अन् तुम्ही मंडळीसुद्धा अगदी कहर करता बुवा ! काय दंगा चाल-विला होता ! जणू काही दहा मिनिटांसाठी वाचनालय सोडणं तुम्हाला अशक्यच होतं ! ठीक आहे ! तुम्ही सगळा गोंधळ केलात,... आता तुम्हीच निस्तरा सगळं काही ! हाय रे देवा ! खरंच, मला तुमची वागण्याची ही तऱ्हा अजिबात पसंत नाही. देवाला स्मरून सांगतो बघा, मला नाही असं वागलेलं आवडत !'

सगळे बुद्धिमान लोक खट्टू झाले. पडेल चेहऱ्याने एकमेकांची नजर टाळीत क्लबभर हिंडत राहिले. त्यांना विलक्षण खेद झाला होता–पश्चात्ताप झाला होता–नजीकच्या भविष्यात काही तरी भयंकर संकट कोसळणार या भीतीनं ग्रासल्यासारखे ते खालच्या पट्टीत एकमेकांशी कुजबुजत होते. पॅटिगोरोव्हचा अपमान झाल्याचं त्यांच्या बायकामुलींना कळताच त्या एकदम गप्प झाल्या–शांतपणे न बोलता आपापल्या घरी निघून गेल्या. नृत्य संपले.

दोनच्या सुमाराला पॅटिगोरोव्ह खोलीच्या बाहेर आला. चिक्कार प्यालेला होता.... झोंकाड्या जात होत्या...तो नृत्यगृहात आला अन् बॅण्डवादकाजवळ बसला. गाण्या-तील स्वरानुसार मान झुकत होती. तो गुंगत होता–अखेर डुलकी–अन् मग चक्क घोरणे सुरू झाले.

' बंद करा रे वाजवणं !...योगोरनिलिच् झोपलेत...बंद करा !...' तिथला एक संयो-जक ओरडला, अन् हात हलवून त्याने वाद-कांना थांबविले.

मग त्या लक्षाधीशाच्या कानाशी वाकून अगदी अदबीने बेलेबुकिन्ने विचारले, ' मी तुम्हाला घरी पोहोचवून देऊ का येगोर-निलिच् ?

' पॅटिगोरोव्हनं आपला ओठ बाहेर काढून वेडावाकडा हालवला- जणू तो आपल्या गालावरची माशीच उडवून देत होता.

पुन्हा बेलेबुकिननं आदराने विचारले, ' आपल्याला घरी पोहोचवून देऊ ?...की आपली गाडी इथे आणायला सांगू ?

' अँ ऽ...काय ? हा ! तुम्ही होय ? काय पाहिजे तुम्हाला ?...'

' तुम्हाला घरी पोहोचवायचं होतं... बराच उशीर झालाय्...म्हणून...'

' घरो ?...हो–मला घरी जायचंय्...न्या मला घरी. ' मग झटदिशी बेलेबुकिनने पॅटिगोरोव्हला उभे केले...आता बेलेबुकिन्चा चेहेरा आनंदाने व अतीव समाधानाने निथ-ळत होता. तात्काळ बाकीची बुद्धिमान मंडळी धावत आली. मंदस्मिताचा अलंकार त्यांच्याही चेहेऱ्यावर खुलत होताच. सग-ळ्यांनी मिळून अतिशय काळजीपूर्वक त्या सन्माननीय नागरिकाच्या चिरंजिवांना उच-लले अन् गाडीपर्यंत अगदी नीट पोहोचविले. त्या धनाढ्याला गाडीत बसण्यास मदत करीत असताना झेस्टिकॉव्ह अगदी प्रसन्न स्वरात म्हणाला, ' एखादा जातिवंत कलावंत किंवा विलक्षण बुद्धिमान माणूसच अशा रीतीनं एकूण एकाचं लक्ष वेधून घेऊ शकतो बरं का ? खरंच सांगतो येगोरनिलिच्, मी अगदी आश्चर्यानं थक्क झालो बघा ! हसू आवरत नाहीय्...अजूनसुद्धा...एकसारखं हसायला येतंय्...हा हा हा...अहो, एखाद्या थिएटरमध्येसुद्धा मी कधी इतका पोट धर-धरून हसलो नसेन !...विश्वास ठेवा, खरंच सांगतोय मी...काय अप्रतिम विनोदबुद्धी ! ...वा वा...ही संध्याकाळ- अगदी अविस्म-रणीय ! आयुष्यात कधीही विसरणे शक्य नाही!...'

पॅटिगोरोव्हची गाडी वळली. सगळ्या बुद्धिमंतांना आनंद झाला–समाधानाने त्यांनी श्वास टाकला...' त्यांनी माझ्याशी हस्तां-दोलन केलं !' झेस्टिकॉव्हने फुशारकी मारली.

' म्हणजे आतां सगळं ठीक झालं ! ते काही आपल्यावर रागावले नाहीत !'

' ह...अशी आशा करू या...' सुस्कारा सोडीत येव्हस्टॅट स्पिरिडोनिच् म्हणाला.... ' तो अगदी बदमाश माणूस आहे...वाईट माणूस आहे...पण आपला उपकारकर्ता आहे, तेव्हा त्याच्याशी फार जपून वागायला हवं !...' □ □


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
परण्ग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

## यल्लम्मा जत्रेचे हे दिवस : आंतरराष्ट्रीय महिलावर्षाची ही अखेर....

# जोगतिणींचे जग

महादेव मोरे

'पोरीला जोगतीण म्हणून सोडायची हाय !' ती म्हणाली.

'पण का ? काय तिनं एवढं पाप केलंय म्हणून त्याची ही कठोर शिक्षा ? चारचौघींसारखं तिचं लग्न का लावून देत नाही तुम्ही ? तिच्या आयुष्याचं का असं वाटोळं करता ? का ?' मी तळमळून विचारत होतो...

पण माझे प्रश्न तिच्यापर्यंत पोहचतच नव्हते. मध्येच कुठे तरी थिजून जात होते... परंपरागत समजुतीच्या-रूढीच्या पोलादी भिंतीवर आदळून हतबल होत होते. एखाद्या मुलीला जोगतीण म्हणून सोडणं किती भयंकर आहे, त्यामुळं त्या मुलीच्या आयुष्याची कशी परवड होते, कशी नासाडी होते, हे मी तिला सांगत होतो; पण तिला ते पटत नव्हतं. एखाद्या वेडचा माणसानं निरर्थक प्रश्न विचारल्यावर त्याच्याकडे जसं पहावं, तसं ती माझ्याकडे पहात होती. मग म्हणाली,

'जोगतीण केल्यावर वाटुलं कसं हुईल ? झालं तर उलट चांगलंच हुईल...यल्लम्माला नवस मागून घेतलाय मी. त्या वख्ताला मूल होत नव्हतं मला. हज्जार नवस केलं खरं, एकबी फळाला येईना. मग यल्लम्माला नवस मागून घेतला, 'आयी, यल्लूबाई, मला मुलबाळं हुं दे; पयला पोरगा झाला तर जोगता म्हणून नि पोरगी झाली तर जोगतीण म्हणून तुझ्या दरबारात सोडते...' पयली पोर्गी झाली. आता ती वयात आली. मग नवस बोल्लाय तसं तिला देवाला सोडाय् नको ?'

'आणि नाही सोडली तर ?'

'न्हाई सोडली तर...? यल्लाम्मा मोठं जागतं दैवत हाय. नवस केल्याला फेडला न्हाई तर जलमाचं वाटुळं हुतंय्. सत्यानास हुतोय...अशी कैक उदाहरणं घडल्यात !'

मला हे सारं पटणं शक्य नव्हतं. एखादं दैवत स्त्री-पुरुषांचा अशा विचित्र प्रकारे बळी घेण्यास उत्सुक असेल, त्यांचं आयुष्यच असं काढून घेऊन त्यांना माणसांतून उठविणे हीच त्याची रीत असेल, हे सर्व माझ्या सुशिक्षित मनाला पटणं शक्य नव्हतं. हे सगळे त्याच्या भक्तांनी केलेले खेळ...पुरुषासारखा पुरुष, पण जन्मभर त्याला चोळी-लुगडं नेसून जोगता बनून बायकांप्रमाणं रहावं लागतं... स्त्रीसारखी स्त्री, पण इतर बायकांच्या वाट्याला येणारं आयुष्य तिला जगता येत नाही. लग्न करून सुखाचा संसार थाटता येत नाही, की चारचौघींसारखं मानाचं सुवासिनीचं जिणं जगता येत नाही अन् मग शरीराची भूक भागविण्यासाठी काही तरी सोय, तडजोड, करावी लागते. दर मंगळवारी-शुक्रवारी प्रत्येक घरासमोर जाऊन 'आकुंदी ऽऽ जोगवा ऽ' म्हणत जोगवा मागून गुजराण करावी लागते.. छे:, छे:, हे सारं भयंकर होतं, फारच भयंकर होतं, विचित्रही होतं...!

एक तपापूर्वी बेळगावच्या 'तरुण भारत' दिवाळी अंकातून, नंतर तीत बरेच फेरबदल करून 'मेनका' मासिकातून प्रसिद्ध झालेल्या व नंतर 'बताशी' या माझ्या कथासंग्रहात समाविष्ट करण्यात आलेल्या 'जोगतीण' या कथेतील वरील उतारा. सत्य घटनेवर आधारलेली ती कथा. कथेतील नायकाप्रमाणे माझ्याही डोक्यात एक वादळ घोंगावत असलेलं...मराठा समाजातील एक कोवळी, देखणी, नीटस मुलगी. जणू मोगऱ्याची कळीच, अशी मोकारलेली. वाटायचं, आपणास बायको लाभावी, तर ती अशीच–शालीन, सुन्दर, पहाताच देवघरात तेवणाऱ्या शांत, तृप्त समईच्या ज्योतीची आठवण व्हावी...तर एके दिवशी तिच्या विधवा आईनं तिला जोगतीण म्हणून देवाला सोडलं...ऐकून मी तीन दिवस बेचैन, अस्वस्थ. डोक्यात एक वादळ...ती अजाण, एवढी-एवढीशी पोर, कुणा भाग्यवंताचा संसार तिनं पाकळी-पाकळीनं फुलविला असता; तिलाच आता दहा जणांखाली देह अंथरीत वारयोषितेचं जिणं जगावं लागणार...माझ्या नजरेसमोर एका निष्पाप जीवाचा बळी घेतला जात होता न् नुसतं पहाणं व तळमळणं हेच माझ्या हाती. १८-१९ चं वय. मी कोता-दुबळा, क्रूर रूढीचा कोयता त्या कोवळ्या जीवांच्या मानेवरून चरचरून फिरला तरी, तो आवरणे, अडविणे माझ्या कुवतीबाहेरचं होतं...तर त्या विधवा बायजानं आपल्या लेकीचा तसा बळी का घ्यावा ? स्वतःच्याच लेकीची दावेदारीण का बनावं ? तर विधवा बायजा जोगतीण. 'झुलवा' लावून घेतलेली. (झुलवा लावून घेणं म्हणजे एखाद्याजवळ लग्नाच्या बायकोगत रहाणं, थोडक्यात, पाट लावून घेणं.) पोटाला पोरं झाल्यावर एक तरी देवाच्या दरबारात सोडायला पाहिजे; मग तो पोरगा असो, पोरगी असो. तर तिला ओळीनं चार पोरीच झाल्या. सोडू या-सोडू या करीत पहिली हुडांगत वाढली, 'जागं' म्हणजे लग्नासाठी मागणं) सांगून येऊ लागलं. एका स्थळाला पसंत पडली. लग्न उडवून टाकलं. तिच्या पाठीवरचीही एक-दोन वर्षांनी न्हाती-धुती

झाली. हीही अशीच फुसुकदिशी कुणाला तरी पसंत पडेल, आई यल्लूबाईचा ( यल्लम्माचा ) रोष ओढवेल, म्हणून घाईगडबडीनं 'देवाला सोडणं;' परंतु जोगत्याचा ताफा आला. ( आपल्या कळपात एक मेंढरू सामील होतंय्, मग मागं का ? ).

बायजाच्या दारात लग्नातल्यागत मांडव. मांडवाच्या मेढीला नारळीच्या झावळ्या, छताला आंब्याचं ढाळं, रात्रभर जागर. चवंडक टांग् टुंग् टंगांग् करत्यालं, तुणतुणं तुंईतुंई. चवंडक तंगव्वाकडं. तुणतुणं सत्यव्वाकडं. 'जग' (रेणुकेचा, यल्लम्माचा, पितळी मुखडा असलेला लांबलचक, पसरट हारा–भोत्याभोर आयने, मोराची पिसं, निरनिराळ्या देवदेवतांच्या मुखवटयांनी सजविलेला.) सांभाळणाऱ्या परसूच्या हातातील टाळेचाही त्यात नाद; न् उपस्थितांची कपाळं, आपल्या गळ्यातील पिशवीनं पिवळीधम्मक करणारा गोरापान व देखणा जोगता–बाळू. ह्या साऱ्यांना एक लय, एक ताल, एक ठेका आलेला. रात्रीचं सारं वातावरण ह्यानं मंत्रभारित आणि सत्यव्वाच्या कमावलेल्या आवाजाचे, गाण्याचे चकाकते मोती ओघळले–

'यल्लुबाई ग माजी आई,
महीमा तुजी थ्वॉर
चहू देशाला कडाका (कीर्ती),
परडी (जोगवा मागायची कुरकू.बुट्टी) घरोघर.
सती सौंदत्ती गड देवा
अवघड डोंगर
तिथं देवी उमटली,
पाण्याचा झरा हाय समोर.
पाण्यामंदी उभी रेणुका,
नेसुन पीतांबर
परशराम बाजुला,
मातंगी हाय हो समोर.
पुजाऱ्यानं पुजा बांधली,
पुजा बरोबर
झेंडू फुलांच्या माळा,
गळ्यामंदी फुलांचा गजबार (गर्दी)
माहेरघराला पालखी निघाली,
आनंद अवतार
बहु दूरचे लोक येती,
करती नमस्कार
कोकटनूरामदी देसाई
करतोय् म्हायार
करून चौळीपातळ,
जोगत्याला वाटी पनियार (आयार)
तिथनं पालखी निघाली
हलगीच्या जोडावरोबर (संगतीनं)
मरीआई म्होरं पालखी निघाली,
दिवस सव्वा पार
अगिनकिचाला (अग्निकुंडाला) चालली रेणुका,
सरती मागंम्होरं
खारीक-खोबरं, केळी-नारळ,
उडतोय भंडार (भंडारा)
अगनीमंदी (अग्नीत) पाऊल टाकिता,
आगीन थंडगार
दुनयामंदी तुजं चाललं
येवढं खरोखर
आगीन खाल्ली आईनं,
लावलं देवाचं दार
झाली जत्रंची फूट,
फुटे शिवंच्या भाहीर
तंगव्वा–सत्यव्वा भारे
उठविलं तालासुरावर
लिप्पाणी ठिकाणं,
जागा मला दिसती गुलजार...'

आणि त्या एका रात्रीत तारीची ललाटरेषा इकडची तिकडे झाली. एका रात्रीत इकडलं जग तिकडे झालं...ह्या जगाचे छक्केपंजे माहीत नसलेल्या कोवळ्या ताराबाईची पावलं वेश्याव्यवसायाच्या वाटेवरून तिच्याही नकळत अशी पडत गेली...मग अनेकांनी तिला वापरली न् सोडून दिली...गेल्या दहाएक वर्षातच ती तीन मुलांची आई बनलीय्, पार पोतेरं झालंय तिचं...माझ्यासमोरच मोकारलेली, फुललेली, वाढलेली न् पार कोळमाटून, सुकून गेलेली अशी ताराबाई... तर अशा अनेक ताराबाईंचा बळी घेतला जातोय यल्लाम्माच्या नावानं. प्रत्येक वर्षी हजारोंच्या संख्येनं. वेश्याव्यवसायात मुली ढकलण्याचा हा एक राजरोस धार्मिक मार्ग. कुणाची अडवणूक नाही, की आडकाठी नाही अन् ज्यांचा बळी जातोय त्या अस्राप जीवांना आपण मारले जात आहोत आणि यापुढचं अख्खं आयुष्य मेल्या मनानं काढायचं, पुरुषी वासनांच्या गिधाडी छायेत, हेही ठाऊक नसतं...डोंगरावरच्या गर्दीनं काही भांबावलेल्या, जत्रेत यावथास मिळाल्याचा आनंदही काहींच्या कोवळ्या मुखावर. ह्या कळ्या थोडयाच काळानं उमलणाऱ्या न् लवकरच आपण खुडले जाणार आहोत, ह्याची जाण नसलेल्या. आत्ममग्न !

ज्या यल्लम्माच्या नावावर, ज्या रेणुकेच्या नावावर, ज्या आई यल्लूबाईच्या नावावर प्रत्येक वर्षी इतक्या संख्येनं मुलींना वेश्याव्यवसायात ढकललं जातं, ती रेणुका, ती यल्लम्मा, ती यल्लूआई आहे तरी कुठे ?

कोल्हापुराहून पुना–बेंगलोररोडनं आपण दक्षिणेस निघालो की, पंचवीस मैलांवर निपाणी शहर लागतं. निपाणीहून थेट सौंदत्तीच्या एस. टी. गाडया हमेशा मिळतात. निपाणीहून सौंदत्ती नव्वद मैल. निपाणीहून तेरा मैलांवर असलेल्या संकेश्वरला गाडी आली की, आपली पुना–बेंगलोर-रोडची सोबत सुटते अन् हुक्केरी–घटप्रभा मार्गानं सौंदत्तीकडे गाडी धावू लागते. तसं बेळगावहूनही सौंदत्तीला जाता येतं; पण ते अंतर बरंच दूरचं. जवळचा मार्ग हुक्केरीवरूनच, कोल्हापूरभागातील लोकांना...तर सौंदत्तीला गाडी आली की, समोर पूर्वेस डोंगर दिसतो तोच यल्लम्माचा डोंगर. थेट डोंगरावरही गाडया जाण्यास डाव्या व उजव्याही हातांनी दोन पक्के मार्ग आहेत; पण यात्रेकरू डाव्या मार्गानंच जाणं पसंत करतात; नव्हे तसंच जावं लागतं. कारण जुगुलबाई–सत्यव्वाच्या कुंडात स्नान करूनच मग वर डोंगरावर जाण्याचा प्रघात आहे. जोगतिणी, तसेच नवस केलेल्या बायका येथे लिंबही नेसतात. मार्गशीर्षी पौर्णिमेपासून माघी पौर्णिमेपर्यंत तुफान यात्रा भरते. त्या वेळी जुगुलबाई–सत्यव्वाच्या ह्या कुंडातील (पूर्वाभिमुख देऊळ व त्यापुढील हे कुंड आता मलप्रभा कॅनॉलमध्ये बुडलं आहे.) पाणी इतकं गढूळ न् घाणेरडं झालेलं असतं की, तुम्ही सुशिक्षित न् सुजाण असाल तर अशा पाण्यात स्नान करायला मन धजावणार नाही तुमचं. अंगावर शहारे येतील ! पण अनेक भाविकांची नुस्ती गर्दी झालेली असते ह्या कुंडावर. अक्षरशः मरत असतात स्नान करायला...येथून निघालं की डोंगराची चढण लागते. ती पार केल्यावर नाका लागतो. येथे जकात उकळली जाते. मोटारींची–माणसांची. ह्या नुसत्या जकातीचाच आकडा लाखाच्या बाहेर जातो. (वरच्या देवळात जमणारा पैसा निराळाच; त्याचा पण हिशेब असा लाखावारी करावा

लागतो.) नाक्यावरची जकात देऊन पुढं गेलं की, डोंगराचं पठार लागतं. जत्रेच्या दिवसांत गाड्यांनी, माणसांनी हे नुसतं फुललेलं, लहडलेलं असतं. शे–दीडशे मैलांच्या परिसरातले लोक–काही एस. टी. नं आलेले, काही बैलगाड्यांनी. यात्रेकरूंना रहाण्यासाठी वर काही धर्मशाळाही आहेत. त्यातील एक तर चित्रपटसृष्टीत विख्यात असणाऱ्या व्ही. शांतारामनी बांधली आहे. पठाराच्या पूर्वेकडील उतारावर रेणुकेचं मंदिर. मंदिराजवळ उभं राहून चौफेर पाहिलं तर आपण एका विशाल कढईच्या तळाशी आहोत, असं वाटतं. चौफेर चढत जाणारे पठार व क्षितिजाला टेकलेल्या डोंगरकडा...हेच ते रेणुकेचं मंदिर. (यल्लम्मा, यल्लूआई ही देखील ह्याच देवीची नावं.) प्रत्येक वर्षी हजारो कोवळ्या मुलींना जोगतिणीची दीक्षा देऊन येथेच त्यांच्या आयुष्याचं वाळवण केलं जातं. वर आभाळ, खाली धरती असते सोबतीला, तितकं न् तेवढंच ! बाकी कोणी सोबतीला नसतं, आई यल्लूबाईही ! पायाखालची धरती तापलेली, वरचं आभाळ इंगळ टाकणारं–ह्यात जोगतीण जन्मभर जळत रहाते–जळून जाते !

जत्रा फुटली की परतायच्या वाटेवरील पहिला मुक्काम मनोळीच्या नदीवर पडतो. बैलगाड्या–माणसं नदीच्या दोन्ही तीरांवर लगडून गेलेली. नदीवर पूल. पुलाच्या अल्याड बाजूस मेवा-मिठाईची दुकानं. चहाची हॉटेलं. एखाद्या खेडेगावी मोठी जत्रा भरावी, तसं दृश्य इथं दिसून येतं. येथून गाड्या हलल्या की पुढचा मुक्काम गोकाक न् त्यानंतर व्हळेवा. हुक्केरी ते हत्तरगी हा जो रस्ता गेला आहे, त्या रस्त्याला दुभंगत हिरण्यकेशी नदी पूर्वेकडे वाहात जाते. पूल ओलांडून पलीकडे जाताच उजव्या हाताला, नदीतीरावर पूर्वाभिमुख व्हळेव्वाचं देऊळ. ही यल्लम्माचा बहीण. जोगतिणी–जोगते व त्यांचे जे ताफे असतात त्यांना ह्या व्हळेव्वाचं दर्शन घेऊनच परतावं लागतं. परतणाऱ्या लोकांची येथेही प्रचंड जत्रा भरलेली असते. देवळाच्या भोवताला, नदीच्या किनाऱ्यावरही. येथून निघालं की ३–४ मैलांवर हत्तरगी. बेळगावहून येणाऱ्या गाड्या इथं मिळू शकतात. तेथून निपाणी-कोल्हापूर भागात येता येतं. बैलगाड्यांचा ताफा मात्र हत्तरगीहून पुना–बॅंगलोर-रोडनं उत्तरेकडील संकेश्वरकडे निघतो...संकेश्वर–निपाणी असे करीत आपल्या गावाकडे बैलगाड्या परततात. गाव आल्यावर एकदम गाड्या गावात कधीही जात नाहीत; तर वेशीबाहेर थांबतात. तेथे जत्रा भरते मग. ह्या जत्रेला ‘ बागेतील जत्रा ’ असे नाव आहे. परिस्थितीमुळे व सवडीअभावीही यल्लम्माच्या यात्रेला न गेलेले गावातील लोक ह्या बागेतील जत्रेला जातात. ही जत्रा दुपारचे ३–४ पासून रात्रीचे ८–९ पर्यंत चालते. घरोघरच्या बायका आंबीलीचा ‘ निवद ’ घेऊन व जेवणे बांधून ह्या बागेतील जत्रेत जातात. ह्या दिवशी आंबिलीचं महत्त्व. ह्याचाच नैवेद्य यल्लम्माला. यल्लम्माला जाऊन आलेले ताफे जागजागी उतरलेले असतात. त्यांच्या ‘ जगा ’भोवती भाविकांची गर्दी उडते. निवद दाखविला जातो, नारळ फोडले जातात न् भंडाऱ्यानं कपाळ–कपडे माखून जातात... मग आजूबाजूच्या शिवारात नेलेली जेवणं सोडली जातात आणि मग त्या मोकळ्या हवेत आंबिलीसह घास गिळण्यात एक और लज्जत येऊन जाते...रात्रीचे ८–९ झाले की जत्रा फुटते. मेवा-मिठाईची दुकानं उठतात. बैलांच्या मानेवर जू ठेवून सापत्या बांधल्या जातात, ‘ जग ’ डोक्यावर घेतले जातात आणि ‘ उदगं आई उदं ऽ उदं ऽ ’चा गजर वातावरणात मिसळू लागतो...लोक घराकडे परतू लागतात...१–२ आठवडे बाहेर, प्रवासात काढावे लागल्याने बैलं–माणसं वेगात पावलं उचलू लागतात–घरच्या ओढीनं...

तर अशी ही यल्लम्माची जत्रा. ह्या जत्रेत मुलीला जोगतीण करण्यात येतं. जुगुळबाई सत्यव्वाच्या कुंडात अंघोळ करायची न् लिंब नेसायचा. (आता कॅनॉलच्या पाण्यात अंघोळ करतात.) म्हणजे काय ? तर ओलेत्याने तोंडात लिंबाऱ्याचा एक डहाळा धरायचा, हात जोडायचे. जोडलेल्या हातांतही लिंबाऱ्याचा डहाळा. पुजाऱ्याचा ताफा समोर ‘ तानुं तंदानुं ऽ ’ करीत गात असतो. चवंडक, तुणतुणं, टाळ ह्यांचा कल्लोळ उसळलेला असतो...ताफ्याच्या पाठोपाठ ‘ जगा ’भोवती पाच फेऱ्या मारायच्या, मग वर डोंगरावरील देवळात यायचं आणि यल्लम्माच्या पाया पडायचं. मग पुजाऱ्याच्याही. पुजारी मग पोरीच्या गळ्यात ‘ दर्शन ’ घालतो. हे ‘ दर्शन ’ म्हणजे काय ? तर दर्शन म्हणजे लाल–पांढऱ्या मण्यांची माळ. लग्न झाल्यावर मुलीच्या गळ्यातील मंगळसूत्राला जे न् जसं महत्त्व, तसं ह्या ‘ दर्शना ’ला. मुलीच्या गळ्यात ‘ दर्शन ’ घातलं की मुलगी जोगतीण झाली. हें दर्शन मग जन्मभर गळ्यात वागवावं लागतं. हे दर्शन गळ्यात घातलं गेल्यावर पाच परड्या व पाच जोगतं पुजायचं. त्यांना चोळी-काकणं करायची. मग त्यांच्याकडून एक परडी स्वीकारायची. ‘ आकुंदी जोगवा ’ करीत पाच ठिकाणी जोगवा मागायचा. (मग आयुष्यभर दर मंगळवार–शुक्रवार हा जोगवा मागत कमीत कमी पाच घरं तरी फिरावीच लागतात. जुगुळबाई सत्यव्वाच्या कुंडात (–आज मलप्रभा कॅनॉलच्या पाण्याखाली हे कुंड व लगतचे देऊळ बुडाले असल्याने भाविक कॅनॉलच्या पाण्यात स्नान करून लिंब नेसतात–) स्नान करून लिंब नेसला की, प्रत्येक स्त्री जोगतीण होते, असं नाही; तर नवस फेडणाऱ्या लोकांनाही नवस फेडताना लिंब नेसावा लागतो. तेव्हा ‘ सत्यशोधक ’ ह्या मासिकात ‘ यल्लम्मा ’ या लेखात दिलेली माहिती अगदीच अपुरी व गैरसमज पसरविणारी आहे. तर जोगतीण होण्यासाठी मुलीच्या गळ्यात ‘ दर्शन ’ पडणं महत्त्वाचं. लिंब नेसणं नव्हे. तसेच ‘ सत्यशोधक ’मधील वरील लेखात ‘ एकदा अशा पद्धतीनं देवाला वाहिलेल्या मुलीबरोबर मग कोणी लग्नाला तयार होत नाहीत ’ ही सांगितलेली माहितीही चुकीची आहे. त्या लेखात सांगितल्यानुसार सगळ्याच मुली काही वेश्या बनत नाहीत, तर अनेक जणींची ‘ लग्नं ’ही होतात. ह्या ‘ लग्नां ’ना ‘ झुलवा ’ लावून घेणं म्हणतात. ‘ झुलवा ’ लावून घेणं म्हणजे पाट लावून घेणे. जोगते–जोगतिणींच्या पोटी जी संतती निपजते, त्यातील मुलांशी जोगतिणी म्हणून सोडलेल्या उपवर मुली ‘ झुलवा ’ लावून घेतात. ह्या समाजाच्या बाहेरील तरुणही जोगतिणींचा स्वीकार करतात. डॉ. बाबा आढावसारखे ह्या प्रश्नावर चळवळ उभी करण्याच्या तयारीत असलेले नेते विचारतात की, ‘ जोगते म्हणून यल्लम्माला सोडलेले लोक खरोखरच नपुंसक असतात की काही

ऑपरेशन वगैरे करवून घेऊन नपुंसक होतात ?' ह्याला उत्तर म्हणून सांगता येईल की, जोगते म्हणून सोडण्यात आलेल्या मुलांत फारच थोडी मुले नपुंसक असतात. ही मुलं स्त्रियांसारखी चोळी-लुगडे घालून वावरत असतात. ह्यांना 'हिजडे'ही म्हणतात. बाकीचे जोगते मात्र खरोखरीच पुरुष असतात. ते जोगतिणींशी वा अन्य मुलींशीही लग्ने करतात; त्यांना मुलंही होतात, झालेलीही आहेत. फक्त मंगळवार–शुक्रवार हातांत परडी वा डोईवर 'जग' घेऊन त्यांनी किमान पाच घरं तरी जोगवा मागायचा आणि पौषी पुनवेला यल्लम्माच्या जत्रेला जाऊन यायचं, इतकेच केवळ ढोबळ नियम.

ज्या यल्लम्माला पोरं-पोरी अशा प्रकारे सोडून, धार्मिकतेच्या नावाखाली चाकोरी-बाहेरचं जिणं त्यांच्या नशिबी मारण्यात येतं, त्या यल्लम्माची लोककथा अशी—

रेणुका ही पार्वतीचा अवतार व जमदग्नि-मुनी हा शंकराचा अवतार. जमदग्नीची बायको रेणुका. तिला चार पोरं. शेवटचा परशराम. जमदग्नीची तपस्साधना कडक. मुनी लवकर उठायचा, नदीवर जाऊन अंघोळ वगैरे करून झोपडीत यावयाचा. तो परतायच्या आधी त्याच्या पूजेची सर्व काही तयारी करून ठेवायची कामगिरी रेणुकेवर असायची; त्यामुळं तीही भल्या पहाटे उठून नदीवर अंघोळीसाठी जाई अन् तेथे वाळूचा घडा तयार करून त्यांतून पूजेसाठी पाणी आणी. एकदा अंघोळ करून पाण्यातून वर येताना माशाचं एक युगुल रतलेलं, प्रणयक्रीडेत मग्न झालेलं तिला दिसलं आणि तिचं मन चळल्यागत झालं...मग तिचं तिलाच अपराधी वाटू लागलं; आपल्या हातून पापच घडलं, अशी तिची भावना झाली. त्यामुळं तिच्या हातून वाळूचा घडा लवकर तयार होईना. तसाच कसाबसा घडा तयार करून त्यातून पाणी घेऊन तशीच निथळत ती झोपडीत परत आली. दारात नवरा रागानं लाल झालेला. त्याचा राग पाहून रेणुकेच्या डोक्यावरचा पाण्याचा घडा खाली कोसळला. ती भ्याली. तिचं मन आज चळलं होतं, हे नवऱ्यानं अंतर्ज्ञानानं ओळखलं आणि तो गरजला, 'पापिणी आताच्या आता तुझं मुंडकंच उडवितो !...' नि मग त्यानं आपल्या चारही मुलांना बोलाविलं व आईचं मुंडकं उडवायचा हुकूम केला. पहिल्या तिघांनी तो मानला नाही म्हणून शाप देऊन त्यांना भस्म करून टाकलं. चौथा परशराम. तो तयार झाला अन् बापाला म्हणाला, 'बाबा, मी आपली आज्ञा पाळल्यावर मला मागेन ते द्याल ?' तसा बाप म्हणाला, 'तू मागशील ते मी देईन, पण अगोदर हिचं मुंडकं उडीव !' आणि त्यानं मुलाच्या हातावर कमंडलूमधील उदक सोडलं; तसं मग परशरामानं आपल्या हातातील परशूनं आईचं मुंडकं उडविलं; ते मुंडकं आभाळातनं कैलासाला गेलं नि शंकराच्या गळ्यातील माळेत जाऊन बसलं. तसं मग मुनीनं विचारलं, 'मुला, आता तुला काय पाहिजे ते माग !' त्यावर परशराम म्हणाला, 'बाबा, माझी मेलेली आई मला परत आणून द्या !' हे ऐकून मुनीला आश्चर्य वाटलं; पण इलाज नव्हता. वचन तर दिलेलं, ते पूर्ण करायलाच हवं. जवळून एक मांगीण नदीकडे जात असलेली दिसली. मुनीनं कमंडलूतलं पाणी तिच्या अंगावर फेकलं, त्याबरोबर तिचं मुंडकं धडावेगळं होऊन रेणुकेच्या धडावर येऊन चिकटलं नि रेणुका जिवंत झाली... एवढं होऊनही मुनीचा राग शांत झाला नव्हता. तो म्हणाला, 'तुला जरी मी जीवदान दिलं असलं तरी ह्यापुढं मी तुझं तोंडही पहाणार नाही ! तुला वाट मिळेल तिकडे तू चालू लाग !' हे एकताच रेणुकेनं त्याचे पाय धरून विनविलं, 'महाराज, मला असा शाप देऊ नका, ह्यातून काही तरी मार्ग काढा !' तसा मुनी म्हणाला, 'ठीक आहे, जा ! जिथं जाशील तिथं लाखानी भक्त भेटतील !' एवढ्यात ते मांगिणीचं धड बोललं, 'महाराज, आता माझी पुढं वाट काय ?' तसा मुनीनं आशीर्वाद दिला, 'हिच्याबरोबर तुझीही लोक भक्तिभावानं पूजा करतील !' आणि तो तपाला निघून गेला. परशरामाला व त्या मांगिणीला (जुगुळबाई सत्यव्वा नाव तिचं... जुगुळबाई सत्यव्वाचं देऊळ व कुंड व शेजारून डोंगरावर चढलेला रस्ता अलीकडेच झालेल्या मलप्रभा कॅनॉलखाली बुजल्यानं जवळचा नवा मार्ग केला आहे. ह्या मार्गावर एक कमान बांधण्याचंही काम सुरू आहे ) घेऊन रेणुका निघाली. सौंदत्ती गावाजवळ आली. लोकांनी विचारलं, 'यल्ल् अम्मा ? ('आई,) कुठं चाललीस ?'– ('ह्या यल्ल्-अम्मा' वरूनही रेणुकेला 'यल्लम्मा' असं संबोधलं जातं. तसंच ह्या शब्दाची फोड यल्लरद अम्मा, सर्वांची माता, असाही केला जातो.) तसं रेणुकेनं उत्तर दिलं, 'कुठं नाही बाळांनो, इथंच की !' आणि तेव्हापासून सौंदत्तीनजीक असलेल्या उगरगोळाच्या डोंगरावर रेणुका राहू लागली. रेणुका पतिव्रता असल्यानं तिला पुरुषांचा वारा खपत नाही, म्हणून ती जोगते व जोगतीणींकडून आपली सेवा करून घेते.

तर अशी ही लोककथा आहे; तीवर आधारलेलं गाणंही आहे, ते असं—

आदिमाया रेणुका माता ।
द्वापारयुगाची सांगतो कथा ।
चित्त देउनि ऐकावं आता ।
बोलू नका म्होरं ।
जमदग्नि हिचा भरतार ।
झाला विस्तार ।। १ ।।

चार पुत्रांची रेणुका हो माता ।
सर्व बाळांवर बघा तिची ममता ।
बोले ती कांता, अहो भरतार ।
झाला मायेचा बाजार,
सगळा हाहाकार ।। २ ।।

जमदग्नि बोले आपल्या अस्तुरीला ।
आम्ही बसलो अनुष्ठानाला ।
लौकर पाणी घेउनि यावे पूजेला ।
नका करू उशीर यायला ।
पोटचं बालक मारिल तुला ।। ३ ।।

आदिमाया निघुनी गेली पाण्याला ।
वाळूचा घडा बुडता राहिना ।
झाला गेला भंगला ।
कसं नेऊ पाणी पूजेला ।
झाला उशीर ।। ४ ।।

जमदग्नि तापला हो फार ।
कुठे हाय पाणी सांग लवकर ।
देवपूजेला झाला उशीर ।
उडवितो शीर ।
चौथा पुत्रांना आज्ञा केली ।
मारा लौकर ।। ५ ।।

पदरामंदी पाणी घेता
राहिना हो झालं ।।
वट्यामंदी पाणी घेता
राहिना हो झालं ।

झालि बेजार ।
कसं केलं देवा कवतुक,
वडविती ऊर ॥ ६ ॥

जमदग्नि तापला हो फार ।
चौघा पुत्रांना घेतलं बोलावुन ।
तिघांनी हो बापाचा शब्द
नाही मानला ।
चौथा मग आला परशराम ।
राग क्रोधात घेउन हत्यार,
मातेचं उडविलं शीर–
वरच्यावर ॥ ७ ॥

परशराम लागे बापाच्या चरणाला ।
जिवंत करुनी द्यावी
माता माझी मला ।
ह्योच माझा वर ।
ह्याशिवाय न्हाइ मागणं
जोडतो कर ॥ ८ ॥

जिवंत करुनी दिली माता,
त्येची त्येला ।
रेणुकेचं धड लाविलं कवीच्या सुता :
ग्रंथ वाचुनी पहावा, जावे आता ।
खोटचा–पाखंडचा न्हवं ह्या कथा ।
बोलूं नका म्होरं ॥ ९ ॥

तर अशा ह्या यल्लम्माला जोगतीण व जोगते म्हणून मुली-मुलं सोडण्याची प्रथा विशेषतः दलितसमाजात फार आढळते. मांग, बेरड, ढोर, चांभार, महार, डोंबारी, गारुडी आदि जातींतील अज्ञान व पूर्वापार चालत आलेली रूढी ह्यामुळं पोरा-पोरींची आयुष्यं अल्पवयातच यल्लम्माला वाहून सुकविली जातात. आर्थिकदृष्टचा मागासलेली मराठा व लिंगायत कुटुंबांतील मुलं-मुलीही वरील दुष्ट रूढीची बळी ठरतात. ह्या जातींतील संख्याही नजरेआड करण्याइतकी नाही.

गरीब मुस्लीम कुटुंबातील काही मुलीनाही जोगतिणी करून वेश्याव्यवसायात ढकललेलं आढळून येतं. बेळगाव, धारवाड, सोलापूर जिल्ह्यांतून व कोल्हापूर–सांगली जिल्ह्यांच्या दक्षिण भागातून यल्लम्माचे भक्त पसरले असल्याने वरील भागातच ही अमानुष प्रथा रूढ झालेली आहे. वरील जिल्ह्यांतील काही भाग तर इतका मागासलेला आहे की, तेथे शिक्षणाचा प्रसार अजूनही झालेला नाही, मग नव्या विचारांचा वारा वाहणे तर दूरच. त्यामुळे येथील लाखो लोकांना महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, दलित चळवळ आदि माहीतही नाही. संकेश्वरपासून पुढे सौंदत्तीपर्यंत असलेला सारा भाग तर कानडी भाषिकांचा. मराठी बोलणारे–लिहिणारे तर अभावानेच आणि कन्नड विचारवंतांचे तर ह्या गंभीर प्रश्नाकडे अजूनही पुरेसे लक्ष गेलेले नाही ! प्रतिवर्षी रांडपुनवेपासून (मार्गशीर्ष पुनव) माघ पुनवेपर्यंत यात्रा भरते. चारपाच लाख लोक येतात-जातात, सा -आठ हजार पोरी व दोन-तीन हजार पोरांना जोगतिणी व जोगते म्हणून सोडण्यात येतं. देवळाच्या विश्वस्तनिधीला व पठारावरील सरकारी जकातनाक्याला वर्षाला लाखो रुपयांचं उत्पन्न मिळतं. हे सारं चाललेलंच आहे. कोण लक्ष देणार ?

जोगतिणी व जोगते इतक्या मोठ्या संख्येने का सोडले जातात ? ह्याचीही बरीच कारणे असतात. काही वेळा पोटी संतान नसतं. यल्लम्माला नवस बोलला जातो, 'पोरं होऊ देत, तुझ्या दरबारातही एक सोडतो,' अशी लालूचही दाखविली जाते. मग यथा काळ नवसाप्रमाणे घडलं तर पोरगी (जोगतीण म्हणून) वा पोरगं (जोगता म्हणून) देवाला सोडलं जातं. एकमेकांच्या घराण्यात पूर्वापार चालत आलेली रूढी, चाल असते की, घरातील एक तरी माणूस यल्लम्माला सोडायला हवं, त्याप्रमाणे सोडलं जातंही. कारण भय असतं यल्लम्माचं. हे दैवत कडक. त्याच्या नियमाविरुद्ध वर्तन केलं तर अख्ख्या कुटुंबावर अरिष्ट कोसळेल, ही भीती सिमेंट थापल्यागत मनात. त्यामुळं कुटुंबातील एखाद्या मुलाचा जोगता वा जोगतीण म्हणून बळी द्यावाच लागतो... काही वेळा मुलींना 'जट' वाढते. म्हणजे डोकीवरील केस एकाला एक चिकटतात, सिमेंटनं गिलावा करावा, तसं होतं. असं झाल्यावर देवीचं बोलावणं आलं, असं समजून त्या पोरीला जोगतीण म्हणून सोडण्यात येतं...जोगतीण वा जोगता म्हणून सोडण्याचा विधी यल्लम्माच्या डोंगरावर जसा होतो, तसा गावागावांतूनही होतो. या लेखाच्या सुरुवातीस 'जोगतीण' कथेतील जो परिच्छेद दिला आहे त्यात वर्णिलेला विधी अशाच एका गावात झालेला मी पाहिला आहे. एखाद्या गावात जोगतिणींचा प्रमुख ताफा असतो; त्याचा मुख्य एखादा जोगताही असतो. 'जगा'चा तो पुजारी. वर्षाला 'बागेतील जत्रा' होते, तिथलाही तोच पुजारी. केव्हा केव्हा ह्या 'बागेतील जत्रे'च्या ठिकाणी गाववाले रेणुकेचं छोटसं देऊळही बांधतात, तर असा एखादा जोगताच त्या देवळाचा पुजारी असतो. त्याच्या हातून मग असा जोगतिणी सोडण्याचा विधी होत असतो...प्रतिवर्षी यल्लम्माच्या डोंगरावर जोगते-जोगतिणी सोडण्याची संख्या व अशा प्रकारे गावोगावच्या पुजाऱ्यांकडून जोगते-जोगतिणी सोडली जाण्याची संख्या ह्यांचा केवळ अंदाज बांधला तर ही संख्या दहा हजारांवर सहज जावी...वर्षाला इतक्या मोठ्या संख्येने कोवळे अंकुर खुडले जातात, तरीही अजून कर्नाटक शासनाचे इकडे लक्ष गेलेले नाही, की महाराष्ट्र शासनाला ह्याची दखल नाही !

ह्यासाठी ह्या भागातील एक शिष्टमंडळ डॉ. बाबा आढाव, डॉ. अरुण लिमये ह्यांच्या नेतृत्वाखाली दि. २१ एप्रिल रोजी बेळगावच्या कलेक्टरांना भेटण्यास गेले होते. एवढचाने काय होणार आहे ? तर 'वरून' सूचना वगैरे आल्यावर यल्लम्माच्या डोंगरावर जोगते–जोगतिणी सोडण्याच्या विधीवर 'वॉच' राहील इतकेच. (सरकारकडून ह्याबाबत काही त्वरित हालचाल होईल किंवा झाल्यावर काय होईल, ह्याचे हे एक कल्पनाचित्र म्हणा !) 'वॉच' राहील म्हणजे काय होईल ? जत्रेतील पोलिसांना रीतसर सूचना देण्यात येतील आणि त्यांची अंमलबजावणी कशी केली जाईल ? तर पोलीस यल्लम्माच्या डोंगरावरील पुजाऱ्याशी लगेच संधान बांधतील, वाटाघाटी होतील व 'हप्ते' ठरविले जातील. जोगते–जोगतिणी म्हणून सोडल्या जाणाऱ्या प्रत्येक 'नगा' मागे अमुक इतकी रक्कम. म्हणजे एखाद्या कुटुंबाला देवाला मुलगा व मुलगी सोडावयाची झाल्यास खारका, खोबरं, भंडारा, चोळी-कांकणं, परडचा आदि वस्तूंवर खर्च होणाऱ्या रकमेत पोलिसांच्या हप्त्याचीही रक्कम मिळवावी लागेल ! (महागाई वाढतेय ना ? तेव्हा धार्मिक विधीवरील खर्चही असा वाढणारच !) म्हणजे, सरकारने काही हालचाल करावी म्हणून वरिष्ठ पातळीवरून

चळवळ केली व तिला 'यश' आलं तर पोलिसांना पैसे खाण्याचे एक नवेच कुरण, एक फील्ड तयार होणार आहे; देवाला मुलं सोडण्याचं बंद मात्र होणार नाही. फरक इतकाच पडेल—आता हा विधी उघडपणे साजरा केला जातो, तोच गुप्तपणे पार पाडला जाईल इतकेच !

डॉ. आढाव, डॉ. लिमये या नेत्यांच्या मनात यात्रेच्या दिवसांत सौंदत्ती स्थानकावर वा डोंगरावर निदर्शनं करण्याचा विचारही घोळतो आहे...पण ह्याचाही काही उपयोग होईलसे वाटत नाही. पिढ्या न् पिढ्या आपल्या घराण्यात चालत आलेली परंपरा अशा निदर्शनांनी अडाणी लोक सोडतील ? अशक्य आहे. उलट ह्या मूठभर निदर्शकांना मूर्ख ठरवून हसू लागतील...आणि कन्नड भाषिक लोक तर ह्याला लगेच राजकारणाचा रंग देऊन टाकतील ! आमच्या राज्यातील ही चाल बंद पाडायला सांगणारे हे कोण टिक्कोजीराव ? आणि ह्या महाराष्ट्रियनांचे आम्ही का ऐकू ? ह्यांना काय खेंकटी करावयाची असल्यास तिकडे आपल्या राज्यात करावी; इकडे आमच्या प्रांतात का ? आम्ही तुमच्या तिकडे अशा धार्मिक बाबतीत काही ढवळाढवळ करावयास येतो का ? तुमचे मराठी भाषिकही लोक यल्लम्माचे भक्त आहेत म्हणता, तर त्यांना सांगा जा ना, पहा ऐकतात का काय ते ! हे थोड्या विचारी व सुशिक्षित कन्नड लोकांचे झाले; जे अशिक्षित आहेत ते तर दारू वगैरे पिऊन येऊन निदर्शनाच्या ठिकाणी दंगलच माजविणार, (आणि त्या साऱ्याचा ठपका मात्र मराठी भाषिक लोकांवर ठेवणार.. मराठी भाषिक गुंड आहेत, आमच्या यात्रेच्या पवित्र जागी येऊन अशी दंगल माजवितात वगैरे. वगैरे. ) परवाच्या सीमाभागातील भाषिक दंगलीत काय झाले ? तर अथणी येथे रामराव व रमेश हलगेकर ह्या बंधूंना व रबकईत श्री. मांडवकरांना अशाच कन्नड गुंडांनी दगडांनी ठेचून ठेचून दिवसाढवळ्या ठार मारले ! सोमय्या साखरकारखान्याच्या परिसरातील मजुरांच्या स्त्रियांवर बलात्कार केले. सारांश, जोगतिणींच्या प्रश्नावर सौंदत्तीत जर निदर्शनं केली, तर अशी भाषिक दंगल होण्याचाही संभव नाकारता येणार नाही. निदर्शनांचा उद्देश काय, कशाबद्दल, का—ह्याचा विचारही न करता, दारू पिऊन बेभान झालेल्या गुंडांकडून अशा वेळी काही आततायी कृत्यं होणार नाहीत असं कसं म्हणावं ? महाराष्ट्रीय लोक आयतेच आपल्या तडाख्यात गावले आहेत, पूर्वीच्या भाषिक दंगलीचा सूड आता घ्यावा, असा विचार करून कन्नड गुंडांनी हैदोस घातला तर ? पोलीस...? ते तर अशा वेळी प्रेक्षकाचीच केवळ भूमिका करतात, काही वेळा तर दंगलीत प्रत्यक्ष भाग घेऊन मराठी भाषिकांना चोपण्यास कन्नडिगांना उत्तेजन देतात, असा परवाच्या भाषिक दंगलीच्या वेळचा अनुभव आहे. बरे, ही निदर्शनं शांततेनं पार पडली तरी त्यांचा असा कितीसा उपयोग होणार आहे ? ( प्रत्येक पौर्णिमेस मोठी यात्रा भरते, हा डॉ. आढाव व डॉ. लिमये ह्यांचा समज चुकीचा आहे. ) तेव्हा जानेवारी महिन्यातल्या मोठ्या यात्रेच्या वेळी ( साधारणतः 'रांडपुनवे'च्या दिवशी किंवा 'अहेवपुनवे'च्या दिवशी; कारण ह्याच दोनही दिवशी 'भर जत्रा' असते; म्हणजे जत्रेचे हेच दोन मुख्य दिवस. 'रांडपुनवे'स कोल्हापूर व बेळगाव भागातील लोक मोठ्या प्रमाणावर जातात, तर 'अहेवपुनवे'ला निपाणी व गारगोटी भागातील. ) निदर्शने केली तर ते जास्त परिणामकारक होईल.

जोगतिणींचा प्रश्न समाजाच्या इतक्या खोलवर भिडलेला, पोहचलेला आहे की, निवेदने—निदर्शने आदींनी त्याची उकल होईल, असे वाटत नाही. अडाणी अशा पददलित समाजातच ही घातुक प्रथा असल्याने त्यांच्यापर्यंत आपण पोहचायला हवे. निपाणी-संकेश्वर-सौंदत्ती आदि ठिकाणी यात्रेच्या दिवशी केवळ निदर्शने करून आपण ह्या निरक्षर व परंपरागत रूढीत बद्ध, बंदिवान, असलेल्या पददलितांपर्यंत पोहचू का ? तर नाही ! तेव्हा ह्या रूढीभंजनासाठी भक्कम आर्थिक पायावर एक सामाजिक संस्था उभारण्याची गरज सध्या आहे. ह्या संस्थेत कानडी भाषिक समाज-कार्यकर्त्यांचाही समावेश करायला हवा. ह्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी यल्लम्मा देवस्थानाच्या कक्षेत येणाऱ्या ( बेळगाव, धारवाड, सोलापूर, सांगली, कोल्हापूर ) जिल्ह्यांतील शहरांना—गावांना—खेड्यांना प्रत्यक्ष वारंवार भेटी देऊन पददलितांशी संपर्क साधायला हवा व जोगतिणी-जोगते सोडण्याची रूढी कशी अनिष्ट नि भयानक आहे, ते त्यांना पटवून द्यायला हवे, समजावून द्यायला हवे; तरच ह्या दुष्ट रूढीला थोडाबहुत पायबंद बसेल.

ह्या प्रश्नातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जोगतिणी म्हणून सोडलेल्या सगळ्याच मुली वेश्याव्यवसायात जातात असे नव्हे. किती तरी जोगतिणी 'झुलवा' लावून घेऊन सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे सुखाने संसार करीत असलेल्या आढळून येतात. तेव्हा जोगतिणींची ही शेकडो वर्षांपासूनची परंपरा अशा चळवळीने बंद पाडली तरी वेश्याव्यवसायात येणाऱ्या मुलींच्या संख्येस पायबंद बसेल का ? तर मुळीच नाही. जोवर दारिद्र्याचा शाप पददलित समाजाला आहे, तोवर वेश्याव्यवसायाला कोवळ्या, अजाण मुलींची पुरवणी अशीच होत रहाणार आहे. क्षणभर असे समजू की, मुलीला जोगतीण करून, धार्मिक प्रतिष्ठा देऊन, आता ह्या व्यवसायात ढकलले जाते; तर ही जोगतिणीची प्रथा बंद पडली गेली तर मुलीला तसेच (म्हणजे जोगतीण न करता) ह्या व्यवसायात ढकलले जाईल. म्हणजे आपण केवळ प्रथा बंद पाडली; त्या वेश्याव्यवसायापासून मुलींची मुक्तता काही करू शकलो नाही, असे होऊन जाईल. सारांश, वेश्याव्यवसायात बहुसंख्य मुली जातात किंवा ढकलण्यात येतात, त्या घरच्या अठराविश्वे दारिद्र्यामुळे. तेव्हा ह्या सर्व समस्येचे मूळ असे आर्थिक कारणापर्यंत पोहचते. म्हणून पददलित समाजातील लोकांना आर्थिक सुस्थिती जोवर येणार नाही, तोवर जोगतीण सोडण्याच्या प्रथेचा आर्थिक बुरखा पांघरून वेश्याव्यवसायात मुली पाठविण्याचा हा राजमार्ग बंद होणे खरोखरच कठीण आहे !

ह्या वेश्याव्यवसायात पडणाऱ्या जोगतिणींच्या व त्यांच्या कुटुंबातील लोकांच्या भावना काय असतात ? विचार काय असतात ? हे तपासण्यासाठी वेश्यावस्तीतच फेरफटका मारायला हवा ..

तर ही वेश्यावस्ती...गावाबाहेरचा पुणे—बेंगलोर हाय-वेलगतचा हा माळ. एका कोकणी ब्राह्मणाच्या मालकीचा. त्यानं एक बैठं घर बांधलं. त्यात सात-आठ खोल्या

पाडल्या आणि त्या वेश्यांना भाड्याने दिल्या. चार-पाच जणींनी एकच खोली घ्यायची, असे नव्हे; तर प्रत्येकीचे वेगवेगळे भाडे मालकाला पोहचायला हवे. म्हणजे १५–२० रुपये भाड्याच्या खोलीत प्रत्येकीकडून १०–१५ रुपये महिन्याला घेऊन तीन–चार 'नग' कोंबायचे. अर्थात ह्या पद्धतीमुळे रूढ भाड्याच्या चार–पाचपट जास्त भाडे येते; असा पठाणी व्याजागत हा हिशेब असतो. ह्या वेश्यावस्तीला 'मयेकर कॉलनी' म्हणून त्या ब्राह्मणाच्या नावानेच आजवर ओळखलं जाई... गेल्या दहा–बारा वर्षांत ही वस्ती इतकी वाढली की, 'त्या' बैठ्या घराच्या डाव्या-उजव्या बाजूंस, तसेच पिछाडीसही गल्ल्याच्या गल्ल्या तयार झाल्या आहेत न् डबक्यातून किडे वळवळल्यागत त्यातून वेश्या वळवळत असतात. गेल्या तीन–चार वर्षांत तर ह्या वेश्यांची संख्या भनायक वाढलेली आहे. अक्षरशः शेकडो. संकेश्वर, हत्तरगी, सुतकट्टी, गोकाक ह्या भागातील असंख्य खेड्यांतून ह्या वेश्या आलेल्या आहेत. बहुसंख्य दलित समाजातील–बेरड, मांग, ढोर, महार, चांभार अशा जातींतील. ह्यातील निम्म्यांहून अधिक तर जोगतिणीच आहेत. पुणे–बेंगलोर-रोडवर फिरणाऱ्या ट्रक्सचे ड्रायव्हर्स, गावातील बाहेरख्याली लोक व शाळा–कॉलेजांतील उनाड विद्यार्थी ही ह्यांची 'गिऱ्हाइकं.' पोलिसांपासून म्युनिसिपालिटीतील प्रशासकापर्यंतही ह्यांचा 'राबता.' घरवाल्या बामनाला जसे खोली-भाडे, तसे हा अनैतिक धंदा केला म्हणून पोलिसांना 'हप्ते'ही द्यावे लागतात. घर-मालक–पोलीस–गुप्तरोग ह्या तिन्हींचा ससेमिरा, जन्मभर पुरणारा...तर ह्या शेकडो जणींतील ही एक, कल्लव्वा. संकेश्वरजवळच्या एका खेड्यातील. काळारोम रंग. मध्यम उंची, गच्च भरलेला शिसवी बांधा, बेरडाची जोगतीण म्हणून सोडलेली. सणासुदीचं बहिणीला बोलावून न्यावं म्हणून गावाकडून हिचा भाऊ मुराळी आल्यागत शिदोरी वगैरे बांधून घेऊन येतो. जणू सासरी वहीण नांदतेय न् हा बोलवायला आला आहे. निम्मं वय उलटून गेलेला हा मळलेला, चुरगळलेला माणूस इतका गरीब, असाप व दीनवाणा दिसतो की, कुठल्याही क्षणी हा आता ढसढसा रडेलसे वाटते...आलेल्या दिवशी हा मुक्काम करतो न् दुसऱ्या दिवशी बहिणीला घेऊन जाऊ लागतो. ह्या वेळी कल्लाव्वानं नवं कोरं पातळ नसलेलं असतं. कुठे तरी खूप दूरच्या प्रवासाला निघाल्यागत ह्या वेळी कल्लव्वाच्या डोळ्यांतून अश्रुधारा लागलेल्या न् पदराने डोळे निपटता निपटता ती आपल्या मैतरणींचे निरोप घेत भावापाठोपाठ चालू लागते...अशीच रत्नव्वाची आईही कधीमधी येते व ताराचा बापही येतो. बायनाची बहीणही अधूनमधून येऊन भेटून जाते... म्हणजे आपल्याच घरातील एका मुलीला आपण जोगतीण केलं व अपरिहार्यपणे तिला मग हा वेश्याव्यवसाय करावा लागला, ह्याचं वाईट कुणालाही वाटत असलेलं दिसत नाही. जोगतिणीनं अनेक 'नवरे' (?) करणं, हे तर तिच्या नशिबातच लिहिलेलं, आई यल्लूबाईचीच ही आज्ञा, अशीच उलट श्रद्धाळू

---

## ताफा....

गावोगावी जोगतिणींचे जे 'ताफे' असतात, त्या ताफ्यातील जोगतिणींचं जीवन कसं असतं ?

ताफ्यामध्ये सर्वसाधारणतः चार-पाच जोगतिणी व एक-दोन जोगते असतात. ताफ्याची मुख्य बहुधा एखादी वयोवृद्ध जोगतीण असते. केव्हा केव्हा एखादा जोगताही मुख्य असलेला आढळतो. कुणाकडं चवंडक वाजवायचं काम असतं, कुणाकडं तुणतुणं, कुणाकडं टाळ, कुणी भंडाऱ्याची पिशवी गळ्यात अडकवून भंडारा लावायचं काम करतं. ताफ्याचा 'जग' असेल तर कुणी 'जगाचं' ओझं वहाण्याचं काम करतं. ताफ्यात दोन-तीन जोगतिणी गाणी म्हणणाऱ्या असतात. यल्लम्मावरची मराठी-कानडी गाणी त्यांना तोंडपाठ असतात. हिन्दी-मराठी चित्रपटांतील गाजणाऱ्या 'चालू' गाण्यांचीही भक्तांकडून अलीकडे फर्माइश होत असल्याने तीही गाणी हल्ली पाठ करून ठेवावी लागतात. ताफ्यातील उरलेली माणसे वाद्ये वाजवत गाणारणीला साथ करीत असतात. बहुतेक भागात ही गाणी बसून म्हटली जातात. (सांगली जिल्ह्यातील खेड्यापाड्यांवरील जोगतिणी गाणी म्हणताना नाचतातही, असे माझे कथाकार मित्र चारुता सागरनी एका भेटीत सांगितले.) दर मंगळवारी-शुक्रवारी ताफ्याची गावात फेरी असते. भक्तांची ठराविक घरं-दुकानं असतात, तिथं हा ताफा 'आई यल्लवाईची फेरी आली,' म्हणत शिरतो, 'भक्तां'ची कपाळं भंडाऱ्यानं माखली जातात; मग गाणं सुरू होतं. भक्तांच्या फुगीरपणावर ह्या गाण्यांची संख्या अवलंबून असते. एक रुपयापासून पाच-दहा रुपयांपर्यंतही अशा वेळी 'भक्ता'कडून मिळून त्यांचा खिसा थोडा हलका होण्यास मदत होते! श्रावण महिना तर हक्काचा ! रोज गावात फेरी असते. वाटेत भेटणाऱ्या ओळखीच्या प्रत्येकाला भंडारा लावून चार आणे उकळले जातात. ह्या दिवसांत गोडेतेलासाठी रिकामा डबाही ताफ्याबरोबर घेतलेला असतो. 'यल्लूआईला तेल घाला,' म्हणत त्या डब्यातून तेलही जमा केलं जातं. एखादं मोठं शहर असेल तर श्रावण महिन्यात शे-सव्वाशे किलो तेल सहज जमा होतं. कुणा भक्ताला लिंब नेसून नवस फेडायचा असेल तर 'ताफ्या'ला बोलावणं येतं; परतताना तिथंही मनःपूत बिदागी मिळते. लग्नाच्या वेळी तर पहिला मान जोगतिणीचा. आपल्या 'ताफ्या'सह वाजतगाजत जोगतीण तोरण नेऊन लग्नघराच्या चौकटीला बांधते. (लग्न जरी देवळात वा मंगलकार्यालयात असलं तरी यजमानांच्या घराला लग्नकार्यात नवं तोरण हे हवंच असतं.) मग लग्नात अशा जोगतिणीला चोळी-कांकणं करावी लागतात; नवं कोरं लुगडंही मिळतं...

ताफ्यातील जोगतिणींचं खाजगी आयुष्य हे वारयोषितेहून फारसं भिन्न नसतं. काही 'झुलवा' लावून घेतलेल्या, अशांचे पुरुष व्यसनी असले तर त्या बाहेर अन्य पुरुषांशीही संबंध ठेवून असतात; तर काही यजमान ठेवून घेऊन असतात. कंटाळून एक सोडून गेला की दुसरा, तोही गेला की तिसरा; असंच आयुष्य जात असतं. अशा संबंधापासून झालेल्या संततीला परत जोगता वा जोगतीण करण्यात येतं. तर असं हे दुष्ट चक्र चालूच असतं. ताफ्यात एक दोन तरी अत्यंत देखण्या मुली घेतलेल्या असतात. ह्यामुळे लोभावलेल्या पुरुषांकडून जास्त पैसे उकळता येतात. केव्हा केव्हा ह्या मुली ५-१० रुपयांना कुणाचीही शय्यासोबत करायला तयार असतात. भक्तांच्या घरात अगदी स्वयंपाकघरापर्यंत ताफ्याचा वावर असतो; अशा घरात पुरुषसुखापासून वंचित झालेली एखादी विधवा असली तर तिला पुरुष 'गाठून' देण्याचे महत्कार्यही ताफ्यामार्फत होतं. वर्षातून एकदा जत्रेत यल्लमाच्या डोंगरावर जाऊन आलं की, संपला ताफ्याचा देवधर्म. वर्षभर गावातील भक्तांना लुबाडण्याचंच कार्य मग चालतं ! □

भावना...त्यामुळे सासरी नांदणाऱ्या मुलीला बोलावून आणण्यास ज्या असीम आपुलकीच्या भावनेने नातलग येतो, तशी ही माणसे ह्या 'प्रेमनगर'मध्ये येत असतात. (ही वेश्या-वस्ती हल्ली इतकी वाढलीय की, 'मयेकर कॉलनी' हे तिचं जुनं नाव मागं पडून 'प्रेमनगर' हे नवीन नाव शौकीन लोकांनी दिलं आहे!) ह्यांच्या ह्या श्रद्धाळू भावनेवर घाव घालण्याचं कार्य परिणामकारकरीत्या केलं तर पददलित समाजात खोलवर मुळे पसरून बसलेल्या ह्या जोगतिणीच्या प्रथेचा वृक्ष तुटून, उन्मळून पडेल!

ह्या वेश्यावस्तीतील अनेक जोगतिणींचं जिणं नरकवासाहूनही भयानक असतं. ही मांगाची गौरव्वा. हिला एका ड्रायव्हरनं ठेवून घेतलंय्. म्हणजे हिनं धंदा करून आपल्याबरोबर त्या ड्रायव्हरचं पोट भरायला हवं, तो मागेल तेव्हा त्याच्या चैनीला पैसे द्यायला हवेत. नकार दिला की, तो बेदम मारहाण करतो. साऱ्या वस्तीत आठवड्यातून एक-दोन वेळा तरी अशी बोंबाबोंब असते. हे विचित्र त्रांगडं सुटतही नाही; कारण गौरव्वाचा अप्पा (ह्या जगात यजमानाला 'अप्पा' व रखेलीला 'आवा' म्हणतात.) नाक-कान कापण्याची धमकी तिला वारंवार देत असतो न् ती बिचारी भिऊन वादळ-वाऱ्यात सापडलेल्या वेलीगत राहात-वागत असते. काही वर्षांपूर्वी त्या थोड्या पैंसपरभारी असलेल्या खोलीतील रंगीचा खून झाला होता. (काय करावे, अजुनीही खुनी मिळत नाही! खून झालेली व्यक्ती वा तिचे नातेवाईक सधन असले तरच पोलिसांना हातपाय हलविणं 'सोई'चं जातं. गोरगरीब, पददलितांकडून काय लभ्यांश मिळणार? त्यामुळं बेवारशी प्रेतं म्हणून त्यांची विल्हेवाट लावणंच सोईचं.) काही दिवसांपूर्वी तर म्हाराच्या गोदीला धोंड्याने अशाच क्षुल्लक कारणावरून बेदम मारलं होतं. धोंड्या तिशीच्या आतला जवान. गावातल्या थिएटरावर तिकिटांचा ब्लॅक करणारा. खिसा 'फुल' असेल तेव्हा 'कपभर' चढवून तो वस्तीत येऊन असा दंगा करीत वेश्यांवर दादागिरी गाजवीत असतो. दुसऱ्या दिवशी गोदी खाटल्यावर डब पडलेली. एखादा रुंद फत्तर ठेवावा, तशी काळीभोर पाठ. उघडी. त्यावर तरारलेले वळ. बुढ्ढी तायव्वा पाठ शेकत असलेली, अन् रडता-रडता गोदी धोंड्याला शिव्या घालीत असलेली...पडद्यावरची उमा नटी सजीव होऊन येथे अवतरलीय् अशी वाटण्यासारखी रत्नव्वा...असंच कुणी गिऱ्हाईक तिला मारत असलेलं, अन् दोन हातांचा ढालीसारखा उपयोग करीत ती मार चुकवीत असलेली, इतके दिवस झाले तरी हे दृश्य अजुनीही मनापुढून हलत नाही! हप्ते वसूल करणाऱ्या पोलिसांबरोबरही कधीमधी मोफत शय्यासोबत करून साऱ्या अंगाची मळणी करून घ्यावी लागते ती आणखी निराळीच कहाणी...तसेच मोठमोठे सरकारी अधिकारी आले म्हणजे त्यांच्या पुढे ह्या दुर्दैवी स्त्रियांचा उपयोग कडबा-वैरणीगत...इंग्लिश बाटल्या रिचिवलेल्या सत्तामंदांनी मग हवे तसे लचके तोडावेत. नशेत श्वापदी चाळे करावेत, 'थ्रील' अनुभवावे!!

तर असे हे जग. ह्यात अर्थातच जोगतिणींचा भरणा अधिक. ह्या रूढीविरुद्धच्या आंदोलनाची सुरुवात डॉ. आढाव व डॉ. लिमये यांनी केली आहे. ही सुरुवात एका फार मोठ्या प्रवासाची ठरायला हवीय्. ह्या आंदोलनाचा वडवानल पददलित समाजाच्या तळामुळापर्यंत पोहोचून त्यात ह्या दुष्ट रूढीची पाळंमुळं जळून जायला हवीत तरच एका फार मोठ्या अशिक्षित स्त्रीसमुदायाची आपण खऱ्या अर्थाने सुटका, उद्धार केल्यासारखे होईल! □ □

## जखम पायाला, मलम हाताला!

एका प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्याच्या घरी मीटिंग चाललेली. कॉलेजची वीस-पंचवीस पोरं. कोवळीशी. व्यवहारी जगाच्या छक्क्यापंज्यापासून अनभिज्ञ अशी. युवकसंघटनेचे एक नेते बोलत असलेले. विषय 'जोगतिणींचा प्रश्न.' मीटिंग घराच्या वरच्या मजल्यावर होती आणि खाली प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते व पुढारी ह्यांच्यात पुढील बोलणं चाललेलं–

'आम्ही गावभर फिरून, मर-मर मरून मुलं जमा करायची आणि उद्या पेपरात नाव मात्र यांचं येणार...यांची मीटिंग, यांची सभा...'


ह्यापुढे आणखी काय बोलणं झालं असेल, ह्याची कल्पना चाणाक्ष वाचक सहज करू शकतील. येथे जोगतिणींचा प्रश्न गेला अडगळीत. आपल्या संघटनेचं नाव मात्र पेपरात आलं पाहिजे हे महत्त्वाचं!

सारी चळवळ पेपरातून. पेपरांतील बातम्यांतून. प्रत्यक्षात काही कार्य झालं नाही तरी चालेल...एखाद्या गावी जायचं. कॉलेजातील काही रिकाम्या प्राध्यापकांना पकडायचं, (बहुतेक प्राध्यापक 'रिकामे'च असतात.) त्यांच्याकरवी मुलं जमा करायची, मीटिंगा-सभा घ्यायच्या, भाषणं ठोकायची आणि मग लगेच निघायचं पुढलं गाव घ्यायला. (आणि हां, तेवढी सभेची बातमी पेपराला पाठवा हं, विसरू नका!)

शाळा-कॉलेजातील मुलांपुढे जोगतिणींचा प्रश्न मांडून काय उपयोग? कुणाला प्रश्न पडत नाही. जखम पायाला, मलम हाताला लावायचं सुरू आहे...खरं तर, प्रत्यक्षात ह्याच शाळा-कॉलेजातील काही पोरं जोगतिणींच्याकडे वासनातृप्तीसाठी जातात!

मांग, महार, ढोर; बेरड, मांगगारुडी, (मराठीतील काही विद्वान, विचारवंत वगैरे लोक मांग व मांगगारुडी ह्यात काही फरकही मानत नाहीत. वास्तविक चालीरीती किंवा रीतीरिवाज, भाषा वागणं-बोलणं हे दोन्ही दलितसमाजात परस्परांहून किती तरी भिन्न, वेगळे आढळतात; पण लक्षात कोण घेतो? दलितसमाज म्हटल्यावर महार-चांभारापलीकडे कुणाची नजर जातेय्? भंगी, बेलपत्तारी, गोसावी, डंवरी, पिचाटी वगैरेसारख्या बऱ्याच समाजगटांच्या माथी दलितांचं जिणं येत, येत असतं, हे कोणास ठाऊक नाही!) मुडीकर, डोंबारी, वडुर, फासेपारधी, चांभार वगैरेसारख्या पददलित समाजात, तसेच मराठा, लिंगायत, मुसलमान आदि समाजातील तळाच्या थरातील लोकात ह्या जोगतिणींच्या प्रश्नासंबंधी जागृती करण्याची खरी गरज आहे. त्यासाठी त्यांच्या वस्त्या-वस्त्यांतून, वाड्या-वाड्यांतून (आठ-दहा खोपटांच्या समूहाला 'वाडी' म्हणण्याचा प्रघात आहे.) प्रचार करायला हवा. यल्लम्मा देवस्थानाच्या कक्षेत येणारी हजारो गावं विंचरून काढायला हवीत; तर कुठे ह्या प्रश्नाला चालना मिळाल्यासारखं होईल. (फक्त होईल. ह्या साऱ्याचा परिणाम वरील पददलित समाजावर कितपत होईल हा एक प्रश्नच आहे! मला तरी व्यक्तिशः असा अनुभव आहे की, ह्या बाबतीत कुणी काही ऐकून घ्यायलाच मुळी तयार नसतात. उलट सांगणाऱ्यालाच खुळ्यात जमा केलं जातं! यल्लम्मावर श्रद्धा असणारे केवळ अशिक्षितच असतात असे नव्हे तर डॉक्टर, वकील, इंजिनियर असे सुशिक्षित लोकही!)

प्रजासमाजवादी पुढारी व कार्यकर्त्यांकडे पाहिलं की मला नेहमी श्री. वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील नायकांची आठवण येते. त्यांची ध्येये व वास्तव परिस्थिती ह्यात कुठे तरी खोलवर दरी असते. त्या ध्येयांच्या पाठीलागून ते लोक त्या दरीतच कोसळत असतात. वास्तव परिस्थिती मात्र आहे तशीच राहात असते! □



# रत्नाकर मतकरी

## मुलाखत

सुभाष सोनवणे

**ना**टककार म्हणून श्री. रत्नाकर मतकरी, ह्यांचा लौकिक सर्वश्रुत आहेच. नाट्यलेखनामध्ये 'मोठ्या माणसांच्या' नाटकांबरोबरच बालनाट्यांतही मतकरींचा हातखंडा आहे. बालनाट्य आणि गूढकथा हे दोन साहित्यप्रकार वस्तुतः अगदी विरुद्ध टोकांचे आहेत; पण बालनाट्ये लिहिणारे मतकरी तेवढ्याच सफाईदारपणे गूढकथासुद्धा लिहितात. शिवाय 'सोबत' मधील 'सहज' किंवा 'महाराष्ट्र टाइम्स' मधील अलीकडचे 'रंगत' ही मतकरींची सदरेसुद्धा वाचकांमध्ये लोकप्रिय ठरली आहेत. वैविध्यपूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण असे विपुल लेखन मतकरी सातत्याने करीत असतात.

लेखकाची आपल्या लेखनामागील भूमिका नेमकी कोणती असते, तो का लिहितो हे जाणून घ्यायची मला एक खोड आहे. जमेल तेव्हा, लेखकांना 'तुम्ही का लिहिता ?' हा वरकरणी विचित्र वाटणारा प्रश्न मी विचारीत असतो. एका मुलाखतीत रत्नाकर मतकरींना मी पहिला प्रश्न विचारला तो हाच–

–'तुम्ही का लिहिता ?'

–'गंमत म्हणून– !' मतकरी उत्तरले.

–'म्हणजे– ?' मी.

–'कोणताही नवा लेखनप्रकार सुरुवातीला मी सहज गंमत म्हणून हाताळतो. उदाहरणार्थ, गूढकथा लिहायला मी सुरुवात केली ती गंमत म्हणून–' मतकरी.

–'सुरुवातीला गंमत म्हणून लिहिता, आणि पुढे ?–' मी.

–'आज मी गूढकथा लिहितो, तेव्हा मला वाचकांच्या अपेक्षांची जाणीव ठेवावी लागते.' मतकरी.

–'म्हणजे सुरुवातीला गंमत म्हणून लेखन करता, ते पुढे 'कमिटेड्' लेखन होतं, असंच ना ?–' माझा प्रश्न.

–'नाही. माझं लेखन आउट ऑफ कमिटमेंट असते. वाचकांना काही तरी वेगळं, क्रिएटिव, सतत काही तरी 'फ्रेश' देण्याचा माझा प्रयत्न असतो. त्यासाठी मी फॉर्मस्, लिहिण्याच्या स्टाइल्स बदलतो–' मतकरी.

–'म्हणजे हा वाचकांचा अनुनय का ?–' मी.

–'तसं नाही. माझी कमिटमेंट स्वतः-कडेही असते. स्वतःचं समाधान झाल्याशिवाय मी लिहिलेलं हातावेगळं करीत नाही. माझ्या लेखनातली माझी स्वतःची इन्व्हॉल्व्हमेंट वाढावी ह्यासाठी काही तरी नवीन कल्पना माझ्या मलाच आवश्यक वाटतात. स्टेजवरील आत्यंतिक प्रेम म्हणून मी एकांकिका लिहितो. दर एकांकिकेत काही तरी नाविन्य आणण्याचा माझा प्रयत्न असतो. त्याचप्रमाणे लिहीत असलेल्या 'फॉर्म'ला पूर्ण न्याय देण्याचाही माझा प्रयत्न असतो. त्यामुळे लिहिले जाताना त्या लेखनात मी स्वतःच रस घेऊ शकतो–' इति मतकरी.

–'तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचं लेखन केलंय, करताय. ह्या सर्वांमधला तुमचा सर्वाधिक आवडता लेखनप्रकार कोणता ?–' मी.

–'ते डिस्टिंग्विश् करता येणार नाही. तो तो वाङ्मयप्रकार लिहिताना मी पूर्णतः त्या–त्या प्रकाराचा असतो. कथा लिहितानाचा लेखक हा नाटक लिहितानाच्या लेखकापेक्षा वेगळा असतो–' मतकरी.

–'वेगळा म्हणजे नेमका कसा ?–' मी.

–'एकच सांगतो. नाटक लिहीत असताना आय् डोंट सर्व्ह दि लिटरेचर, बट् आय् सर्व्ह दि थिएटर–' मतकरी.

–'ते ठीक आहे हो; पण कथा लिहिताना काय किंवा नाटक लिहिताना काय किंवा आणखीही अन्य वाङ्मयप्रकार लिहिताना काय, शेवटी लेखनाची प्रक्रिया तर एकच, सारखीच असते ना ?–' मी.

–'हे पहा. माझी बालनाट्यं मी 'साहित्य' म्हणून लिहिली नाहीत, तर त्या 'फॉर्म'ची, मीडियमची ओढ म्हणून लिहिलियेत–' मतकरी.

–'पण पर्यायाने ते लेखन साहित्यच, वाङ्मयच आहे, नाही का ?–' मी.

–'मला नाही वाटत. असं पहा–चित्रपटाची पटकथा ही कितीही साहित्यिक वगैरे असली, तरी तिला आणखी एक वेगळं 'निमित्त' हवं असतं. इट् इज् नॉट् कंप्लीट इन् इट् सेल्फ अॅज् ए पीस् ऑफ लिटरेचर ! पटकथेप्रमाणेच नाटक हा सुद्धा पूर्णतः 'साहित्यिक' प्रकार नाही, नसावा–' मतकरी.

–'मग अशी 'साहित्यिक' किंवा 'पूर्ण' नाटकं आहेत की नाहीयेत ?–' मी.

–'आहेत ना. उदाहरणार्थ, पूर्वीची 'संवादां'ची नाटकं कंप्लीट–पूर्ण असत; पण अशी 'पूर्ण' नाटकं माझ्या मते बहुतांशी 'बॅड् प्लेज्' ठरतात. 'घाशीराम कोतवाल' ह्या नाटकाचं पुस्तक वाचून ते 'पूर्ण' वाटत नाही. त्याचा प्रयोगच बघायला हवा. इतर लेखनप्रकार आणि नाट्यलेखन ह्यांच्यातला हा महत्त्वाचा फरक आहे.', मतकरी.

– 'म्हणजे नाटक 'पूर्ण' होते ते त्याच्या प्रयोगरूपातच का ?' –मी.

– 'हो, आणि ह्याचे भान ठेवून, नाटक लिहिताना, 'दिग्दर्शकाच्या जागा' सोडूनच लिहिले जायला हवे. नाही तर कथा–कादंबऱ्या लिहाव्यात–' मतकरी.

– 'मग आजची नाटकं पहाता तुम्हाला बॅड् प्लेज् किती आढळतात ?'

– 'बऱ्याच अंशी आज बॅड् प्लेज् जास्त आहेत. दे आर ओव्हररिटन ! पण बॅड् प्ले ठरवताना गल्लत करून चालणार नाही. 'उद्ध्वस्त धर्मशाळा' हे नाटक तसं संवादांच्या दृष्टीने 'पूर्ण' आहे; पण त्याला बॅड प्ले म्हणता येणार नाही. कारण त्यातले संवाद हे नुसते 'शब्द' नाहीयेत, तर त्या शब्दांना वैचारिक अधिष्ठान आहे. त्या नाटकाची जात वैचारिक नाटकाची आहे आणि त्यासाठी त्याला निवडलेला फॉर्म योग्य आहे–' मतकरी.

– 'काही नाटकं 'वाचायची' असतात, असं जे म्हटलं जातं, त्यात हे नाटक समानिष्ट करायचं का ?' –मी.

– 'काही नाटकं 'वाचायची' असतात' असं काही लोक म्हणतात खरं; पण अशी नाटकं 'इन्कंप्लीट' समजून प्रयोगरूपात प्रेक्षकांपर्यंत पोचवणं हे कुशल दिग्दर्शकाचं

काम आहे. उदाहरणार्थ, पु. शि. रेगे ह्यांचं 'रंगपांचालिक.' त्यातला शब्दच दृश्य-रूपानं सादर करणं हे दिग्दर्शकाला आव्हान आहे–' मतकरी.

–'शब्दांना असं दृश्यरूप निश्चितपणे देता येतं का ?'–मी.

–'हो. 'आरण्यक'मधला एक पीस उदाहरणादाखल सांगतो. धृतराष्ट्र करीत असलेल्या दानाबद्दल प्रतिहारी सांगत असतो. त्याच्या निवेदनातले शब्द प्रेक्षकांच्या कानांपर्यंत पोहोचतातच; पण तोच सीन इंप्रोवाइज् करून आम्ही व्हिज्युअल लेव्हलवरही दाखवीत असू–' मतकरी.

–'पण मग इथे प्रश्न पडतो की जर व्हिज्युअल् लेव्हलवर ते दृश्य नीट दिसते, समजते तर निवेदनातल्या शब्दांची गरज काय ? त्या ठिकाणचे शब्द अनावश्यक नाहीत काय ? नाटकात शब्दांचं महत्त्व काय आहे ? काय असावं ? मला वाटतं–बहुधा आयनेस्कोने नाटकातल्या शब्दांबाबत असा मूलभूत प्रश्न मांडला आहे–' मी.

–'नाटकातल्या शब्दांचं महत्त्व हे त्या त्या नाटकाच्या प्रकारावर अवलंबून आहे. 'पोर्ट्रेट' ह्या माझ्या नाटकातलं एक पात्र नुसतं गप्प रहाण्यातूनच खूपसं बोलत असतं, दुसरं पात्र बोलतं, त्यातला शब्द न् शब्द काही खरा नसतो. अनेक नाटकांतले शब्द हे शब्द म्हणून सुंदर असतात; पण काही वेळा असे शब्द उपरे वाटायला लागतात. कारण एकूणच नाटकाच्या संदर्भात ते शब्द फक्त शब्दच उरतात. नटानं जसं केवळ स्वतंत्रपणे रूपवान न दिसता अभिनयाच्या संदर्भात 'सुंदर' दिसायला हवं, तीच गोष्ट शब्दांचीही आहे. 'शब्द' हे थिएटरचे एक 'साधन' आहे आणि अनेकदा नाटकं लिहिली जाताना नेमके हेच विसरले जाते–'मतकरी.

–'पण मग निदान अशी नाटके 'वाचनीय' तरी म्हणता येतील का ?'–मी.

–'नाही. कारण आपल्या वाचनाच्या कन्सेप्टस्सुद्धा आता बदलल्या आहेत. आकर्षक शब्दांपेक्षा लेखनातला आशय हाच महत्त्वाचा असतो हे आपल्याला आज उमजू लागले आहे. म्हणूनच फडक्यांच्या कादंबऱ्यांतला सौंदर्याच्या वर्णनापेक्षा पेंडशांच्या कादंबऱ्यांतला रुक्ष–रखरखीतपणा अधिक वाचनीय ठरतो. तेव्हा केवळ गोड-गोड शब्दांसाठी आपण आता वाचत नाहीय...' मतकरी. □ □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २०।१२।७५ ते २६।१२।७५

### सत्ता व राजकारणात प्रतिकूल परिस्थिती जाणवेल

मकरराशीच्या व्ययस्थानी सत्तेचा व राजकारणाचा कारक ग्रह रवी असणे ही काही तशी त्या राशीला प्रतिष्ठा मिळवून देणारी गोष्ट नाही. त्यांच्या हाती लोकांचे बरेवाईट काही करण्याचे अधिकार आहेत. त्यांनी या वेळी फार संयमाने वागणे आवश्यक आहे. कारण अधिकाराचा गैरवापर होऊन बुद्धिभ्रष्टपणे वागण्याची या वेळी फार फार इच्छा त्यांना होणार आहे. त्यामुळे अप्रियता वाढणार आहे. कॉंग्रेस पक्षाला या वेळी फार मोठी अप्रियता, टीका व निर्भर्त्सना सहन करावी लागणार आहे. नियतीतले विरोधी पक्ष या वेळी निराशेने ग्रासले जातील व बेफामपणे वागू लागतील. भारताच्या आर्थिक आघाडीवर जरी फारसे वाईट घडणार नसले तरी बाह्य आघाडीवर काही तरी उपद्रव घडू शकेल. चीन, पाकिस्तान, अमेरिका यांच्याकडून काही कुरापत काढली जाईल. महाराष्ट्र देशात आघाडीवर राहाणार असून मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण लोकात लोकप्रिय होणार आहेत. □

**मेष : मंगळाची वक्रदृष्टी**

मंगळ तुमच्या राशीचा मित्र आहे तरी देखील तो वक्री झाला आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. घराचा तंटा, खरेदी-विक्री, व्यापारी क्षेत्रातील नवे वायदे या आठवड्यात शक्यतो करू नका. तुम्हाला जमीन घ्यायची असली तर ती या वेळी घेऊ नये. अकस्मात एक तर अडचणी येतील किंवा करार वगैरे होणारच नाहीत. कौटुंबिक स्वास्थ्य थोडेफार ढळल्यासारखे वाटेल. ध्यानीमनी नसताना काही काळजी उत्पन्न होऊ शकेल. अर्थात ती निरर्थकच असेल. नोकरीत वरिष्ठाबरोबर मतभेद वाढवू नका. तुमची योजना कल्पकतेने त्यांच्या गळी उतरविण्यात तुम्हाला यश मिळेल. व्यापारी लोकांनी वायदे करताना फारसे धाडस करू नये. सोमवार व शुक्रवार आर्थिक कामे होतील. तब्येतीची मात्र काळजी घ्या. महिलांनी या आठवड्यात साडी वगैरे माल खरेदी करू नये. फसवणूक होईल. भांडी घ्यायला हरकत नाही. विद्यार्थ्यांना कौटुंबिक प्रेमाची सावली कमी प्रमाणात मिळेल.

**वृषभ : यशाची ग्वाही**

वक्री मंगळाने पुन्हा तुमचे सामर्थ्य वाढवले आहे. त्याचा उपयोग तुम्ही जर आता करून घेतला नाही तर आळशावर गंगा आल्यासारखे होईल. या वेळी मुत्सद्दीगिरीने पावले टाका व ईप्सित साध्य करा. राजकारण, वाङ्मय, कला यात तुमचा प्रभाव या वेळी भरपूर वाढणार आहे. जे मनात आणाल ते पुरे करू शकाल. तुम्ही प्रकाशक असाल तर या वेळी तुमची सरशी होईल. तुम्ही एखादा तंटा जिंकणार आहात. तुमचा प्रभाव वाढून विरोधकांना तुम्ही तुमचा मुद्दा पटवून देण्यात यशस्वी व्हाल. रविवार ते बुधवार व शुक्रवार आर्थिक उलाढाली होतील. पैशाच्या व्यवहारातील अडचणी कमी होतील. नोकरीत तुमच्या प्रतिष्ठेची बूज राखली जाईल. बेकारांना प्रयत्नाने या आठवड्यात काम मिळेल. महिलांना लॉटरीत धनलाभ आहे. त्यांनी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांनी भलतेच धाडस करू नये. राजकारणात भाग घेऊ नये.

**मिथुन : अडचणी वाढतील**

भविष्य हे मार्गदर्शक असते त्यामुळे मित्र हो, तुम्ही हे वाचून हतबल न होता त्याप्रमाणे पावले टाकली तर तुमचा काही फायदाच होईल. तुमच्यापैकी वकील असतील तर त्यांना या आठवड्यात त्यांच्या धंद्यात पुरेसे यश येणे जरा कठीण आहे. लेखक, पत्रकार यांनी आपल्या लेखण्या फार सावधगिरीनेच वापराव्यात. नोकरीत वरिष्ठ मुद्दाम तुम्हाला त्रास देण्यासाठी काही तरी खुसपट काढू लागतील; पण तुम्ही संयमाने वागा. उत्तरे

देऊ नका. विनम्र वृत्ती जास्त फायद्याची ठरेल. तुमच्यापैकी कुणी व्यापारी असतील तर त्यांनी वायदे करताना फार जपूनच करावेत. काळजी घ्यावी. आर्थिक व्यवहार गुंतागुंतीचा होईल. बेकारांना या आठवड्यात फक्त आश्वासनावर समाधान मानावे लागेल. महिलांनी उगाच डोके तापवून घेऊ नये. राग मनातच ठेवावा. नोकरीत काळजी घ्यावी. विद्यार्थीवर्गाकडून पैशाचा गैरवापर होईल.

**कर्क** : मनासारखे होईल

शत्रुस्थानी रवी आहे तर राशीतच शनी आहे. शनि-रवी षडाष्टकयोगाने तुमचे काही वाईट होणार नाही. या आठवड्यात नोकरीत महत्त्वपूर्ण असे काही तरी घडू शकेल. आशा-आकांक्षा पुऱ्या होतील. वरिष्ठांबरोबरची बोलणी सफल होतील. नवी नोकरी अगर चालू नोकरीत बदली हवी असेल तर ती मिळू शकेल. या आठवड्यात कापडव्यापारी, स्टेशनरी-दुकानदार यांना हवे तसे गिऱ्हाईक मिळून पडून राहिलेला माल विकला जाईल. प्रवासातील तुमची उरलेली कामे पार पडतील. राजकारणी व्यक्तींबरोबर तुमचा संबंध येईल. आगामी काळातील योजनांची जुळवाजुळव तुम्ही करू शकाल. आर्थिक ताण कमी होईल. रविवार महत्त्वाच्या कामाला बरा नाही. महिलांना लहान प्रमाणात उद्योग सुरू करता येईल. पैसा मिळेल. विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रात काही करता येईल. प्रसिद्धी मिळू शकेल.

**सिंह** : अनपेक्षित घडेल

पाचवा रवी तुमच्या राशीचा स्वामी आहे; पण तो व्ययस्थानच्या शनीबरोबर षडाष्टक योग करीत आहे. ही तेवढीशी अनुकूल घटना नाही. म्हणून तुम्ही मुळातच थोडीफार सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. एखादी मोठी परीक्षा तुम्ही पास होऊ शकाल; पण तुम्ही जर वकील अगर राजकारणी असाल तर तुम्हाला या वेळी बरीच माघार घ्यावी लागणार आहे. मनाविरुद्ध सारे घडेल. वरिष्ठांबरोबरचे संबंध ताणले जातील. नोकरीत अगर व्यवसायात तुम्हाला बराच त्रास सहन करावा लागणार आहे.

तुमचा शब्द या वेळी मानला जाईल याची खात्री तुम्ही कुणाला देऊ नका. अर्थात कुलदेवतेच्या कृपेने यातूनही तुम्ही निभावून न्याल यात शंका नाही. सोमवार, गुरुवार तब्येतीची काळजी घ्या. महिलांना सार्वजनिक कामात माघार व अपमान सहन करावा लागेल. नोकरीत चुका करू नका. विद्यार्थीवर्गाला राजकीय त्रास होईल.

**कन्या** : आशाआकांक्षा उंचावतील

या वेळी वक्री मंगळ भाग्यस्थानी येऊन जरी वाटेल ते चाळे करीत राहिला तरी तुम्हाला त्याची परवा करण्याचे कारण नाही. तुमच्या मनाची व आशाआकांक्षांची सारी सूत्रे आहेत शनीच्या हाती. तो तुम्हाला काहीही कमी पडू देणार नाही. स्वतंत्र उद्योगाची कल्पना पुन्हा वेग घेऊ लागेल. तुम्ही लोकांना दिलेली आश्वासने पुरी करू शकाल. पत्रव्यवहारात मोठे यश मिळेल. तुमचा शब्द प्रमाण मानावा इतका तुमचा प्रभाव वाढेल. सोमवार ते बुधवार मन आनंदी राहील. आर्थिक प्राप्ती चांगली होईल. व्यापारात चार पैसे नफा मिळेल. लेखकांना उत्तम मानधन मिळेल. बुद्धीचे कौतुक होईल. नोकरीत वरिष्ठ तुमच्यावर खूष राहतील. काही सत्कृत्य हातून घडेल. बेकारीचा वनवास संपेल. नवी नोकरी पहायला हरकत नाही. महिलांच्या कलाकौशल्याचा गौरव होईल. नोकरीत वरिष्ठांबरोबर सुसंवाद घडेल. विद्यार्थ्यांना परीक्षेत घवघवीत यश मिळेल. शाबासकी मिळेल.

**तूळ** : तब्येत सांभाळा

अष्टमस्थानी मंगळाचे वक्री भ्रमण चालू आहे. त्यामुळे तब्येतीची काळजी घ्यावी लागेल. विशेष दमा, थंडीचा ज्यांना त्रास होतो त्यांनी जास्त जपावे. कलाक्षेत्रात काम करणाऱ्यांना मोठी प्रसिद्धी मिळू शकेल. त्यांची लोकप्रियता व कीर्ती वाढेल. नव्याने प्रसिद्धी, कीर्ती मिळेल. गायक कलाकारांना लोकप्रियता लाभेल. नोकरीधंद्याची परिस्थिती समाधानकारक राहील. नोकरीत व्याप व कामाची जबाबदारी वाढली तरी कर्तबगारीला नवे क्षेत्र लाभेल. बेकारांनी शेतीउद्योगाच्या बाबतीत प्रयत्न करावेत. स्वतंत्र उद्योग सुरू करायला अनुकूलता आहे. धनिक, उद्योगपती अशा लोकांबरोबर जिव्हाळ्याचे संबंध जुळून येतील. शेतीत उत्पादन वाढेल. व्यापारी लोकांना वायदे करण्यात फायदा होईल. सोन्याचांदीचे व भांड्यांचे व्यवहार फायदेशीर ठरावेत. मंगळवारी महत्त्वाची घटना घडेल. महिलांनी कापडव्यापार करावा. नोकरीसाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांना प्रोत्साहक अशा घटना घडतील.

**वृश्चिक** : मानसिक कटकटी

राशिस्वामी मंगळ वक्री आहे. तो तुमच्या राशीचा मालक असला तरी तो ज्या स्थानी आहे त्या स्थानी तुम्हाला म्हणावा तेवढा तो अनुकूल नाही. या आठवड्यात प्रामुख्याने तुम्ही घरात लक्ष द्यावे हे उत्तम. पत्नीचा हट्ट पुरवावा लागेल. मुलाविषयीच्या



तक्रारींना तोंड द्यावे लागेल. काही तरी आजार तर आहेच. यावर उत्तम उपाय म्हणजे तुम्ही तुमच्या कुलदेवताला शरण जाऊन तिची करुणा भाकणे हाच होय. नोकरीच्या दृष्टीने तसे वाईट काहीच नाही; परंतु बदली होईल का, हातून काही चुका होतील का अशा काही ना काही शंकाकुशंका मनाला भंडावून सोडतील. बेकारांना काम मिळेल; पण फार हेलपाटे घालावे लागतील. सोमवार, गुरुवार व शुक्रवार त्यातल्या त्यात समाधान मिळेल. महिलांना शारीरिक त्रास फारसा होणार नाही; पण चिडाचिडी होईल. नोकरीत फारसा त्रास नाही. विद्यार्थ्यांनी प्रेमात रस घ्यायला हरकत नाही.

**धनु : विरोधकांची फिकीर नको**

तुमचे मन सतत शंकाकुशंकांनी भरलेले असते; पण प्रत्यक्षात तसे काहीच घडत नाही व साऱ्या शंका फोल ठरतात. हाच अनुभव या आठवड्यात येणार आहे. या आठवड्यात तुम्ही प्रगतीच्या नव्या वाटा चोखाळू शकाल. व्यावसायिक जीवनात नव्या पर्वाची सुरुवात होईल. गेले अनेक दिवस ज्या अडचणीभोवती तुम्ही घोटाळत आहात त्या अडचणींचा आता मागमूसदेखील राहाणार नाही. नोकरीतील तुमच्या गुणांना प्रोत्साहन मिळेल. तुमच्या कर्तृत्वाची मालक अगर वरिष्ठांना खात्री पटेल व ते तुमचा योग्य उपयोग करून घेतील. नव्या नोकरीच्या बाबतीत सध्या काहीच गडबड करू नये. संशय वा गैरसमज निर्माण होईल असे काहीही करू नये. व्यापारात मात्र काळजी घ्यावी. बदली–बढतीचा सध्या तरी प्रयत्न करू नये. बुधवार व गुरुवार विशेष महत्त्वाच्या घटना घडतील. महिलांना नोकरीत पगारवाढ व प्रमोशन मिळेल. विवाहेच्छूंना आशादायक वातावरण राहील. विद्यार्थ्यांना सुखकारक काळ आहे.

**मकर : नोकरीत प्रगती**

मंगळ वक्री आहे तो फारसा प्रतिकूल जाणार नाही. उलट तो नोकरीच्या बाबतीत काही लाभदायक घटना घडवील. त्रासदायक ठिकाणी झालेली बदली या वेळी तहकूब करून घेता येईल. चालू नोकरीत सहानुभूति मिळेल. गैरसमज दूर होतील. तुम्ही जर राजकारणात भाग घेत असाल तर तुम्हाला थोडी माघार घ्यावी लागणार आहे. बराच विरोध तुम्हाला सहन करावा लागेल. या वेळी कोणत्याही स्पर्धेच्या राजकारणात अगर निवडणुकीत तुम्ही भाग घेऊ नये. तेलाचे व्यापारी, सोने-चांदी खरेदी-विक्री करणारे सराफ यांनी मुत्सद्देगिरीने धाडसी पाऊल टाकावे. शेअर्सच्या बाबतीत मात्र अनपेक्षित लाभ होईल. घराच्या समस्येची उकल होईल. शेती व जमिनीची खरेदी–विक्री थोडीफार हितकारक ठरेल. मंगळवार व गुरुवार महत्त्वाची बोलणी करा. महिलांना नोकरीत अनपेक्षित मोठे पद मिळेल. मात्र मोठेपणासाठी पैसा खर्च होईल. विद्यार्थ्यांनी पैसा खर्च करताना कर्ज काढावे लागणार नाही याची काळजी घ्यावी.

**कुंभ : स्थावराची प्राप्ती**

या आठवड्यात तुमच्या बाबतीत बऱ्याच महत्त्वाच्या घटना अनपेक्षितपणे घडणार आहेत. स्थावराचा वाद असेल तर तो तुमच्या बाजूने निर्णयाप्रत येईल. घराचा प्रश्न सुटणार आहे. तुम्ही जागेसाठी जर प्रयत्नात असाल तर तुम्हाला मोठे यश लाभणार आहे. तुम्ही लॉटरीत पैसा खर्च करा. तुम्हाला बक्षीस मिळू शकेल. पूर्वी काम केलेले जर पैसे येणे असतील तर ते या वेळी वसूल होतील. व्यापारीवर्गाने बोललेले वायदे त्यांना अनपेक्षित लाभाचे ठरतील. नव्या उद्योगाची सुरुवात करावयाची असेल, लहान प्रमाणात दुकान अगर एजन्सी सुरू करावयाची असेल तर या वेळी ती होऊ शकेल. भागीदारीत मात्र कोणताही उद्योग करू नका. उपासना केल्यास तुम्हाला समाधान व सामर्थ्य प्राप्त होईल. वाहनाचा योग खूप दिवसांनी जुळून येत आहे. सोमवार व बुधवार पत्रव्यवहारात यश मिळेल. महिलांना चालू नोकरीत सुखाचे काम मिळेल. वरिष्ठांची मर्जी राहील. विद्यार्थ्यांना श्रमाचे काम करून पैसा मिळवता येईल.

**मीन : सहानुभूति मिळेल**

आर्थिक बाबतीत हा आठवडा अतिशय फलदायी ठरणार आहे. रेस–लॉटरीसारख्या मार्गाने तुमचे नशीब उजळून निघेल. लेखकांना पुरस्कार व भरपूर मोबदला मिळू शकेल. प्रकाशकांची पडून राहिलेली पुस्तके एकदम विकली जाऊन गुंतलेला पैसा वसूल होईल. नोकरीच्या बाबतीत मालकांनी अगर वरिष्ठांनी दिलेली नवी आश्वासने प्रत्यक्षात येतील. तुमचा मान व दर्जा वाढेल. नोकरीत बदल मात्र करू नका. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह रेंगाळत राहिले आहेत त्यांचे विवाह ठरून ते पार पडण्याच्या दृष्टीने असलेली काळजी दूर होईल. परदेशी प्रवासाला हा आठवडा तेवढासा अनुकूल नाही. कुणाच्या गाठीभेटी, महत्त्वाची बोलणी अगर मागण्या मांडावयाच्या असतील तर त्याला फार अनुकूलता आहे. महिलांना संसारात नवे नाविन्य आणता येईल. नव्या वस्तू खरेदी करता येतील. आनंद मिळेल. विद्यार्थ्यांच्या बाबतीत महत्त्वाचा निर्णय लागेल. पास होतील.

□ □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# डिसीक्का

अशोक प्रभाकर डांगे

**डिसीक्का नावाचा माणूस गेला. तो तुमच्या-आमच्या स्मरणात राहील, त्याच्या अलीकडच्या नितांत सुंदर ' सनफ्लॉवर 'मुळे नाही तर पंचवीस वर्षांपूर्वी अगदी वेगळ्या विषयावर त्याने दिलेल्या ' बायसिकल थीव्हज 'मुळे....**

चोर ह्या प्रकारातलं नावीन्य आपल्या समाजात आजकाल जाणवत सुद्धा नाही. तसे वृत्तपत्रांचे कॉलम चोऱ्यांच्या बातम्यांनी हमखास भरलेले असतात किंवा क्वचित हवालदारांनी धरून चालवलेले हे प्राणी रस्त्यात सुद्धा भेटतात. फार काय धर्मेन्द्र आणि तनुजा या देखण्या चोरांची दुक्कल रंगीत पडद्यावर सुद्धा चमकते; तरी पण चोर ह्या शब्दातलं नावीन्यच आपल्यामधनं ओसरलंय. कारण सरळ आहे. आजकाल आपण सारेच सच्चे चोर झालोयत. अस्तित्वाचा जीवघेणा लढा लढताना आपली मनं सुद्धा चोरटी झालीयत. आपल्या भावना लुटारू झाल्याहेत किंवा वासना सुद्धा दरोडेखोरी करू लागल्या आहेत; पण तरी सुद्धा एखादे कमिशनरसाहेब घडल्या गुन्हेगारीचे पाढे रोज नव्या सन्मानानं वाचताहेत किंवा लोकलमध्ये कधी काळी एखादा चोर सापडल्यास पिसाट जमाव त्याचा बेभान पाठलाग करतो आणि दादरसारख्या स्टेशनबाहेरच्या फूटपाथवर त्याला ठेचून मारतोही. म्हणजेच आपल्याला चोर तर नवीन नाही, तशीच चोरी सुद्धा नवीन नाही. इतकंच काय ती फारशी जाणवतही नाही.

मध्यंतरी डिसीक्का नावाचा माणूस गेला. तो जन्मानं इटालियन होता. त्याचा मृत्यु सुद्धा आपल्या परवलीपलीकडचा ठरला. किरकोळ बातमी टाकून मातबर वृत्तपत्रांनी त्याच्या कर्तृत्वाचं श्राद्धही उरकून घेतलं; पण आता आपणाला मात्र त्याची दखल घ्यायलाच हवी. ती sunflower सारख्या त्याच्या अगदी अलीकडच्या नितांत सुंदर चित्रपटासाठी नाही तर पन्नास सालात त्यानं साकारलेल्या एका विलक्षण गाजलेल्या चित्रपटासाठी. विषय होता तो सुद्धा चोरीचा आणि चित्रपटाचं नाव बायसिकल थीव्हज.

डिसीक्कानं चोरीची एक सुंदर कथा सादर केलीय. ती सुद्धा एकाच चोराची नाही. ती दोन चोरांची आहे. एकानं चोरी केली म्हणून दुसऱ्यालाही ती करणं अटळ ठरलं. दोष मात्र त्या दोघांचाही नव्हता. दोषी परिस्थिती होती. समान जीवन होतं. दुसरा महायुद्धानंतरचा इटली. युद्धाचा वणवा विझला होता. मागे उरली होती होरपळलेली माणसं. उद्ध्वस्त घरं. लाखो मेले होते. लाखो मरण्यासाठीच जणू उरले होते. विध्वंसन अटळ होते. त्यातनं जन्माला आली होती भीषण बेकारी. त्या भीषण बेकारीतून आणखी भीषण दारिद्र्य आणि त्या दारिद्र्याच्या पोटी मंदीची वावटळ. त्या विनाशी मंदीतून आणखी बेकारी. हे दुष्टचक्र एका-दुसऱ्यानं थांबण्यासारखं नव्हतं. शिवाय ते तितकंच अटळ होतं.

ह्या साऱ्या परिस्थितीचं चित्रण आपण पहातो ते रिकी नावाच्या माणसातून. डिसीक्काचा नायक तो हाच. ह्याच्याच तोंडातून तो बोलतो आणि ह्याच्याच कृतीतून परिस्थितीलाही बोलतं करतो. हा तरुण आहे. तो दिसायलाही बेताचाच, एखाद्या सामान्य कामगारानं दिसावं तसा. शिवाय परिस्थितीसारखाच तो ओबडधोबडही आहे. ह्याला मारीया नावाची बायको आहे. ती खस्ता काढणाऱ्या आपल्या कडव्या गृहिणीसारखीच दिसते. अगदी ओढग्रस्त, किरकोळ प्रेम करणारी आणि नळाच्या लायनीत उभं राहून भांडणारी. ह्या दोघांना एक मुलगा. त्याचं नाव ब्रूनो. आठ-दहा वर्षांचा. दिसायला स्मार्ट. अगदी लहान मुलांनी दिसावं तसा. शिवाय एक पाळण्यातला पोरगा. त्याची विशेष दखल घ्यावीशी वाटत नाही. हे कुटुंब राहतयं एका ठोकळेबाज चाळीच्या आधारानं. अगदी शहराच्या बाहेर ! चाळी म्हटलं तर जुन्याच आहेत, म्हटलं तर नव्याही. निदान परळपेक्षा बऱ्या आहेत. हीच गोष्ट मात्र लक्षणीय.

आता गावभर आहे बेकारी. नोकऱ्या मिळत नाहीयेत. दाढ्या वाढलेले भकास पुरुष रस्त्यानं वणवण करीत हिंडताहेत फाटक्या कपड्यातून. ह्या उद्ध्वस्त जमावाच्या घोळक्यात रिकी सुद्धा आहे कारखान्यांच्या प्रवेशद्वारावरच्या झुंबडीमध्ये. खूप जोडे घासल्यावर डिसीक्काच्या ह्या नायकालाही एक जॉब मिळू पहातोय; पण अट एकच आहे. ज्याच्याजवळ सायकल फक्त त्यालाच काम ! रिकीची सायकल तर गहाण पडलीय एका सावकारी पेढीकडे. तो अस्वस्थ होतोय; पण बायको मात्र धीराची आहे. ती सरळ उठते. घरातले काही कपडे गोळा करते. सरळ विकून टाकते. पैसे मोजून घ्यायला रिकी येतोच. सायकल सोडवली जाते. आता काम निश्चित होतं. दोघांना मोठा आनंद होतो. अगदी आकाशाएवढा.

रिकीचं काम नेमलेलं असतं. निळा ड्रेस चढवायचा, रोज सकाळी कंपनीत हजेरी लावायची. पोस्टरचे गठ्ठे ताब्यात घ्यायचे. सायकलला बांधायचे. बरोबर एक शिडी आणि खळीचा डबा. ही सारी कसरत संभाळत गल्ल्यागल्ल्यातन घुमायचं. पोस्टर्स नेमक्या जागी चिकटवायची. बस. येवढंच. डिसीक्कानं ही पोस्टर्स सुद्धा नागव्या बायांची निवडलीयत. जणू त्यांच्या दर्शनातून तो समाजजीवनातल्या भीषण विसंगती नागव्याच करीत असतो. पहिल्याच दिवशी रिकी गणवेशच चढवून बाहेर पडतो. बरोबर ब्रूनो असतोच डबलसीट. वाटेतल्या पेट्रोलपंपावर तो त्याला सोडतो. तेव्हा आपल्या लक्षांत येत, त्या गरीब बापाचा पोर त्या पेट्रोलपंपावर काम करून बापाला मदत करतोय. तेव्हा आपल्याच पोटात विलक्षण खड्डा पडतो.

रिकी कामाला लागतो; पण दिवस चांगला नसतो. काळही कठोर असतो. भिंतीवर पोस्टर लावणाऱ्या रिकीच्या डोळ्यांदेखत

एक पोरगा त्याची सायकल चक्क पळवतो. रिकी जमेल तसा पाठलाग करतो. धावतो. अडखळतो. कधी मोटारींच्या फूटबोर्डाचा उपयोग करतो; पण चोर चलाख निघतो. एका अंधाराचा फायदा घेऊन तो बघता बघता गायब होतो.

रिकी नावाच्या इटालियन माणसाच्या भीषण जीवनसंघर्षाला इथेच तोंड फुटतं. तो पिसाटतो. अखेर हताश होतो. पोलीसस्टेशनकडे धाव घेतो. मग रीतसर तक्रार नोंदणं आलंच. तक्रार म्हटल्यावर दुर्लक्षही आलंच. त्यांनी तरी किती लोकांकडे पहावं? कारण अशा शेकडो तक्रारी आधीच त्यांच्या फायलीत येऊन पडलेल्या. समाजातली गुन्हेगारीच फार वाढलेली. मग रिकीच्या सायकलचोरीची क्षुल्लक दखल तरी कोण घेणार? ते तक्रार नोंदवतात. माहिती विचारतात. मग सरळ हात वर करतात. रिकीचा नाइलाज होतो. चालत चालत तो घरी निघतो. पेट्रोलपंपाबाहेर फूटपाथवर त्याचा कोवळा पोरगा दीनवाण्या चेहऱ्यानं उशीर झालेल्या बापाची वाट पहात असतो. बापाचा हात धरून सुन्न ब्रूनो मुकाट घराची वाट चालू लागतो.

डिसीक्काच्या नायकाची भीषण अवस्था पाहून आपण अवाक होतो. परिस्थिती अटळ असते. सायकल तर नोकरी, नोकरी तर जगणं! जगण्या-मरण्याची निकड बनलेली ती सायकल शोधण्यासाठी रिकी घराबाहेर पडतो; पण तो एकटा नसतो. पोरगा त्याची पाठ सोडत नाही. एका अशक्य शोधाला ते सुरुवात करतात. प्रथम तळघरातल्या एका ऑफिसात जातात. हा एका कामगारांच्या पक्षाचा अड्डा असतो. तिथे काम करणारा रिकीचा दोस्त संगीताच्या रिहर्सलमध्ये मग्न असतो. रिकीची दखलही न घेण्याइतका. उतावीळ झालेला उद्ध्वस्त रिकी कसंबसं त्याचं लक्ष वेधतो. रिहर्सल बंद पडते. लोक रिकीवर उखडतात. दोस्त सायकल गमावलेल्या रिकीचं खोटं सांत्वन करतो. भरपूर मदतीचं तोंडभरून आश्वासन देतो आणि गोड बोलून त्याला वाटेला लावतो.

डिसीक्काचा हा नायक मग जुन्या बाजारांचा शोध घेतो. बरोबर त्याचे माहितगार मित्र. विकायला ठेवलेल्या प्रत्येक सायकलीचा सांगाडा ते तपासतात. स्पेअरपार्टच्या विभागात प्रत्येक भाग वेड्यासारखा पहातात. आशा मोठ्या असतात. ह्या गदारोळात त्यांना आपल्याच चेहऱ्यामोहऱ्याची एक सायकल भेटते. दुकानदार म्हणतो ती तुमची नाही. बाचाबाची होते. रिकी पोलिसाला बोलावून आणतो. पोलीस म्हणजे पुरावा देणं आलंच. पोलीस त्या फ्रेमचा नंबर तपासतो. तो भलताच निघतो. भल्या मोठ्या जमावात रिकी मूर्ख ठरतो. वर पोलिसाचा उपदेश असतोच. बापलेक मग सरळ तिथून बाहेर पडतात. हा प्रयत्न सुद्धा पाण्यातच गेलेला असतो.

माणूस नावाच्या प्राण्यास पोट नावाचा प्रकार आहे आणि ते भरणं आणि स्वतःला जगवणं ही एकच गोष्ट त्याच्या साऱ्या जाणिवांचं केंद्र होऊन बसते. रिकी हरत नाही. तो दुसरे बाजार शोधून काढतो. वेड्याहून वेडा होऊन हिंडतो. बरोबर ब्रूनो असतोच; पण आपल्या एकनिष्ठ पोराची दखलही तो अभावानेच घेतो. मध्येच मोठा पाऊस दोघांनाही झोडपून काढतो. तो कोवळा पोरगा रस्त्यात घसरूनही पडतो. तरी बाप हळू चालतोस म्हणून त्याच्यावरच खेकसतो. माणसाच्या मनःस्थितीचं बोलकं दर्शन डिसीक्का सहज घडवत जातो.

त्यानंतर डिसीक्का आपल्या नायकाला जुन्या बाजारांतून आणखी फिरवत फिरवत एका म्हाताऱ्या सायकलवाल्याकडे आणून सोडतो. दुकानाबाहेर रिकीला एक माणूस दिसतो. म्हाताऱ्याशी तो कसला तरी सौदा करत असतो. रिकी चेहरा ओळखतो. तो त्याच्याच शोधात हिंडत असतो, सायकलचोराच्या. बापलेक धावून जातात; पण चोराला तेवढ्यात चाहूल लागते. चोर पुन्हा चलाख ठरतो. तो सायकलीवरून पसार होतो. बापलेक जीव खाऊन पाठलाग करतात. उपयोग शून्य! मग उखडलेला रिकी त्या म्हाताऱ्या दुकानदाराचीच गचांडी धरतो. चोराचं नाव विचारतो. पत्ता विचारतो. म्हातारा त्याला बिलकूल दाद देत नाही; पण आता रिकीला शोधाचा दुवा सापडलेला असतो. तो त्या म्हाताऱ्याला सोडायला तयार नसतो. म्हाताऱ्याच्या मागून बापलेक एका चर्चमध्ये शिरतात. ते चर्च गरिबांसाठी असतं. म्हातारा तिथे फुकट दाढी करून घेताना दिसतो. प्रार्थनेच्या वेळी रिकी त्याला पकडतो. चोराचा पत्ता विचारत रहातो. म्हातारा दाद देत नाही; पण त्याच्या दमदाटीनं प्रार्थनेत व्यत्यय येतो. तिथले धर्मगुरु खवळतात आणि म्हातारा पण ह्या गडबडीत मध्येच गायब होतो. ब्रूनो सारा वेळ बापाचीच पाठ धरून असतो. म्हातारा सापडत नाहीच. परतताना ते वाट चुकतात. गरिबांसाठी वाढलेल्या थाळ्या पाहून ब्रूनो क्षणभर विरघळतो आणि त्या उपाशीपोटी पोराबद्दल आपणही मनातून फार हळहळत रहातो. बाप ब्रूनोला दटावतो. त्याला हावरट म्हणतो, रागावतो. मग खवळलेला तो स्वाभिमानी पोरगा बापाला सारखं विचारत रहातो, 'तुम्ही मला तसं का म्हणालात? का म्हणालात?' बापावर चिडलेला ब्रूनो बंड पुकारतो. रिकीशी बोलणं बंद करतो आणि फार अंतर ठेवून घुम्यानंच चालू लागतो.

मध्येच ते दोघे एका पुलावर येऊन पोहोचतात. काही काळ त्यांची ताटातूट होते. रिकी नदीकाठी चोर शोधायला जातो. तेवढ्यात नदीत एक पोरगा बुडून मेल्याची ओरड होते. रिकी हादरतो. त्याला वाटतं, पोरानं रागानं जीव दिला. त्याच्यातला बाप कळवळतो. तो धावत त्या जागी जातो. बुडत्या पोराला लोक पाण्यातून बाहेर काढतात. रिकी थरथरत्या अंतःकरणाने त्याचा चेहरा पहातो. मग क्षणभर निःश्वास सोडतो. तो ब्रूनो नसतोच. रिकी मागे पहातो. पुलाच्या टोकावर ब्रूनो शांतपणे उभा असलेला त्याला दिसतो. रिकीतला बाप खरंच आता जागा होतो. ह्या भीषण प्रसंगानं तो हादरतो. आपल्याबरोबर उपाशीपोटी पोराबद्दल त्याची जाणीव जागी होते आणि मग तो सरळ त्याला एका बऱ्यापैकी हॉटेलात घेऊन जातो. हॉटेलच्या टेबलावर बापलेकांची परत एकदा दिलजमाई होते. उपाशी ब्रूनो स्पाघेटीवर ताव मारतो आणि बापावरसुद्धा खूष होतो. डिसीक्का जागा असतोच. मनमुराद चरणारी श्रीमंतांची पोरं तो ब्रूनोला वरचेवर दाखवतो आणि त्याच्याबरोबरच आपल्यालाही.

डिसीक्काच्या नायकाचा शोध आणखी पुढे चालू होतो. अखेर साऱ्या धडपडीला यश येते. एका जुनाट गाडीत चोर सापडतो. रिकी सरळ त्याचा पाठलाग करून त्याला पकडतो. त्याची गचांडी पकडून विचारतो,

सायकल कुठाय ? पोरगा म्हणतो, माहीत नाही. रिकी त्याला खूप दम देतो. रस्त्यावर मॉब गोळा होतो. पोराचे शेजारीपाजारी असतातच. ते म्हणतात, हा एक सज्जन पोरगा आहे. हा चोरी करील ? अशक्यच ! ते खवळतात. रिकीलाच दम देऊ लागतात. वातावरणाला कलाटणी मिळते. बापाला असलेला धोका ब्रूनो ओळखतो. हळूच पोलिसाला बोलावून आणतो. खवळलेला रिकी पोलिसाला घेऊन समोरच असलेल्या चोराच्या घरात जातो. पोलीस झडती घेतो. सायकल नसते ती नसतेच. रिकीला दिसतं घरातलं भीषण दारिद्र्य. रिकी अवाक होतो. आता लोकसुद्धा रिकीवर आणखी खवळलेले असतात. तेवढ्यात चोर पण आकडी येऊन कोसळतो. ती म्हणे त्याची नेहमीचीच सवय असते. आता लोकांना चोराबद्दल आणखीनंच प्रेम वाटू लागतं. लोक रिकीला शिव्या देऊ लागतात. पराभूत ठरलेला रिकी सरळ माघार घेतो. गल्लीतून बाहेर पडतो. आपला निष्ठावान पोरगा मागनं येतोय याची त्याला जाणीवसुद्धा उरत नाही.

डिसीक्काच्या नायकाचा शोध संपलेला असतो. निष्फळपणे. सायकल तर कायमचीच गमावलेली. आपल्या भयाण भवितव्यासकट रिकी मोठ्या रस्त्यावर येऊन पोचतो. बरोबर ब्रूनो. सायकल नाही, काम नाही, पोटाची सोय नाही. आपल्या अधिक इतर तिघांच्या. इतका काळ खंबीरपणे झगडणारा रिकी पराभूत होतो. हतबल ठरतो. आपल्या पोराच्या हातावर अखेर तो एक नाणं टिकवतो. त्याला ट्रामनं घरची वाट धरायला सांगतो. नियती अटळ असते. आता डिसीक्का आपल्या नायकाची पुढची भूमिका ठरवून टाकतो. रिकी एका हेरलेल्या इमारतीबाहेर उभा रहातो. क्षणभर विचार करतो. मग पुरता निश्चय करतो आणि त्या इमारतीबाहेर लावलेली सायकल सरळ पळवतो आणि टांग मारतो. घरी न जाता गोंधळून रस्त्यातच थांबलेला ब्रूनो बघतच रहातो; पण दैव रिकीच्या मागं नसतं. तसं ते ह्या दुर्दैवी नायकाचा कधीच पाठपुरावा करत नाही. भला मोठा ओरडा होतो. चोर, चोर. असंख्य लोक रिकीचा पाठलाग करू लागतात आणि रिकी परत एकदा हतबल ठरतो. पकडला जातो. पोलीस येतात. लोक पुन्हा एकदा खवळलेले दिसतात. ब्रूनो अवाक होऊन हा तमाशा पहात असतो. त्या गर्दीतही तो बापाचा कोट धरून पाठपुरावा करतो. अखेर ब्रूनोचा रडवेला चेहराच रिकीची सुटका करतो. लोकांना पोराची दया येते. ते बापाला समज देतात आणि सरळ मुक्त करून टाकतात. हताश झालेला डिसीक्काचा नायक आपलं उजाड भवितव्य आणि उमदा पोरगा घेऊन घराकडे परत फिरतो. डिसिक्काची विलक्षण चित्रपटकथा इथेच संपते. आपल्या साऱ्या भावनाच ती बधिर करून टाकते. पन्नास सालातल्या वास्तव जगाचं ती भीषण दर्शन घडवते. डिसीक्काची ही चित्रपटकथा म्हणूनच मानवतेची परिमाणं घेऊन टाकते. चोर म्हणजे काय ? चोरी म्हणजे काय ? ह्या साऱ्याचं मूल्यमापन कोणी करायचं ? कसं करायचं ? न्याय म्हणजे काय ? अन्याय म्हणजे तरी काय ? अपराध–निरपराधित्वाच्या सीमारेषा कोणत्या ? आपण पुरते सुन्न होऊन जातो. दोन लोकविलक्षण बापलेकांची भावपूर्ण शोकांतिका चित्रित करणाऱ्या डिसीक्काबद्दल आपल्याला विलक्षण आदर वाटू लागतो. व्यवहारी जगाच्या कॉलममध्ये जगणारी खोटी माणसं त्याची दखल घेवोत अथवा न घेवोत, जीवनातल्या चिरंतन मूल्याचा छोटा शोध घेत घेत चिरंतन झालेल्या त्या महान मानवी कलावंताला आपण मनोमन दुवा देतो.

□ □


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर

अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन

राचे काम आता रेंगाळणार नाही. नोकरीत बस्तान व्यवस्थित बसेल. विस्कटलेली घडी नीट बसेल. नोकरीतील धाकधूक व्यर्थ ठरेल. बेकारांनी स्वतंत्र उद्योगाकडेच प्रयत्न करावेत. मंगळवार ते गुरुवार अनपेक्षित घटना. महिलांना नोकरीचे आकर्षण तर वाटेलच; पण त्यांना सहानुभूतीही मिळेल. विद्यार्थ्यांनी लहानसा धंदा करावा.

**धनू : नोकरीत कामाचा ताण**

हा आठवडा तुम्हाला मुळीच प्रतिकूल नाही. काही महत्त्वाचे बदल घडू शकतील. तुम्ही जर योजना मांडल्या तर त्या मान्य होऊ शकतील. मात्र तुमच्यावर जबाबदारी पडणार असून तुमचा कामाचा ताण फार वाढणार आहे. उसंत अशी मिळणार नाही. एक काम संपले की दुसरे असे काही तरी घडू शकेल. बेकारांना आत्मविश्वासाने स्वतंत्र उद्योग करता येईल. भांडवल अगर तात्त्विक अडचणी निर्माण होणार नाहीत. प्रकाशनाचा व्यवसाय उत्तम अंग धरील. सोमवार, मंगळवार व शुक्रवार महत्त्वाच्या वाटाघाटी बोलणी व चर्चा करता येईल. तब्येत एकंदरीत चांगली साथ देईल. नव्या योजनांबद्दल पत्रव्यवहार करता येईल. महिलांना हा आठवडा अनुकूल अनुभव देईल. जुन्या मैत्रिणींकडून पाहुणचार मिळेल. नोकरीत शुभकारक घटना. विद्यार्थ्यांच्या प्रवासाला तर अनुकूल संधी मिळणार आहे.


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये


**मकर : हट्टी स्वभाव आवरा**

शनी-मंगळाचे तेज व सामर्थ्य तुमच्यामागे खडे आहे ही फारच भाग्याची गोष्ट आहे; पण त्याचबरोबर हेच ग्रह स्वभावात उग्रता व हट्टीपणा आणतात. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः ज्याच्या हातात फार मोठे अधिकार आहेत त्यांनी याबाबतीत जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. नाही तर त्यांच्या हातून भले होण्याऐवजी नको ते घडू शकेल. या वेळी नोकरांबरोबर किंवा हाताखालच्या व्यक्तिबरोबर संयमाने वागणे श्रेयस्कर आहे. एरवी आठवडा छान आहे. राजकारणात तुमचे व्यक्तिमत्त्व तेजळून उठेल. छाप पडेल. विरोधकदेखील हात पुढे करतील. नोकरीत बढती, प्रमोशन अधिकोन्नती असे काही तरी घडेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. लॉटरी-रेसमध्ये बक्षीस मिळू शकेल. रविवार, गुरुवार नव्या कामाची सुरुवात करा. महिलांना स्वतःचे घर राहण्यासाठी मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत अनुकूलता. विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षा सफल होतील.

**कुंभ : स्थानांतर व स्थित्यंतर**

दुष्टग्रह माणसाला फार त्रास देतात हे खरे; पण तेच ग्रह शत्रुस्थानी असले तर ते शत्रूला धडा शिकवतात व स्वतःची उन्नती घडवून आणतात. शनि–मंगळ शत्रुस्थानी आहेत ही तुमच्या दृष्टीने एक अपूर्व अशीच गोष्ट आहे. तुम्ही राजकारणी असाल तर तुमचे विरोधक या वेळी तुमच्यासमोर नांगी टाकतील. अपराधाची कबुली देतील. तुम्हाला मदत करतील. हा आठवडा तुमचे स्थलांतर व स्थित्यंतर घडवून आणणार आहे. प्रमोशनवर व मोठ्या अधिकाराच्या जबाबदारीवर तुमची बदली होईल. पूर्वी प्रयत्न यशस्वी झाले नाहीत; पण आता होतील. नातेवाइकांचे व मित्रांचे सहकार्य मिळेल. स्थावराच्या व्यवहारांत फायदा होईल. सोमवार व शुक्रवार मोठ्या व्यक्तीचा परिचय होईल. पैसे मिळतील. महिलांना सार्वजनिक सन्मानाचा योग नोकरीत कायमपणा येईल. विद्यार्थ्यांनी नवे काहीतरी शिकावे. प्रवासाचा योग येणार आहे.

**मीन : प्रगतिकारक पर्व**

शनिबरोबर मंगळहि आता पाचवा होत आहे. ही घटना मीनराशीच्या व्यक्तींना एक पर्वणी आहे यांत शंका नको. फार दिवसाची उराशी बाळगलेली स्वप्ने पुरी होण्याचा हा समय आहे. या वेळी तुम्ही उत्साहाने नवे पाऊल उचला व कामाला लागा. यश हाती येईल. लेखकांना एखादे सरकारी बक्षीस व पुरस्कार मिळण्याची शक्यता आहे. पत्रकारांना त्यांच्या अंगच्या गुणावर मोठा वाव मिळणार आहे. प्रकाशकांना श्रेय व दर्जा प्राप्त होईल. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा फार महत्त्वाचा आहे. अचानक बढती प्रमोशनचे योग येतील. ज्यांच्या नोकऱ्या अस्थिर व अनिश्चित असतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. याच वेळी तुमच्यापैकी विवाहेच्छु मंडळीची लग्ने जमतील व पार पडतील. नवे संसार सुरू होतील. संसारात प्रसन्न वातावरण राहील. मंगळवार ते गुरुवार महत्त्वाची बोलणी व कामे करा. महिलांना हा आठवडा काही तरी नवे देणार आहे. मन आनंदी व प्रसन्न राहील असे काही तरी घडेल. विद्यार्थ्यांना परीक्षेचा निकाल मोठी प्रतिष्ठा मिळवून देईल.

□ □

तो हीट झाला...त्यानंतर दादानं संगीत-दिग्दर्शक बदलले, दिग्दर्शक बदलले, कलाकार बदलले, वसंत सबनिसांसारखा समर्थ लेखकही त्यानं दोन चित्रपटांनंतर बदलला. सर्व-साधारण फॉर्म्युला-टीमपासून-स्टोरीपर्यंत कर-ण्याचा कुठल्याही यशस्वी निर्मात्याची परंपरा दादानं सहजपणे मोडून काढली. (ही दुराव-लेली माणसं दादाबद्दल कडवट बोलतातच) आणि ही मोडल्यानंतर आत्ताच्या चित्रपटा-साठी मात्र दादानं पांडू हवालदारची टीम (उषा चव्हाण सोडून) जवळपास इनटॅक्ट ठेवली आहे...पण त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे दादानं स्वताला इनटॅक्ट ठेवलंय. आता लखोपती दादा अजूनही अत्यंत साधा राहातो, पट्टयापट्टयाची अंडर पॅण्ट घालतो. (सालं ते इलॅस्टिक लफडं आपल्याला जमत नाही...मग त्या चड्डीची एक इलॅस्टिक गोष्ट सुरू) हॉटेलातल्या दादाच्या खोलीत कुठल्याही ऐषआरामी गोष्टी नजरेस पडत नाहीत...

मला वाटतं स्वतःबद्दल प्रचंड आत्म-विश्वास (सहसा बाहेर न दिसणारा-क्वाएट स्वरूपाचा) जबरदस्त इन्स्टिक्ट, महाराष्ट्र-भरच्या पब्लिकची नीटपणे जाण आणि स्वतः-बद्दलची शिस्त ही दादाच्या या अमाप यशाची गमकं असावीत...

'आणि नशिबाची साथ...' दादा म्हणतो.

'दादा हा अतिशय लवाड आणि हुशार मनुष्य आहे.' भालजी पेंढारकर म्हणाले, 'म्हणूनच त्याला हे इतकं यश मिळालंय.'

भालजींवर...बाबांवर...दादाची परम-भक्ती. त्याचं स्फूर्तिस्थानच. 'शांतारामबापू भले मला राजकमलमध्ये पाऊल टाकायला देणार नाही म्हणोत...राजकमलमध्ये गाण्याचं रेकॉर्डिंग करायला न देऊ देत...बाबांसारखा मनुष्य पाठीमागे असल्यावर मला कुणाचीच जरुरी पडली नाही!' आणि खरंच शूटिंगच्या मधल्या वेळात दादा बाबांच्याकडे धाव घेऊन होता...त्यांच्याशी गप्पा करत होता.'

'सध्याला माझी प्रकृती बरी नाहीय्... दिसतही नाही मला पण सवईनं स्टुडिओत फिरत असतो.'

कोल्हापूरची वारी बाबांना भेटल्याशिवाय पुरीच होत नाही. बाबा वृद्ध होताहेत... त्यांच्या डोळ्यांचं ऑपरेशनही होणार होतं दुसऱ्या दिवशी; पण हा महर्षी थकला, खचला नाही...' अजूनही निदान एक पिक्चर तरी करायचंच' अशी बाबांची जिद्द आहे.

'मी काही मोठा माणूस नाहीय' बाबा सांगत होते. 'मोठी माणसं आपल्यातला प्रकाश इतरांपर्यंत पोहोचवतात...सूर्यासारखं स्वतःच्या प्रकाशानं इतरांना उजळवतात. मी एक साधा कार्यकर्ता. मनापासून पटलेल्या गोष्टी मी इतरांना फक्त सांगण्याचा प्रयत्न केला माझ्या चित्रपटांतून...म्हणूनच मी दादाला सांगत होतो आज...बाबा रे, झाली चार चित्रं झाली. पाचवंही तसलंच सुरू केलं आहेस...आता थांब...धंदा करावा रे पण आपण समाजाचं काही देणं लागत असतो... आता काही समाजाला शिकवतील असे चित्रपट काढ...खूप मनोरंजन केलंस आता-पर्यंत...धंदा केलास...आता देणं देऊन टाक!'

दादाला हा सल्ला कसा वाटला हे मात्र मला ठाऊक नाही. संपूर्ण स्टुडिओ जळल्या-नंतर देखील बाबांसारखा जो माणूस जिद्दीनं उभा राहू शकतो तो आणखीन एक चित्रपट सहज काढू शकेल...समाजाचं देणं आपण अजूनही लागतोय असं बाबांना या वयातही वाटतंय...पन्नास वर्षांच्या चित्रनिर्मितीनंतर यातच बरंच काही आलं.

'मला जेव्हा मरण येईल तेव्हा मी तृप्त असेन बघ!' बाबांचा आवाज अजूनही माझ्या कानात घुमतो आहे. 'फक्त त्या वेळी मी पूर्ण शुद्धीवर असावा असं मात्र फार वाटतं... मला जाताना ती ऋग्वेदातली ऋचा म्हणा-यची आहेय्...हे पंचमहाभूतांनो, तुम्ही मला दिलेली शक्ती आज माझ्यापासून परत घ्या!...' बाबांची पाठमोरी कृशकाठी शांत चालत गेली.

आणि मागाहून मी बाबांसारख्याच एका प्रचंड वृक्षाखाली बसून हेलावून गेलो होतो.




या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

## कऱ्हाडचे साहित्यसंमेलन : पृष्ठ ८ वरून

पूर्वाध्यक्षांच्या वतीने आभार मानताना हा विषय फुलविण्याची संधी पुलंना मिळाली. दुर्गाबाईंनी प्रत्येक अध्यक्षाबद्दल मांडलेला सूत्ररूपी विचार पुलंनी खुलविला. –माडगूळकरांच्या शीघ्र कवित्वा-विषयींचा मुद्दा त्यांनी विशेष रंगवून साग्र संगीत सांगितला आणि शेवटी आज सर्व लेखक एकाच दुःखाने एकत्र आले आहेत आणि ह्या अंधारात आपण पणतीच्या रूपाने का होईना स्वतः जळत प्रकाश देण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. दुर्गाबाईंना प्रिय अशा जातककथेचा आधार घेऊन त्यांनी सडेतोडपणे विचारले की, आज आपण डुकराचे जिणे प्रिय मानून चिखलात राहणार आहोत का ? प्रल्हादाचा ' नारायण नारायण ' म्हणण्याचा अधिकार काढून घेतल्यास नृसिंहावतार जागा होईल अशी त्यांनी सूचना केली.

ह्या समारंभाचा समारोप करताना दुर्गाबाईंनी पुलंनी दाखविलेल्या मानवतेच्या अंगाचे सूत्र पकडून मानवी हक्कांचा पुरस्कार करणारे जयप्रकाश नारायण यांच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले आणि सर्व सभेने उभे राहून प्रार्थना केल्यावर सभा संपली.

दुर्गाबाईंनी अशा रीतीने साहित्यिकमंचावर राजकारण आणले का अशी शंका काहींच्या मनात आली. मुळात साहित्यसंमेलनाला राजकारणाचे वावडे मुळीच नाही. भाषावार प्रांतरचना, सीमाप्रश्न इत्यादी अनेक राजकीय विषयांसंबंधी संमेलनाने वारंवार ठराव केले आहेत. यात अनेक राजकारणी पुरुषांनी नेहमीच रस घेतला आहे. दुर्गाबाईंनी राजकारण आणि साहित्य ही वेगळी राहू शकत नाहीत या गांधीजींच्या शिकवणीचा उल्लेखही केला; परंतु त्यांनी हेही स्पष्ट केले की, जयप्रकाशजींच्या राजकारणाशी प्रार्थनेचा संबंध नाही. कॉंग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम ह्या संस्थेशी संबंधित म्हणून जयप्रकाशजींनी जे विचारस्वातंत्र्यासाठी काम केले आहे त्यामुळे लेखकांनी त्यांना दीर्घायुष्य चिंतिले हे सयुक्तिकच होते. ह्या भावनेचाच पुनरुच्चार वि. स. खांडेकर यांनी आपल्या दुपारच्या भाषणात केला. ह्या निर्भय आणि निर्मळ प्रार्थनेने संमेलनाला एक फार महत्त्वाचे अधिष्ठान प्राप्त झाले.

सोमवारी दुपारी अचानक स्वागतध्यक्षांचे निरोपाचे भाषण झाले आणि या नाट्याला कलाटणी मिळाली. आता समारोप कोणत्या पद्धतीने होणार याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली. खुल्या अधिवेशनात पुलंना आपली एनर्जी कोकणी प्रश्नावर खर्च करावी लागली. समारोपासाठी दुर्गाबाई उभ्या राहिल्या आणि त्यांनी प्रथमच सम्मेलनाला राजकारणापासून पुन्हा साहित्याच्या प्रांगणात आणल्याबद्दल यशवंतरावांचे आभार मानले. त्याच वेळी त्यांनी राजवाडाचांच्या शब्दांत याही गोष्टीची जाणीव करून दिली की साहित्यिक पत्रकार हे तुरुंगात असताना सम्मेलनाला पूर्णत्व येऊ शकत नाही. सरकारी मान्यता पावलेले तर्कतीर्थ-त्यांच्या भाषणालाही प्रसिद्धी मिळू नये याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आणि जातककथेच्या आधाराने बजावले की धर्माने अधर्माच्या दडपशाहीला जरी वाट करून दिली रीत धर्म बाजूला झाला की अधर्म कोसळणारच !

ह्या उदात्त गंभीर सुरावर भरतवाक्य म्हटले गेले,

यंदाच्या साहित्यसम्मेलनाला काही प्रमाणात असे साहित्यबाह्य कारणांनी महत्त्व येणे अपरिहार्य होते. परिस्थितीच तशी आहे. स्वागतसमितीने देखील स्वागताध्यक्षांच्या अवेळी निरोपासाठी अचानक कविसम्मेलन बंद पाडून हेच दाखवून दिले. तरीही साहित्यिक विचारांनी जो सम्मेलनाचा भाग आखण्यात आला होता त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. साहित्यविषयक कार्यक्रम आखला तर संचालकांना दुहेरी दृष्टी ठेवावी लागते. एक तर वेगवेगळ्या गावांतून आलेल्या साहित्यिक आणि साहित्यप्रेमी मंडळींना गुंतवण्यासाठी भरीव कार्यक्रम आखावे लागतात. शिवाय स्थानिक श्रोत्यांना खूष करण्यासाठी लोकप्रिय लेखक-कवींच्या कथाकथनाचा, काव्यवाचनाचा, चर्चेचा, नाटकाचा इत्यादी कार्यक्रम ठेवावे लागतात. त्यात स्थानिक कवींचा शक्यतो समावेशही करावा लागतो. साहित्यासंबंधी गोडी निर्माण करणे हा सम्मेलनाचा एक महत्त्वाचा हेतू असल्याने हे योग्यही आहे. कथाकथन, कविसंमेलन आणि चर्चा ह्या तिन्ही कार्यक्रमांना आठ-दहा हजार श्रोत्यांनी जो प्रतिसाद दिला त्यावरून हा हेतू सफल झाला यात शंका नाही. ह्या साहित्यिकांच्या निवडीत लोकरंजन हा निकष प्रामुख्याने असल्यामुळे साहजिकच तीच तीच नावे दरवर्षी असतात आणि नव्या दमाच्या लेखकांचा व्हावा तितका परिचय घडविला जात नाही.

यंदा विशेष अभ्यास करणाऱ्यांसाठी म्हणून गटवार चर्चाही आयोजित करण्यात आल्या होत्या; परंतु आयत्या वेळी त्यांपैकी तीन चर्चा रद्द झाल्या.

कविसम्मेलनात नेहमीप्रमाणे पाडगावकर, करंदीकर, बापट, सुर्वे आणि महानोर यांनी बाजी मारली तर प्रभा गणोरकर आणि रजनी परुळेकर यांनी आपल्या काव्यगुणांनी लक्ष वेधून घेतले; परंतु कविसम्मेलनात खरा रंग भरला तो तांदळे या नावाच्या एका धनगर कवीने. मुळाक्षरेही लिहू न शकणाऱ्या ह्या कलावंताने शेतकऱ्याच्या जीवनाशी अतिपरिचित अशा एका माशीसंबंधी अस्सल कविता ठसक्यात म्हणून चटका लावला. आपले साहित्य आणि साहित्यसम्मेलने ही अजूनही पांढरपेशांच्या रिंगणातच आहेत. त्यात कीर्तनादी पारंपरिक साहित्यप्रकारांना किंवा लावणीसारख्या लोककलांना अजून स्थान नाही याची जाणीव प्रकर्षाने झाली.

सम्मेलनप्रसंगी इतर ज्या काही गोष्टी घडतात त्यांचे महत्त्व काही कमी नाही. या वेळी भरविण्यात आलेल्या कलाप्रदर्शनात के. टी. देशमुख यांचे रंगभूमीविषयीची छायाचित्रे आणि सामग्री यांचे प्रदर्शन महत्त्वाचे होते. पुस्तकांच्या स्टॉल्सवर झालेली गर्दी हीही प्रतिनिधींच्या साहित्यविषयक जिवंत आस्थेचे प्रतीक होती. मंडपाआसपासच्या मोकळ्या जागेत भरणाऱ्या अड्ड्यांवर अनेक साहित्यिक प्रश्नांचा खल झाला असणार, लहानमोठ्या साहित्यिकांचा परिचय झाला असणार. ह्या तीन दिवसांत साहित्यिकांनी हजारो स्वाक्षऱ्या केल्या असणार आणि कऱ्हाड परिसरातील साहित्यप्रेमिकांना जन्मभर आठवत राहील असे त्यांच्या ' हीरो 'चे दर्शन घडले असणार!

सम्मेलन संपले ! पुढील सम्मेलन कुठे, कधी आणि कसे भरेल कोणास ठाऊक ! ह्या तीन दिवसांत दुर्गाबाईंच्या नेतृत्वाखाली जे थोडेफार निर्भयतेचे अवसान चढले त्याबद्दल लगोलग शिक्षाही झाली आहे. आता साहित्यिकांची खरी सत्त्वपरीक्षा आहे. ☐ ☐